सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २४ जानेवारी २०२५। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ७८ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

महत्त्वाचे

## शरद पवार-अजित पवारांत बंद दाराआड चर्चा

**पुणे** : दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार अशी चर्चा गेली अनेक दिवस माध्यमांमध्ये सुरू आहे. यातच आज अजित पवार आणि शरद पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा झाल्याने दोन्ही पवार गट एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची सर्वसाधारण सभा आहे. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने शरद पवार आणि अजित पवार एकत्रित आले. मात्र काही दिवसांपासून काका-पुतण्यांमधील संबंध सुधारत असल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची सर्वसाधारण सभेसाठी अजित पवार आणि शरद पवार आज एकत्र आले. यावेळी घाईघाईत आलेल्या अजित पवारांनी पीएला विचारले कुठे बसायचे आहे, यावर पीएने 'साहेब इकडे आत बसलेत असे म्हणताच अजित पवार अध्यक्ष असा बोर्ड लावलेल्या दालनात गेले. यावेळी त्यांची शरद पवारांशी जवळपास अर्धा तास बंददाराआड चर्चा झाली. अजित पवार शरद पवारांच्या दालनात शिरल्याचा व्हिडीओही समोर आला आहे.



## शिक्षण अधिकाऱ्याकडे सापडल्या बेड भरून नोटा!

**पाटणा** : बिहारच्या बेतिया जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्याच्या घरात टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात रोकड जप्त करण्यात आली. बेतिया जिल्हा शिक्षण अधिकारी रजनीकांत प्रवीण यांच्या निवासस्थानावर बिहार दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकला. या कारवाईत तब्बल दोन बेडभरून रोकड जप्त करण्यात आल्याने दक्षता विभागाचे अधिकारीही अवाक झाले आहेत. बेतिया येथील मुफस्सिल पोलिस स्टेशन परिसरातील बसंत बिहार कॉलनीत रजनीकांत प्रवीण यांचे घर आहे. पाटण्यातील दक्षता पथकाने आज सकाळी तिथे छापा टाकला. या कारवाईत कोणालाही आत किंवा बाहेर येण्याची परवानगी नव्हती. स्थानिक प्रशासन आणि दक्षता विभागाचे अधिकारी सध्या या प्रकरणावर बोलणे टाळत आहेत. रजनीकांत प्रवीण गेल्या तीन वर्षांपासून बेतिया येथे तैनात आहेत. घरातून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तब्बल दोन बेड नोटा असल्याने त्या मोजण्यासाठी यंत्र मागवावे लागले. दक्षता पथकाने त्यांच्या अन्य मालमत्तेवरही छापे टाकले आहेत.

# दावोसमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला

**• भविष्यात राज्य राहणार डेटा सेंटरचे कॅपिटल • मुख्यमंत्री फडणवीस यांचा पत्रकारांशी संवाद**

◆ **मुंबई, २३ जानेवारी**

दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमीक फोरमच्या भारताच्या पॅव्हेलियनमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला राहिला. यामुळे महाराष्ट्राला जगभरातील विविध उद्योग क्षेत्रातील दिग्गज कंपन्यासमवेत विक्रमी १५ लाख ७५ हजार कोटी रुपयांचे गुंतवणुकीचे सामंजस्य करार करता आले. यातून राज्यात १५ लाख ९८ हजार रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



दावोसमध्ये गुंतवणुकीचे ५४ आणि धोरणात्मक सहकार्याचे सात असे एकूण ६१ सामजंस्य करार झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्र आता डेटा सेंटरचे कॅपिटल होईल. डेटा हे नव्या युगाचे 'ऑईल' आहे. त्यामुळे या क्षेत्राची वाढ वेगाने होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दावोस येथून मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. उद्योग मंत्री उदय सामंत मुंबई येथून सहभागी झाले. 'जल सुरक्षित भविष्यासाठी जागतिक सहकार्य' विषयांमध्ये देश आणि राज्याची भूमिका मांडली. जलयुक्त शिवारसोबतच जलसंधारणाच्या काय उपाययोजना राज्यात केल्या जात आहेत, याचे सादरीकरण करता आले.

एमएमआरमध्ये सहा लाख कोटींची गुंतवणूक येत आहे. याशिवाय विदर्भ पाच लाख कोटी, उत्तर महाराष्ट्र ३० हजार कोटी तर मराठवाड्याचे मॅन्युफॅक्चरींग हब हे शक्तीस्थळ ठरू लागले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. ◀(तभा वृत्तसेवा)

### कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान

» कृत्रिम बुद्धिमत्तेत महाराष्ट्राला सर्वांत पुढे ठेवण्याच्या दृष्टीने अनेक करार दावोसमध्ये करण्यात आले. यात गुगलशी कराराचा समावेश आहे. नवी मुंबईत इनोव्हेशन सिटी निर्माण करून एक परिसंस्था उभी करण्यावर आपण भर दिला आहे. ■

### दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच

» दावोसमध्ये जगभरातील सीईओ येतात. आपल्या कित्येक कंपन्या भारतीय असल्या तरी त्या आता वैश्विक झाल्या आहेत. दावोस हे आंतरराष्ट्रीय नेटवर्किंगचे केंद्र आहे. महाराष्ट्रात होणारी ९५ टक्के गुंतवणूक विदेशी आहे. ■

# युद्ध थांबवा, अन्यथा लादणार नवे कर

### डोनाल्ड ट्रम्प यांचा रशियाला इशारा

◆ **वॉशिंग्टन, २३ जानेवारी**

रशियाने युक्रेनविरोधात सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी तोडगा काढला नाही, तर त्यांच्यावर लादण्यात आलेल्या बंधनासोबतच नवीन कर लादले जातील तसेच रशियाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या देशांसाठी देखील नवे कर लागू राहणार असल्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला.

ट्रम्प यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष थांबविण्यासाठी रशियाने वाटाघाटी केल्या नाहीत, तर माझ्याकडे अमेरिकेत किंवा इतर सहकारी देशांमध्ये विकल्या जाणाऱ्या कोणत्याही रशियन वस्तूंवर जास्तीचा कर, आयात शुल्क आणि निर्बंध लादण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. याशिवाय ड्रग्जची तस्करी रोखण्यासाठी मेक्सिको, कॅनडा आणि चीनने तातडीने उपाय करावे.

दरम्यान युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर बायडेन प्रशासनाने यापूर्वीच रशियावर असंख्य निर्बंध लादले, ज्यात बँकिंग, संरक्षण, उत्पादन, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रातील हजारो संस्थांचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)




# दहा कोटी भाविकांचे स्नान

### प्रथमच गाठला विक्रमी आकडा

◆ **प्रयागराज, २३ जानेवारी**

उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी सहभाग नोंदवला असून, सुमारे दहा कोटींहून अधिक भाविकांनी गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या पवित्र त्रिवेणी संगमात स्नान केले आहे. यात दहा लाख कल्पवासी आणि विदेशातून आलेले भाविक तसेच साधूसंतांचाही समावेश आहे.

प्रथमच महाकुंभात भाविकांनी इतक्या मोठ्या संख्येने स्नानाचा आकडा गाठला आहे. उत्तरप्रदेश सरकारने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारपर्यंत भाविकांचा दहा कोटींचा आकडा पार झाला होता. दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढतच आहे. दर दिवशी संगमात स्नानासाठी आणि आध्यात्मिक पुण्यासाठी लाखो लोक प्रयागराजला पोहोचत आहेत. स्नान पर्वात ही दैनंदिन लाखांतील संख्या कोटीत जाते.

उत्तरप्रदेश सरकारचा अंदाज आहे की, यावेळी महाकुंभात किमान ४५ कोटींहून अधिक भाविक स्नानासाठी येतील. महाकुंभातील मौनी अमावास्या आणि वसंत पंचमी असे दोन शाही स्नान व्हायचे आहेत. महाकुंभाच्या सुरुवातीपासूनच दहा कोटींचा आकडा पार होणे सरकारचा अंदाज किती अचूक होता, हे दर्शवित आहे.

२३ जानेवारीपर्यंत दहा कोटींचा आकडा पार होणे म्हणजे अवघ्या दहा दिवसांत भाविकांच्या आकड्याने विक्रमाला गवसणी घातली आहे. सर्वाधिक ३.५ कोटी भाविकांनी संक्रांतीच्या दिवशी स्नान केले होते. पौष पौर्णिमेच्या दिवशी १.७ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले. ◀(वृत्तसंस्था)

# विकसित भारतासाठी एकजूट राहा

### नेताजींच्या जयंतीनिमित्त पंतप्रधानांचे आवाहन

◆ **कटक, २३ जानेवारी**

देशाला कमकुवत करण्याचा आणि एकतेला तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपासून सावध राहा, विकसित भारतासाठी एकजूटता आवश्यक असल्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'पराक्रम दिन' कार्यक्रमाला संबोधित करताना मोदी म्हणाले, नेताजींचे जीवन देशवासीयांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. त्यांनी कधीच स्वतःला एका चौकटीत ठेवले नाही. नेताजींच्या जीवनाचा आदर्श समोर ठेऊन आपल्याला विकसित भारत बनविण्यासाठी स्वतःला झोकून द्यावे



लागणार आहे. जागतिक स्तरावर देशाला सर्वोत्तम बनवायचे आहे.

आपल्याला उत्कृष्टतेची निवड करावी लागेल आणि कार्यक्षमतेवर लक्ष केंद्रीत करावे लागेल. नेताजींचे संपूर्ण लक्ष देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यावर होते. यासाठी त्यांनी जनतेला एकजूट केले. त्याचप्रमाणे आपल्याला विकसित भारतासाठी एकजूट व्हावे लागेल. यासाठी नेताजींच्या जीवनप्रवासातून आपल्याला प्रेरणा घेतली पाहिजे. एकतेला तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींपासून सावध राहण्याचे आवाहन मोदी यांनी केले. ◀(वृत्तसंस्था)

### जागतिक स्तरावर देशाचा दबदबा

» अंदमानातील बेटांना सरकारने सुभाषचंद्र बोस यांचे नाव दिले, राजधानी दिल्लीतील इंडिया गेडवर त्यांचा पुतळा स्थापित केला. नेताजींची जयंती देशभर पराक्रम दिन म्हणून साजरी केली जात आहे. विकसित भारताचे लक्ष्य समोर ठेऊन मागील दहा वर्षांत २५ कोटी देशवासीयांना गरिबीतून बाहेर काढले. देशात पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहे. सैन्यदलाला अधिक बळकट करण्यात येत आहे. भारत आज जागतिक स्तरावर मजबूत राष्ट्र म्हणून उदयास येत आहे. ■

### एक्सवर पोस्ट लिहून दिली श्रद्धांजली

» पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यम एक्सवर पोस्ट लिहिली. त्यात म्हटले की, आज पराक्रम दिनानिमित्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांना श्रद्धांजली अर्पण करतो. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. ते धैर्य आणि संयमाचे प्रतीक होते. त्यांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी आपण काम करीत असताना त्यांची प्रेरणा सतत ऊर्जा देत असते. ■

# १०० दिवसात २० लाख घरे, १० लखपती दीदी अन् विमानसेवा

**• नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे जनतेला ठोस आश्वासन..!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

आमचे महायुतीचे सरकार आता थांबणार नसून, खूपच वेगाने धावणार आहे. यामुळे अवघ्या १०० दिवसांत पंतप्रधान आवास योजनेतून राज्यातील २० लाख लोकांना घरे मंजूर करून पहिला हप्ताही वर्ग करण्यात येणार आहे. तर महिलांचे भाग्य बदलणाऱ्या केंद्रीय स्तरावरील लखपती योजनेतून राज्यभरात १० लाख लखपती दिदी बनविणार आहोत. याचबरोबर सोलापूरची विमानसेवा, सोलापूर शहराला पाणी पुरवठा करणारी उजनीवरून येत असलेली दुहेरी पाईपलाईन आदी विविध योजना पूर्ण करण्यात येणार असल्याचा आश्वासनांचा पाऊस आज (दि. २३) राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पहिल्याच बैठकीत पाडला.



सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळाल्यानंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ग्रामविकास मंत्री गोरे यांनी आपल्या भावना बिनधास्तपणे व्यक्त केल्या. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, माजी खा. रणजितसिंह राजेनिंबाळकर, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदींसह भाजपाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून, ही देव-देवतांची भूमी आहे आणि या जिल्ह्याची सेवा करण्यासाठी मला पालकमंत्री पद मिळाल्याने मी माझे भाग्यच समजतो. आज पहिल्यांदा सोलापूरकरांनी माझ्यावर भरभरून प्रेम केले, स्थानिक पदाधिकारी, जिल्हा प्रशासनाने माझे जंगी स्वागत केल्याने मी अक्षरशः भारावून गेलो. जिल्ह्यातील विविध प्रश्न समजून घेण्यासाठी प्रथम जिल्हा प्रशासनाच्या विविध खात्यातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून आढावा बैठकही घेतली. या बैठकीतून जिल्ह्याच्या विविध प्रश्नांचा माझा अभ्यास सुरू केला आहे. यातील एकेक करून सर्व समस्या दूर करुन जिल्ह्यातील नागरिकांच्या सर्व प्रश्नांचा मी निपटारा करणार आहे.

या शहरातील एमआयडीसीचा विषय असो, उजनीवरून येणारी दुहेरी पाईपलाईन असो अथवा शेतकऱ्यांना लागणारा सिंचनासाठीचा पाण्याचा विषय असो; आदी विविध विषयांचा मी अभ्यास करून त्या योजना गतीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. यासाठी पुन्हा मी येत्या ३० तारखेला डिपीडीसीची बैठक लावली असून, त्याद्वारे जिल्हा विकासासाठी जास्तीत जास्त निधीची व्यवस्था लावणार आहे. उजनी पर्यटन विकास आराखड्यावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मोठे काम सुरू केले आहे; त्याही आराखड्याचा पाठपुरावा करून मी माझ्या कार्यकाळात उजनी पर्यटनाला चालना देणार आहे. या उजनी जलपर्यटनासाठी देश-विदेशातून पर्यटक येतील आणि जिल्ह्यात मोठी रोजगार निर्मिती होईल, असाही आशावाद गोरे यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रश्नांबरोबर जिल्हा परिषद, महापालिकेतील विविध प्रश्नांचा मी अभ्यास करून त्यांच्याही अडचणी दूर करणार आहे. एकंदरीत, मुख्यमंत्र्यांनी अवघ्या १०० दिवसात करावयाच्या तयार केलेल्या सप्त सुत्रीद्वारे जिल्हाविकास साधणार असल्याचा निर्वाळा गोरे यांनी शेवटी दिला.

#### ▸ आठवड्यातून एकदा सोलापूरला येणार

जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासाठी माझे मंत्रीपदाचे आणि माझ्या मतदारसंघाचे इतर कामकाज सांभाळून आठवड्यातून एक दिवस सोलापूर जिल्ह्याला देण्याचा शब्दही आज पालकमंत्री गोरे यांनी दिला. मी दिवसातून १६-१७ तास काम करणारा माणूस असून, जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांनाही सोबत घेवून विकासकामांचा वेग वाढविणार असल्याचे गोरे यांनी जाहीर केले.

#### ▸ विमानसेवेसाठी दिल्लीत बैठक लावणार

विमानसेवा चालू करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे. आता ही विमानसेवा चालू करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, यासाठी संबंधित खात्यांचे मंत्री व अधिकाऱ्यांची दिल्ली दरबारी बैठक लावून विमानसेवा लवकर चालू करणार आहे.

#### ▸ कोणालाही हातात कायदा घेवू देणार नाही

हातात कायदा घेवून चुकीचे काम कोणीही करीत असतील तर त्याला आपण पाठीशी घालणार नाही; ना त्यांचे समर्थन करणार नाही. जर आमच्या पक्षाचे पदाधिकारीही चुकत असतील त्यांनाही माफ करणार नसल्याचा इशारा नूतन पालकमंत्री गोरे यांनी दिला. त्यांच्या स्वागताच्या बॅनरवरून विचारलेल्या प्रश्नाला गोरे यांनी बेधडक उत्तर दिले.

#### ▸ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लवकरच

जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महानगरपालिकांच्या निवडणुका आता लवकरच लागतील, असेही संकेत नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज दिले. या निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आग्रही असून, काही कोर्टप्रक्रियेतील कामांमुळे या निवडणुका लांबल्या होत्या. आता लवकरच या निवडणुकांचा बिगुल वाजणार असल्याचे संकेत गोरे यांनी दिले.

#### ▸ ३ तास उशिरा आले तरी जंगी स्वागत!

पालकमंत्री गोरे हे आज पहिल्याच दिवशी तब्बल ३ तास उशिराने आले. तरीही सोलापूर शहरात आल्यानंतर भाजपा पदाधिकारी आणि महायुतीतील इतर पक्षप्रमुखांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यानंतर जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांनीही त्यांचे जोरदार स्वागत करून आढावा बैठकीतही उत्साह दाखविला. यामुळे पालकमंत्री गोरे यांनी समाधानाची भावना व्यक्त केली. पंढरपूरहून येताना त्यांचे पेनूर, मोहोळ आदी ठिकाणीही महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.



## संक्षिप्त वृत्त

### शहरात २९ जानेवारीनंतर एक रोटेशनसाठी पाणीपुरवठा एक दिवसाने पुढे

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

विविध दुरुस्ती कामासाठी महावितरणकडून बुधवार दि. २९ जानेवारी रोजी विद्युत पुरवठा खंडित करण्यात येणार असल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उजनी धरणातून होणारा उपसा त्या कालावधीत बंद असणार आहे. यामुळे त्या दिवशी आणि पुढील एका रोटेशनसाठी शहराचा पाणीपुरवठा एक दिवसाने पुढे ढकलण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून १३२ केव्ही बाळे-चिंचोली काटी १३२ केव्ही लाईनचे कंडक्टर ओढणे या दुरुस्ती कामासाठी दि. २९ जानेवारी रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ६ यावेळेत शटडाऊन घेत वीज पुरवठा खंडित करण्यात येणार आहे. त्यामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्रासाठी १३२ केव्ही चिंचोळी काटी सबस्टेशनहून येणारी ३३ केव्ही लाईन बंद राहणार आहे. या कामामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने बुधवार दि. २९ जानेवारी रोजीचा शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने व तसेच यानंतर १ रोटेशन पाणी पुरवठा पुढे जाणार आहे. त्यामुळे नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.

### राज्यपालांच्या हस्ते सुवर्ण पदकाने सबा शेख हिचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सबा मुश्ताक अहमद शेख हिचा मास्टर ऑफ सायन्स फिजिक्स (अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स) मधील यशाबद्दल राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



सबा शेखने मास्टर ऑफ सायन्स फिजिक्स (अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स) (भौतिकशास्त्रातून (अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स / मटेरियल सायन्स) मध्ये सर्वोच्च मिळवले आहे. सबा शेख यांना सोशल ऑफ स्कूल सायन्सचे संचालक डॉ. बी. जे. लोखंडे, डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. वैभव प्रक्षाळे, डॉ. उजमा बांगी यांचे मार्गदर्शन लाभले. सबा शेख ह्या सोशल हायस्कूलमधील पर्यवेक्षक यास्मिन शेख यांच्या कन्या, तर एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रो.करीम मुजावर यांच्या भाची आहेत.

### आर्टिफिशियल इंटेलिजन्स मशीन लर्निंग : बिल्डिंग द फ्युचर

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

भारत रत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केगाव येथील प्राचार्य डॉ. अनिल के. देशमाने यांचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स मशीन लर्निंग: बिल्डिंग द फ्युचर हे नववे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.



प्राचार्य डॉ. देशमाने यांच्या ९ व्या पुस्तकाचे प्रकाशन

प्रा. डॉ. देशमाने यांना शैक्षणिक क्षेत्रात ३२ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यात त्यानी २० वर्षे तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्य केले आहे. तसेच, दोन वर्षे ते तुळजाभवानी इंजिनिअरिंग कॉलेज, तुळजापूर येथे मान्यताप्राप्त प्राचार्य म्हणून कार्यरत होते. त्यांच्याकडे भगवंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी येथे १० वर्षांचा प्राचार्य म्हणून अनुभव आहे. सध्या, ते भारत रत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर येथे प्राचार्य/ संचालक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर यांचे पीएचडी चे मार्गदर्शक म्हणून देखील काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थ्यांनी पीएचड केली आहे. त्यांनी डीबाटु विद्यापीठामध्ये अभ्यास मंडळावर काम केले आहे. प्रा. डॉ. देशमाने यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांच्या नवीन पुस्तकामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंगच्या क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल सखोल माहिती दिली आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांना, शास्त्रज्ञांना आणि उद्योग क्षेत्रातील तज्ञांना नवीन तंत्रज्ञानाच्या दिशेने मार्गदर्शन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या या कार्यास संस्थेचे अध्यक्ष रविंदजी गायकवाड व संस्थेचे सचिव अनामिका गायकवाड आदींनी शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. देशमाने यांच्या या योगदानामुळे शैक्षणिक व तंत्रज्ञान क्षेत्रात एक नवा ठसा पडेल, हे निश्चित आहे.

### केमिस्ट असोसिएशनचा ७५ हजार बॉटल रक्त संकलनाचा मानस, आज रक्तदान

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष आदरणीय माजी आमदार जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त देश पातळीवरील भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात देखील ३५ ठिकाणी वर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने सोलापूर शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन शुक्रवार दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पोलीस कल्याण केंद्र, सेवासदन शाळे जवळ, सरस्वती चौक सोलापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण भारतात श्री जगन्नाथ अप्पा शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५००० बॉटल रक्त संकलन करण्याचा आमच्या मानस आहे. रक्तदानासाठी ९७३००३९००० या मोबाईलवर संपर्क साधावा, असे सोलापूर जिल्हा संघटनेच्या अध्यक्ष वेंकटेश पुजारी, सचिव राजेश विरपे, खजिनदार प्रशांत खलीपे यांनी कळविले आहे.

### शासकीय, निमशासकीय अधिकाऱ्यांना ग्रेट पद्म-परफार्मन्स अवॉर्डने सन्मानित

**सालापूर, दि.२२ जानेवारी-**

श्री मार्कडेय सोशल पाउंडेशन आणि पद्मशाली सखी संघम् यांच्या संयुक्त विद्यमाने माजी महापौर स्व. महेश कोठे यांच्या स्मृत्यर्थ शासकीय, निमशासकीय अधिकाऱ्यांना ग्रेट पद्म-परफार्मन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती गौरीशंकर कोंडा व मेघा इट्टम यांनी दिली. नागरिकांची कामे वेळेत करुन देणाऱ्या शासकोय, निम शासकीय अधिकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याच्या उद्देशाने या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल, बुके असे या पुरस्काराचे स्वरुप राहणार आहे.

# कासेगावात दारुबंदीची अंमलबजावणी केवळ कागदावरच...

**ठराव पारित करून लोटले वर्ष**

**महिला ग्रामसभेमध्ये केला होता ठराव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जानेवारी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत महिलांनी एकत्रित येत ग्रामसभेमध्ये दारूबंदीचा ठराव केला होता. परंतु वर्ष उलटून गेले तरीही गावातील दारुबंदी झालीच नाही. त्यामुळे महिलांसमोर मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. गावात दारूबंदी कधी होणार? दारूबंदीची अंमलबजावणी कधी सुरू होणार? असा प्रश्न आता महिलांना सतावत आहे. दरम्यान, कासेगाव येथील प्रसिद्ध अशा श्री शंभू महादेव मंदिरात गावचे सरपंच यशपाल श्रीकांत वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक वर्षांपूर्वी विशेष अशी महिला ग्रामसभा बोलवण्यात आली होती. या विशेष महिला ग्रामसभेत दारूबंदीचा प्रश्न ऐरणीवर होता. कसेगावातील अनेक तरुणांना व्यसनाधीनतेकडे वळवण्यात अवैध दारू धंद्यांचा मोठा हात आहे. असे सर्वांना निदर्शनास आणून देत, सदरचा अवैध दारू व्यवसाय बंद करण्यासाठी गावात दारूबंदी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



या दारूमुळे अनेक घराघरात भांडण-तंटे निर्माण होत आहेत. पर्यायाने अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. तर काही उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. याला आळा घालण्यासाठी तसेच अवैध दारू व्यवसायांना चाप बसावा यासाठी हे महत्त्वाचे पाऊल महिलांनी ग्रामसभेत उचलले होते. मात्र या सभेला वर्ष उलटून देखील ठरावातील दारूबंदी केवळ कागदावरच राहिलेले दिसत आहेत. गावात अवैध दारू व्यवसाय राजरोसपणे सुरू आहे. या अवैध व्यवसाया पाठीमागे अदृश्य शक्तीचा हात आहे. यामुळे गावातील वातावरण दूषित होत आहे. सदर सर्व अवैध व्यवसाय व दारू धंदे वेळीच बंद केले नाही झाले, तर गाव अधोगतीकडे वाटचाल करेल, यात शंका नाही. असे अनेक महिलांनी ग्रामसभेत शोकांतिका व्यक्त केली होती. गावातील तरुणांचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल तर हे दारूधंदे व सर्व गावातील अवैध व्यवसाय बंद करणे काळाची गरज आहे. सदर परिणामांचा विचार करून गावातील दारू धंदे बंद करण्यास व गावात व्यसनमुक्ती करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक्य आहे. त्यासंबंधीत विभागाला दारूबंदी ठराव पाठविण्यास महिला सभेने सर्वानुमते मंजुरी दिली होती.

**दारूबंदीचा एकमुखी ठराव केला होता**

गेल्या वर्षभरापूर्वी गावांमध्ये महिलांनी एकत्र येऊन दारूबंदीचा एकमुखी ठराव केला होता. त्यासंबंधीचे ठराव पोलीस अधीक्षक कार्यालय व तहसील कार्यालयाकडे पाठवून देण्यात आला होता. तरीदेखील यावर कारवाई झाली नाही. गाव व्यसनमुक्ती करण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. मात्र यामध्ये प्रशासनाने दखल घेण्याची अत्यंत गरज आहे.

**- यशपाल वाडकर, सरपंच कासेगाव**

**प्रशासन मात्र मूग गिळून गप्प**

गावाचा विकास व्हावा यासाठी ग्रामसभेमध्ये विविध ठराव पारित केले जातात. दारूबंदी हा ठराव देखील त्यातील महत्त्वाचा ठरावा असून, गतवर्षी हा ठराव महिला ग्रामसभेत मांडण्यात आला. त्याला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. परंतु जिल्हा प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे आणि काही राजकीय अदृश्य शक्तीमुळे या ठरावाची अंमलबजवणी होत नसल्याचे दिसत आहे. अवैध दारू व्यवसायाला वेळीच चाप बसावा अशी मागणी ग्राम स्थांमधून वारंवार केली जात आहे.

# कर विभागातील लाचखोर लेखनिकास अटक

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि २३ जानेवारी -**

महापालिकेच्या कर कमी भरून २८ हजार ७४५ रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या कर विभागातील लेखनी कास लाचरुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरुवारी सायंकाळी रंगेहात अटक केली

चंद्रकांत लक्ष्मण दोतुल (वय २९) असे अटक करण्यात आलेल्या लेखनीकाचे नाव आहे याबाबत सदर बाजार पोलीस ठाण्यात गुरुवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला

यातील तक्रारदार यांनी सोलापूर महानगरपालिका हद्दीमध्ये ३००० स्केअर फुट जागा नोटरी पद्धतीने खरेदी केलेली असून सदर जागेची कर आकारणीस नावाची नोंदणी करण्यासाठी तक्रारदाराने महानगरपालिकेच्या कर विभागाम ध्ये अर्ज सादर केला होता या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार हे पाठपुरावा करीत होते तक्रारदार यांचे ३००० स्केअर फुट नोटरी पद्धतीने खरेदी केलेल्या जागेची कर आकारणीस नोंद करण्याकरिता महानगरपालिकेतील कर आकारणी व कर संकलन विभागातील वरिष्ठ मुख्य लेखनिक चंद्रकांत दोतुल यांची तक्रारदाराने भेट घेतली असता दोतुल यांनी तक्रारदार यांना त्यांनी खरेदी केलेल्या जागेचा सण १९९२ ते मार्च २०२५ पर्यंतच्या कायदेशीर कर एक लाख ७७ हजार ७४५ रुपये भरण्यास सांगितला तेवढा कर भरायचा नसेल तर पन्नास हजार रुपये देण्यास सांगून त्यामधून सण १९९२ ते मार्च २०२५ पर्यंतचा कर भरल्याची पावती देतो असे तक्रारदारास सांगितले त्यामुळे तक्रारदाराने दोतुल यांच्याकडे ५० हजार रुपये दिले दोतुल यांनी ५० हजार रुपयांपैकी २१२५५ रुपये ऑनलाईन कर भरल्याची पावती तक्रारदारास देऊन उर्वरित २८ हजार ७४५ रुपये लाच म्हणून स्वीकारली याबाबत तक्रारदारा यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली तक्रारीची पडताळणी करण्यात आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोतुल यास अटक करून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला ही कारवाई उपाधीक्षक गणेश कुंभार पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक पोलीस हवालदार अतुल घाडगे सलीम मुल्ला स्वामीराव जाधव राजू पवार राहुल गायकवाड यांनी केली



# कवी कुसुमाग्रज पुरस्काराने महेश रायखेलकर सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सालापूर, दि.२२ जानेवारी-**

व्यंकटेशा कॉम्प्युटेकचे संचालक तथा कवी व लेखक महेश भालचंद्रराव रायखेलकर यांना सर्वद फाउंडेशन मुंबई या संस्थेतर्फे त्यांच्या आजपर्यंतच्या साहित्यिक यगदानाला अनुसरून 'कवी कुसुमाग्रज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तत्पूर्वी एका चित्रफितीद्वारे आजवरच्या त्यांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकण्यात आला. या सोहळ्याला चित्रपट निर्माते देवेंद्र खन्ना, अभिनेत्री श्रीमती पूनम चांदोरकर व स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रशंसा राऊत-दळवी हे उपस्थित होते. अभय इंटरनॅशनल स्कूल मुंबई येथे हा पुरस्कार सोहळा झाला. काव्यप्रेमी शिक्षक मंचचे जिल्हा अध्यक्ष या नात्याने वर्षभर राबविलेला कवी कट्टा हा उपक्रम, मागील दोन वर्ष चालू असलेला अशी सुचली मला हि कविता, सध्या चालू असलेला मला भावलेली कविता हा उपक्रम एकंदरीत साहित्यातील रायखेलकर यांचे योगदान या कामगिरीसाठी त्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. राष्ट्रीय अग्रमान्य आय.टी तज्ञ व लेखक डॉ.दीपक शिकारपूर लिखित नव उद्योजकांची यशोगाथा या पुस्तकात देखील त्यांच्या समावेश होता.

# पुणे रेल्वे स्थानकाला पेशव्यांचे नाव द्यावे

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २२ जानेवारी-**

पुणे रेल्वे स्थानकाला श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्यात यावे तसेच शनिवारवाड्याचे गतवैभव पुन्हा मिळवून देण्याच्यादृष्टीने केंद्र सरकार आणि राज्य सरकारने विशेष प्रयत्न करायला हवेत, अशी एकमुखी मागणी आज शनिवारवाड्याच्या २९३ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि आमदार हेमंत रासने यांच्या समोर करण्यात आली, ज्याला सकारात्मक प्रतिसाद देत ही मागणी केंद्र सरकारपर्यंत घेऊन जाण्याचे आश्वासन उभयतांनी यावेळी दिले. आजच्या कार्यक्रमात इतिहासतज्ञ व लेखक उदय कुलकर्णी यांचा विशेष सत्कार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.



थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारवाड्यावर घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे सरचिटणीस कुंदनकुमार साठे यांनी सर्वांचे स्वागत करुन ही मागणी जाहीरपणे मांडली. पुणे शहराची ओळख शनिवारवाड्याच्या महापराक्रमी बाजीराव पेशव्यांच्या इतिहासाची आहे. पुणे विमानतळाला जगदगुरु संत तुकाराम महाराजांचे नाव देण्यात येणार आहे, त्या पार्श्वभूमीवर बाजीराव पेशव्यांच्या इतिहासाचे स्मरण व्हावे आणि सर्वांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने पुणे रेल्वे स्थानकाला श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देणे उचित होईल अशी मागणी पेशवे प्रतिष्ठानचे कुंदनकुमार साठे, अनिल गानू, श्रीकांत नगरकर, चिंतामणी क्षीरसागर यांच्याबरोबरीने देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त सुधीर पंडीत, रमेश भागवत, सकल ब्राह्मण समाजाचे समन्वयक भालचंद्र कुलकर्णी, सचिन बोधनी, पुणे सार्वजनिक सभेचे नारगोळकर, भारत इतिहास संशोधक मंडळाचे पांडुरंग बलकवडे, सावरकर जयंती महोत्सवाचे प्रमुख सूर्यकांत पाठक तसेच पेशव्यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा आदींनी याप्रसंगी केली. यावेळी जगन्नाथ लडकत यांनी शनिवारवाड्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि बाजीराव पेशव्यांच्या पराक्रमाची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, शनिवारवाड्याचे गतवैभव पुन्हा नागरिकांना दिसले पाहिजे, यादृष्टीने एक चांगला प्रकल्प अहवाल तयार करावा आणि त्यासाठी राज्य शासनाच्या वतीने पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. खासदार कुलकर्णी म्हणाल्या की, पुण्याचा इतिहास सर्व जगाला समजला पाहिजे, पुण्याची ओळख शनिवारवाडा आहे, त्यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न करुन शनिवारवाड्याचे गतवैभव पुन्हा मिळवून दिले पाहिजे. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांना निवेदन देवून पुणे रेल्वे स्थानकाला बाजीराव पेशवे यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

# डब्ल्युआयटीमध्ये ग्रामीण जीवन संकल्पनेवर कला प्रदर्शन

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीआयोजित ग्रामीण जीवन संकल्पनेवर आधारित प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली कला प्रदर्शनाचे उद्घाटन इन्फर्मेशन टेक्नोलॉजी विभाग प्रमुख डॉ. एल.एम.आर.जे. लोबो आणि सौ. वर्षा शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. संजय सरसमकर कला प्रदर्शन प्रमुख प्रा. रश्मी दीक्षित उपस्थित होते. हे प्रदर्शन२४ जानेवारी पर्यत सर्वांसाठी खुले असून महाविद्यालयीन वेळेत कला प्रेमींना पहाता येणार आहे, त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालच्यावतीने करण्यात आले आहे.

डब्ल्यु.आय.टी. च्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा खऱ्या अर्थाने आर्ट एक्झिबिशन च्या निमित्याने अविष्कार होतो. ग्रामीण जीवन या कला प्रदर्शनाची संकल्पना आणि सेंटर ऑफ अट्रॅक्शन खेड्यातील शेतकऱ्याचे घर हा आकर्षक देखावा, फोटोग्राफी, कॅलिग्राफी, पॉट पेंटिंग आदींसह विविध १० प्रकारच्या कलाविष्कारांचा या प्रदर्शनामध्ये समावेश आहे. या प्रदर्शना अतंर्गत मागील आठवड्यापासून स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. प्रारंभी आकांक्षा पोटाबत्ती हिने कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. सूत्रसंचालन व स्वागत गोरख निंबाळकर याने केले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी वैष्णवी ग्रामोपाध्ये, आदित्य ढेपे, स्नेहल नारायणकर, सुयश स्वामी, वेदांत राठोड, अरुणेश टोणपे, आदित्य अनागोंडे, समर्थ घोलप, सुमित जैन आदी विद्यार्थी उपस्थित होते.

**''खेड्याकडे चला'' हा संदेश**

आज भारत प्रगतीच्या मार्गावर आहे, पण तरीही ग्रामीण भारताच्या समस्या कायम आहेत. रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा आणि पायाभूत सुविधा यामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची गरज आहे. ''खेड्याकडे चला'' हा संदेश आजही महत्त्वाचा आहे.

# दारुड्या पतीचा खून; पत्नीस उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

पळशी (ता. पंढरपूर) येथे चारित्र्यावर संशय घेणाऱ्या दारुड्या पतीचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेली आरोपी कुसुम शहाजी वाघमारे (रा. पळशी ता. पंढरपूर) हिला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला.

या प्रकरणाची हकीकत अशी की, पती-पत्नीच्या वादामुळे काही वर्ष शहाजी व कुसुम विभक्त राहिलेले होते परंतु पुन्हा शहाजी व कुसुम हे एकत्र राहत होते. चारित्र्याच्या संशयावरून शहाजी हा पत्नी कुसुमचा छळ करत होता त्यामुळे आरोपी कुसुम हिने पती शहाजी हा दारूच्या नशेत आहे याचा फायदा घेऊन पोटात चाकू मारून त्याचा खून केला व दवाखान्यात पतीचा अपघात झाल्याची खोटी एम एल सी नोंद करून दिशाभूल केली व खोटी माहिती दिली, या आरोपावरून कुसुम वाघमारे हिला पंढरपूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली होती. आरोपी कुसुम वाघमारे हिचा जामीन अर्ज पंढरपूर सत्र न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यानंतर आरोपी कुसुम वाघमारे हिने जामीन मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणीवेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले की, मयत शहाजी याने दारूच्या नशेत स्वतःच पोटात चाकू खुपसून घेतलेला आहे व तसे त्यांनी डॉक्टरांपुढे सांगितले आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तींनी आरोपी कुसुम वाघमारेचा जामीन अर्ज मंजूर केला. याप्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. पंकज देवकर यांनी यांनी काम पाहिले

# श्री सिद्धेश्वर फाउंडेशनतर्फे अनोखी श्रद्धांजली

**तिसरा दिवस वृक्षारोपणाने केला पूर्ण**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने ३५००हून अधिक झाडे सोलापुरात लावून जगविली आहेत.

सोलापूरचे उन्हाळ्यातील तापमान ४५ अंश सेल्सिअसवरून ३५ सेल्सियस करण्यासाठी संस्थेचे प्रयत्न सुरू आहेत. या कार्यामध्ये कै. शिवाजी सरडे यांचा मोठा सहभाग असायचा. ते अनेक वर्ष पोलीस दलात सेवेत होते. पीएसआय म्हणून ते सुमारे २८ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. दोन दिवसांपूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांचे जावई दिनेश जगदाळे व मुले



जितेंद्र, राजेंद्र यांनी श्री सिद्धेश्वर फाउंडेशनशी संपर्क साधला. नवोदय नगरमधील गणपती मंदिरासमोर वृक्षारोपण करून तिसऱ्याचा विधी संपन्न करण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे हा विधी संपन्न झाला.

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे यांनी आपला वाढदिवस, अशा प्रकारचे विधी, आपल्या पूर्वजांचे पुण्यस्मरण या पद्धतीने वृक्षारोपण आणि संवर्धन करून साजरी करण्याचे आवाहन सोलापूरकरांना केले. दिनेश जगदाळे यांनी सर्वांनी या श्री सिद्धेश्वर फाउंडेशन या वृक्षारोपण मोहिमेचे अनुकरण करावे असे आवाहन करून फाउंडेशन च्या कार्यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमास माढा, उळे येथील ग्रामस्थ व नवोदयनगरवासीय उपस्थित होते.

# मराठी भाषा माणसांना समृद्ध बनवते : डॉ. शिंदे

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

माणसा माणसांमधील संवाद कमी होत आहे. त्यामुळे मराठी भाषेतून संवाद सर्वांनी वाढवला पाहिजे. प्रत्येकाने दोन पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. मराठी भाषा ही माणसांना समृद्ध बनवते. या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत, असे प्रतिपादन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघ यांच्या सहकार्याने ३० जानेवारी पर्यंत आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन केले आहे. मराठी भाषा-अभिजात दर्जा आणि आपण या विषयावर डॉ. शिवाजी शिंदे यांचे तसेच मराठी भाषा आणि पत्रकारिता या विषयावर पत्रकार सचिन जवळकोटे यांचे व्याख्यान झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर महापालिका



अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अमोगसिद्ध चेंडके, प्रा. नानासाहेब गव्हाणे यांनी केले. आभार प्रदर्शन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले. याप्रसंगी मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, कार्यवाह गिरीश दुनाखे, मसाप दक्षिण सोलापूर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे आदी उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २४ जानेवारी २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त

### अक्कलकोटमध्ये चंदन चोरणारी टोळी गजाआड

**अक्कलकोट, दि.२३ जानेवारी-**

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे कडुन चंदन चोरणारी टोळी गजाआड करून त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील ४५ हजार रुपये रोख रक्कम आणि अंदाजे २० फूट उंच वाढलेले चंदनाचे एक झाड व दोन मोटरसायकल पोलिसांनी जप्त करून चार जणांना ताब्यात घेतले आहे. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे लाडलेमशाक सैपन नदाफ (रा. चपळगाववाडी, ता. अक्कलकोट) यांनी २२ जानेवारी रोजी फिर्याद दिली होती. या गुन्ह्यातील फिर्यादी बटईने करत असलेल्या सतीश दोळ्याळे यांच्या शेतातून कोणीतरी अज्ञात चोरट्याने शेतातील विहिरीच्या बाजूला उगवलेले चंदनाचे झाड विनापरवाना तोडून चोरुन नेले होते. पोलीस निरीक्षक राजेद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी पथकातील अंमलदारांनी पोलीस मित्र व गोपनीय बातमीदारामार्फत गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन संशयित आरोपी आकाश शिवशंकर टणकेदार, महेश स्वामीनाथ कोळी, अमरेश नारायण माने, सचिन नागनाथ सातपुते (सर्व रा. जेऊर, ता. अक्कलकोट) यांना अटक केली. ही कामगिरी पोकॉ जवळगे, पोकॉ शिंपाळे, पोकॉ उपाध्ये, पोकॉ देडे, पोकॉ स्वामी, पोकॉ शिंदे यांनी केली. तपास पोहेका रफिक शेख करत आहेत.

### शासकीय कामात अडथळा; आरोपी निर्दोष

**बार्शी, दि.२२ जानेवारी-**

बार्शी येथील अवैध वाळू वाहतुक प्रकरणी वाळू वाहतुकीचे व ट्रकचे कागदपत्रे न दाखवल्याने चौकशीसाठी घेऊन जाताना धक्का मारुन पळून जाऊन शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी आरोपी म हादेव शिवाजी मांगडे याची येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे साहेब यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. यातील हकिकत अशी की, दि. ८ जानेवारी २०१६ रोजी सायंकाळी ०६.३० वा.चे सुमारास तहसीलदार बार्शी यांनी फिर्यादी प्रविण अशोक पवार, मंडळ अधिकारी यांना फोनव्दारे कळविले की मालट्रक नं.एम. एच.१२ ईक्यु ६३८१ चालक ट्रकमधून अवैध वाळूची वाहतूक करीत आहे. तुम्ही व इतर कर्मचारी घेऊन खांडवी रोडला थांबून सदर ट्रक चेक करणेबाबत कळविले. बाबुराव आप्पाराव जमादार, मंडल अधिकारी, पानगाव, अमजदअली महमुदअली सय्यद, तहसील कार्यालय शिपाई असे दोन मोटरसायकलवरुन बार्शी बायपास रोडवर हॉटेल ऋतूचे जवळ जावून थांबले. थोड्याच वेळात कुर्डूवाडी रोडने सदर क्रमांकाचा ट्रक त्यास सर्वांनी मिळून अडवला. त्यावेळी सदर ट्रक चालकास नाव पत्ता विचारले असता त्याने काही एक माहिती दिली नाही व कागदपत्रे दिली नाही. म्हणून त्याला सदरचा ट्रक पोलीस ठाणे येथे घेण्यास सांगितले. ट्रक बार्शी रोडने शासकीय गोडाऊन उपळाई रोड बार्शी येथे आले असता सदर चालकाने ट्रक थांबवून खाली उतरला. त्यावेळी त्याने मी ट्रक पोलीस स्टेशनला घेणार नाही तुम्हाला काय करायचे ते करा, असे आरडाओरडा करुन दमदाटी करुन फिर्यादी सोबतचे अमजतअली सय्यद यांना धक्का मारुन ट्रकची चावी घेऊन पळून गेला. पोलिसांनी तपास करुन आरोपी महादेव शिवाजी मांगडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. आरोपीतर्फे अ‍ॅड. महेश जगताप यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. न्यायालयाने युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीस सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले. आरोपीतर्फे अ‍ॅड. महेश जगताप, अ‍ॅड. राहुल कसबे, अ‍ॅड. केदार पाटील, अ‍ॅड. आदित्य काकडे यांनी तर सरकार पक्षातर्फे अ‍ॅड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले.

### मतदानाची गोपनीयता भंग; एकाविरुद्ध गुन्हा

**बार्शी, दि.२३ जानेवारी-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ दरम्यान बार्शी शहरातील मतदान केंद्रावर गोपनीयता भंग केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दिपक धर्मराज सुरवसे (रा. बुरुड गल्ली, बार्शी) यांनी मतदान करतानाचा व्हिडीओ तयार करुन तो सोशल मीडियावर व्हायरल केल्यामुळे त्यांच्यावर बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत क्षेत्रीय अधिकारी अजित वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, २० नोव्हेंबर २०२४ रोजी शेठ अगरचंद कुंकूलोळ प्रशाला येथील मतदान केंद्र क्रमांक ९४ वर मतदान सुरु असताना सुरवसे यांनी मतदान करतानाचा व्हिडीओ तयार केला. हा व्हिडीओ नंतर सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेमुळे भारत निवडणूक आयोगाच्या मतदान गोपनीयतेच्या नियमांचा भंग झाल्याचे स्पष्ट झाले आहे. १३ जानेवारी २०२५ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी शेख यांनी या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर व्हिडीओची तपासणी करचन तो संबंधित मतदान केंद्राचा असल्याचे स्पष्ट झाले. क्षेत्रीय अधिकारी अजित वाघमारे यांनी यासंबंधीची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल केली. तक्रारीसोबत व्हिडीओ क्लिप, मतदान केंद्राची यादी आणि इतर संबंधित पुरावे सादर करण्यात आले आहेत. याप्रकरणी सुरवसे यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १२८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार शिंदे गटात?

## शिंदे गटाच्या नेत्याचा मोठा दावा; उद्या पहिला ट्रेलर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २३ जानेवारी-**

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला आलेल्या अपयशानंतर महाविकास आघाडीत बिघाडीची शक्यता वर्तवली जात आहे. असं असतानाच आता काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाला धक्का बसणार असल्याची चर्चा राजकीय वर्तळात आहे. याचं कारण म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एक मोठा दावा केला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार, १० माजी आमदार आणि काँग्रेसचे ५ आमदार लवकरच शिवसेना शिंदे गटत प्रवेश करतील, असा मोठा दावा उदय सामंत यांनी आज (२३ जानेवारी) माध्यमांशी बोलताना केला आहे. तसेच याचा पहिला टप्पा उद्या पार पडणार असल्याचंही उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

मी आज पत्रकार परिषदेत सविस्तर बोलणार आहे. मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सलग तिनवेळा दवोसला जाण्याची संधी दिली. त्याचाच भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात एवढी मोठी गुंतवणूक येत आहे. मात्र, मी दोन दिवसांपूर्वी सांगितलं होतं की, काही नेते बालिश झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता न बोललेले बरं, मी त्यांच्याबाबत नंतर सविस्तर बोलणार आहे. ज्यांचा राजकीय अस्त झाला आहे ते आता त्यांचा राजकीय 'उदय' करण्यासाठी माझ्या नावाचा उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे हा माझा मोठेपणा आहे. पण अशा कोणत्याही बालिश विधानामुळे माझ्यात आणि एकनाथ शिंदे यांच्यात दरी निर्माण होणार नाही, असं म्हणत उदय सामंत यांनी संजय राऊत यांच्यावर हल्लाबोल केला. उदय सामंत पुढे म्हणाले, मी आधीही सांगितलं होतं की एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात उद्यापासून ठाकरे गटाला खिंडार पडण्यास सुरुवात होईल. याचा पहिला ट्रेलर उद्या (२४ जानेवारी) तुम्हाला पाहायला मिळेल. ठाकरे गटाचे ४ आमदार, ३ खासदार, काँग्रेसचे ५ आमदार आणि ठाकरे गटाचे १० माजी आमदार व असंख्य जिल्हाप्रमुख हे एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेमध्ये सामील होतील. याचा पहिला टप्पा म्हणून उद्या रत्नागिरीत पहिला पक्ष प्रवेश होणार आहे, असा दावा उदय सामंत यांनी केला आहे. रत्नागिरीतील काही माजी आमदार हे ठाकरे गटाला सोडून शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार आहेत. त्यानंतर मी कोल्हापूरमार्गे सांगलीत जाणार आहे. त्यानंतर सातारा आणि साताऱ्यानंतर पुणे असा पहिला टप्पा आहे. माझ्या नावाची बदनामी करणाऱ्यांना माझं आव्हान आहे की त्यांनी आमच्या पक्षात येणाऱ्यांचे पक्ष प्रवेश रोखून दाखवावे. आता तुम्हाला उद्यापासून ठाकरे गटातून दररोज एकजण फुटल्याची बातमी पाहायला मिळेल, असा दावा उदय सामंत यांनी केला आहे.

### जिल्हा दूध संघ संचालकांच्या बरखास्तीचा ५ फेब्रुवारीला निर्णय

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

जिल्हा सहकारी दूध संघाचे संचालक मंडळ बरखास्त का करू नये, अशी विचारणा विभागीय सहनिबंधक (दुग्ध) यांनी नोटीसीद्वारे विचारणा केली होती. त्या पार्श्वभूमीवर काल (बुधवारी) सुनावणी झाली. त्यात संचालकांचे वकील जन्मेजय खुर्जेकर यांनी म्हणने सादर करण्यासाठी मुदत मागितली. त्यांचे मागणी मान्य करीत पुढील सुनावणी ५ फेब्रवारी रोजी ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा सहकारी दूध संघाचे संचालक मंडळ बरखास्त करावे, अशी मागणी दूध संघ बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष अनिल आवताडे, उपाध्यक्ष भाऊसाहेब धावणे यांनी विभागीय सहनिबंधकांकडे केली होती. त्यानुसार संचालक मंडळाच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी लेखापरीक्षक पी.आर. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली होती. शिंदे यांनी चौकशी करून दिलेल्या अहवालानुसार संचालक मंडळ बरखास्त का करू नये? अशी विचारणा करण्यात आली होती. त्याच पार्श्वभूमीवर पुढील कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले.

# अक्कलकोटमध्ये पादत्राणे कक्षांचा विस्तार

**• मुरलीधर मंदिरासमोरील जागेतही पादत्राणे कक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी-**

सद्यस्थितीत भाविकांना आपली पादत्राणे ठेवण्याकरिता देवस्थानच्या दक्षिण महाद्वारालगत पादत्राण कक्ष आहे. या पादत्राण कक्षासह आता देवस्थानच्या मुरलीधर मंदिर समोरील जागेतही देवस्थानच्या पादत्राण कक्षाची (चप्पल स्टँड) स्थापना करण्यात आली आहे.




या पादत्राण कक्षाचे शुभारंभ आज गुरुवारच्या मुहूर्तावर मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी मंदिर समितीच्या स्वामी दर्शन व्यवस्थेच्या अनुषंगाने स्वामी भक्तांना सूचित करण्यात येते की प्रत्येक आठवड्यातील गुरुवार, शनिवार, रविवार, दर महिन्यातील पौर्णिमा, दिवाळी सुट्ट्या, नाताळ सुट्ट्या, स्वामींचे मंदिरातील वर्षभरात साजरे होणारे उत्सव व इतर सर्व शासकीय सुट्ट्या, साप्ताहिक सुट्ट्या इत्यादी कालावधीत मंदिरात परगावाहून स्वामी दर्शनाकरिता येणाऱ्या स्वामी भक्तांच्या होणाऱ्या गर्दीमुळे भाविकांसाठी मंदिराच्या दक्षिण महाद्वार येथील पादत्राण कक्षासह आता देवस्थान लगतच असलेल्या देवस्थानच्या मुरलीधर मंदिर समोरील देवस्थानच्या जागेत भाविकांच्या सोयीकरिता आणखीन एक पादत्राण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. दैनिक वृत्तपत्रांमधील बातम्यांची दखल घेत व स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी वेळोवेळी केलेल्या तोंडी सूचनेनुसार मंदिर समितीने हा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आता श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या बाहेरील परिसराची रचना लक्षात घेऊन समितीच्या या पादत्राण कक्षाची कायमस्वरूपी निर्मिती करण्यात आली असल्याचे स्पष्टीकरणही महेश इंगळे यांनी केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, स्वामीनाथ लोणारी, तुषार मोरे, संजय पवार, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, पवन पवार, प्रशांत गुरव, सुनील नायकोडी, सागर गोंडाळ, नरसोबा पवार आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

### वाल्मीक कराड रुग्णालयात दाखल

**छ. संभाजीनगर, २३ जानेवारी**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेले वाल्मीक कराड यांना पोटदुखीची तक्रार आल्यानंतर बीडमधील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली.

बुधवारी बीड येथील न्यायालयाने कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर ही घटना घडली. बीड येथील तुरुंगात नेल्यानंतर कराड यांनी पोटात दुखण्याची तक्रार केली. कारागृह प्रशासनाने बुधवारी रात्री सिव्हील हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र लिहिले. त्यानंतर डॉक्टरांच्या पथकाने तुरुंगात त्यांची तपासणी केली आणि औषधे लिहून दिली.

### उत्तम आरोग्यासाठी कलोपासना करावी : योगेश वेळापूरकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी-**

विद्यार्थ्यांनी नेहमीच फास्टफुड न खाता घरगुती आईच्या हातचे पौष्टिक अन्न खावे. सदृढ शरिरात सदृढ मन असते. आपले आहार आपली जीवनशैली ठरवत असते. विद्यार्थी दशेतील पोषण पुढे आयुष्यभरासाठी उपयोगी पडते. विद्यार्थ्यांनी कलोपासना, ज्ञानोउपासना व बलोपसाना करावे असे आवाहन डॉ. योगेश वेळापुरकर यांनी केले.



मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत परीक्षेच्या काळातील विद्यार्थांचा आहार व आरोग्याची काळजी यावर मार्गदर्शन येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत कॉपीमुक्त अभियानातंर्गत जनजागृती सप्ताह निमित्त गुरूवारी २३ जानेवारी रोजी परीक्षेच्या काळातील विद्यार्थांचा आहार व आरोग्याची काळजी याविषयावर प्रमुख पाहुणे डाँ.वेळापूरकर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर डाँ.योगेश वेळापुरकर, प्रशालेचे मुख्याध्यापक एस.एन.शिंदे, पर्यवेक्षक आर.एस.पडवळकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख वाय. पी.कबाडे, धनंजय वेसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.स्वागत व प्रास्तविक ए.एस. कोरे यांनी केले. प्रमुख पाहुणे डाँ.वेळापूरकर, धनंजय वेसकर यांचा सत्कार मुख्याध्यापक एस. एन. शिंदे यांनी केले. डॉ. वेळापूरकर म्हणाले, शरीराच्या पोषणांमध्ये आहार खुप महत्वाचा आहे.फास्ट, जंक फुड न खाता पोष्टिक साधी पोळी, भाजी, भात खावा. तणाव कमी करण्यासाठी दररोज व्यायामाची सवय लावुन घ्या. तर तुम्हाला कधीच डाँक्टरकडे जावे लागणार नाही असे सांगितले. सुत्रसंचालन ए.एस.कोरे यांनी तर आभार वाय. पी. कबाडे यांनी मानले.

# प्रशासनाने सर्वसामान्यांची कामे सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्वरित मार्गी लावावीत

## पालकमंत्री जयकुमार गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

शासनाने सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरू केलेल्या असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची आहे. त्यामुळे या प्रशासकीय यंत्रणेने सर्वसामान्यांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा तसेच यंत्रणेकडे येणारी कामे त्वरित मार्गी लावावीत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सर्व विभागांच्या आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, आमदार विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, राजेंद्र राऊत, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसात सात सुत्री कार्यक्रमाची उद्दिष्टपूर्तता करण्याचे निर्देश दिलेले आहेत त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व सर्व प्रशासकीय यंत्रणेने आपली जबाबदारी ओळखून कामे पूर्ण करावीत. या अंतर्गत सर्वसामान्यांना विविध सोयी सुविधा देण्याबरोबरच कार्यालयाची स्वच्छता करावी. तसेच ही स्वच्छता मोहीम राबवत असताना सर्वसामान्य नागरिकांना चांगली वागणूक देऊन त्यांची कामे त्वरित मार्गी लावण्याच्या दृष्टीने अधिकारी- कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या मनाची स्वच्छता ही केली पाहिजे, असे निर्देश त्यांनी दिले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादरीकरणाद्वारे सोलापूर जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती सांगितली. तसेच जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेले विविध योजना प्रकल्प याची माहिती दिली. त्याप्रमाणेच मुख्यमंत्री महोदयांचा शंभर दिवसात उद्दिष्ट पूर्तता कार्यक्रम याची सविस्तर माहिती दिली.

सोलापूर विमानतळ विषय सविस्तर माहिती देऊन माहे मार्च २०२५ मध्ये येथून प्रवासी विमान वाहतूक सुरू होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. महापालिका आयुक्त श्रीमती तेली यांनी सोलापूर महापालिकेची सविस्तर माहिती दिली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती बैठकीत दिली.



## अग्रलेख...

# असे काही जीवघेणे...

प्रवाशांच्या सुरक्षिततेस रेल्वे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याची ग्वाही वारंवार दिली जात असल्याने रेल्वेगाडीतून आश्वस्तपणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर एखाद्या क्षणाचा बेसावधपणा कसा घाला घालू शकतो, याचे दुःखद आणि विदारक उदाहरण बुधवारच्या संध्याकाळी महाराष्ट्राने अनुभवले आहे. संकटाची चाहूल लागल्यास वेळीच सावध व्हावे आणि संकटमुक्तीचे प्रयत्न करावेत, यासाठी जी काही साधने रेल्वे प्रवासात उपलब्ध असतात, तीच साधने जीवघेणी ठरली आणि रेल्वेगाडीच्याच रूपाने समोरून येणाऱ्या मृत्यूने पुष्पक एक्सप्रेसमधील १३ प्रवाशांवर घाला घातला. या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या सात प्रवाशांची ओळख पटली आहे, तर चार पुरुष आणि दोन महिला मृतांची ओळख पटलेली नाही, असे जळगावच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी राज्य सरकारला दिलेल्या माहितीवरून दिसते. जळगावपासून हाकेच्या अंतरावर घडलेल्या या दुर्घटनेमुळे महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. चाकातून धूर येत असल्याच्या शंकेने आगीच्या रूपाने संकट ओढवल्याच्या भीतीने काही प्रवाशांनी धोक्याची साखळी ओढून गाडी थांबविली आणि जीव वाचविण्यासाठी गाडीतून रुळांवर उड्या मारल्या. त्याच वेळी मृत्यूच्या रूपाने समोरून येणारी कर्नाटक एक्सप्रेस प्रवाशांना दिसली नाही आणि सावधगिरी बाळगून कर्नाटक एक्स्प्रेसच्या चालकाने गाडी थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही या मृत्यूने काही प्रवाशांवर घाला घातला, अशी प्राथमिक माहिती आहे. आता या दुर्घटनेची चौकशी होईल, मृतांच्या कुटुंबीयांना सरकारी मदत जाहीर होईल, शोक व्यक्त होईल आणि पुन्हा एकदा रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही ऐरणीवर येईल. अपघाताचे नेमके कारण चौकशीतून उघडकीस येईलच; पण या निमित्ताने सुरक्षिततेच्या मुद्द्याकडे नव्याने गांभीर्याने पाहणे रेल्वे प्रशासनाबरोबरच प्रवाशांसही भाग पडणार आहे. समोरून येणाऱ्या गाडीला वळणामुळे रुळांवर उतरलेल्या प्रवाशांचा अगोदर अंदाज आला नसावा आणि साखळी ओढल्यानंतर थांबलेल्या गाडीकडून दिला जाणारा सिग्नल ध्यानात येऊन गाडी थांबवेपर्यंतच्या क्षणात हा दुर्दैवी अपघात घडला, असेही सांगण्यात येते. गेल्या काही वर्षांत रेल्वे प्रवासातील सुरक्षा उपाययोजनांमुळे जीवघेण्या अपघातांची संख्या कमी झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी सुरक्षा उपायांत अजूनही काही त्रुटी आहेत, याची जाणीव या अपघाताने करून दिली आहेच.

नवे रेल्वेमार्ग सुरू करणे, विद्यमान रेल्वेमार्गांची देखभाल व दुरुस्ती, गंभीर रेल्वे अपघातांची चौकशी आणि रेल्वे प्रशासनाचे एकंदर व्यवस्थापन यांबाबतचा अहवाल रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाकडून संसदेच्या पटलावर ठेवण्याकरिता सादर करण्यात येत असतो. गेल्या २० वर्षांत, २००४ ते २०२४ या काळात देशात २,३८९ रेल्वे अपघात घडले आणि ५,२४२ लोकांनी प्राण गमावले. रेल्वेमार्गांची सुरक्षितता, सिग्नल यंत्रणांची देखभाल आदींसाठी गेल्या दोन वर्षांत सुमारे दोन लाख कोटी रुपये खर्च करण्यात आले. तरीही रेल्वे अपघातांच्या संख्येत घट झालेली नाही, तर गेल्या दोन वर्षांतील अपघातांच्या संख्येचा आलेख वाढताच राहिला असल्याचे रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाने गेल्या वर्षीच्या अहवालात नमूद केले आहे. २०२१-२२ मध्ये रुळावरून घसरल्यामुळे २७ रेल्वे अपघात झाले, तर २०२२-२३ मध्ये याच कारणामुळे देशाच्या विविध भागांत झालेल्या अपघातांची संख्या ३७ होती. या काळात रेल्वेगाड्यांची समोरासमोर टक्कर होऊन आठ अपघात झाले, तर आगीच्या चार घटना घडल्या. खराब रेल्वेमार्ग हे १५ अपघातांचे कारण ठरल्याचे स्पष्ट झाले. ८३ अपघातांमागे मानवी चूक हेच कारण होते, असेही अहवालात नमूद आहे. अशा अपघातांमुळे जीवितहानी तर होतेच; पण रेल्वेच्या मालमत्तेचीही हानी होते. गेल्या सुमारे १० वर्षांतील वेगवेगळ्या अपघातांमुळे साडेतीनशे कोटींहून अधिक किमतीचे रेल्वेच्या संपत्तीचे नुकसान झाले आहे. या बाबी लक्षात घेऊन सुरक्षा आयुक्तालयाने रेल्वे मंत्रालयाकडे केलेल्या अनेक शिफारशींवर कोणतीच कार्यवाही न करता त्या शिफारशी बासनातच राहिल्याची बाब या अहवालानेच उघड केली आहे. गेल्या १०-१२ वर्षांतील सर्वांत जुन्या म्हणजे २०१३-१४ मधील रेल्वे अपघाताबाबतचा चौकशी अहवाल डिसेंबर २०१४ मध्ये रेल्वे बोर्डाकडे सुपूर्द करण्यात आला होता. त्यावर हा अहवाल संसदेत सादर होईपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती. ही बाबही अशा दुर्घटनांनंतर स्पष्टपणे अधोरेखित होणे आवश्यक आहे. अशा जवळपास ९० शिफारशी व सूचनांवर कार्यवाही झालेली नाही, हा ठपका रेल्वे बोर्डावर रेल्वेच्याच सुरक्षा आयुक्तालयाने ठेवल्याने त्याचे गांभीर्य वाढले आहे.

बुधवारच्या पुष्पक एक्सप्रेस अपघातामुळे या अहवालातील एक महत्त्वाची शिफारस पडताळण्याची आवश्यकता दिसते. अशा दुर्घटनांनंतर कर्मचाऱ्यांकडून घटनास्थळाचे छायाचित्रण किंवा चलतचित्रण केले जाते. मात्र त्याची गुणवत्ता अनियमित असते, असे रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाचे मत आहे. या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याची गरज असून, त्यांना ड्रोनसारखी अत्याधुनिक छायाचित्रणाची साधने देणेही गरजेचे आहे. डब्यांच्या देखभालीच्या नोंदी संगणकीकृत करणे आवश्यक असते. त्यामुळे अपघातासारख्या दुर्घटना घडल्यास चौकशीच्या वेळी या नोंदीच महत्त्वाच्या ठरतात. रुळावरून गाडी घसरण्यामुळे होणाऱ्या अपघातांविषयी रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाची चिंता वाढली आहे. सिग्नल यंत्रणा स्पष्ट न दिसल्याने होणाऱ्या अपघातांत प्रवाशांच्या जिवावर बेतते. चेन्नई विभागीय क्षेत्रात या दोषामुळेच प्रवाशांचा मृत्यू ओढवल्यानंतर हे दोष दूर करण्याची शिफारस आयुक्तालयाने रेल्वे प्रशासनास केली होती. त्यानुसार कार्यवाही सुरू झाली असली, तरी ती संथ गतीने पुढे सरकत असल्याने अजूनही हा दोष पूर्णपणे दूर झालेला नाही, असे २०२२-२३ च्या त्या अहवालात म्हटले आहे. भुसावळच्या अपघातामागील कारणांचा शोध घेताना हा मुद्दा बहुधा चौकशीच्या केंद्रस्थानी राहू शकतो. रेल्वेगाड्यांतील आगीसारख्या दुर्घटना आटोक्यात आणण्यासाठी करण्यात येणाऱ्या अंतर्गत अग्निशमन यंत्रणाच आगीमुळे नष्ट झाल्याचेही काही दुर्घटनांत दिसून आले आहे. असे झाल्यास चौकशीकरिता गरजेच्या असलेल्या नोंदी मिळविणे शक्य होत नाही व चौकशी परिपूर्ण होत नाही. त्यामुळे या यंत्रणांच्या सुरक्षिततेचे उपाय अधिक बळकट करणे गरजेचे असते. अपघात घडल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये होणारी बातचित नोंदविणारी यंत्रणा अस्तित्वात असेल, तर चौकशीत त्याचाही उपयोग शक्य असतो. त्याशिवाय दुर्घटनेनंतर किमान ३० दिवसांपर्यंत अशा घटनांचे सीसीटीव्ही चित्रीकरण उपलब्ध राहील यासाठी आवश्यक सुधारणा केल्या पाहिजेत. अशी कोणतीही व्यवस्था सध्या अस्तित्वात नाही.

दोन वर्षांपूर्वी २ जूनला ओडिशामध्ये कोरोमंडळ एक्सप्रेस मालगाडीला धडकली आणि दुसऱ्या रेल्वेमार्गावरून येणारी दुरान्तो एक्सप्रेस या डब्यांवर आदळली. या विचित्र अपघातात सुमारे २७५ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. सिग्नल यंत्रणेतील बिघाडामुळे व तो वेळीच दुरुस्त करण्यात हयगय झाल्याने हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक निष्कर्ष त्या दुर्घटनेनंतर काढला गेला होता. कोणताही अपघात दुर्दैवीच असतो आणि तो टाळण्यासाठी कोणा एका यंत्रणेचे प्रयत्न पुरेसे नसतात. जळगावच्या पारधडे रेल्वे स्थानकाजवळ बुधवारी घडलेल्या या दुर्दैवी अपघाताने प्रवाशांनाही सावधगिरीचा संदेश दिला आहे. एखादी अफवा उठते आणि जिवाची पर्वा न करता जीव वाचविण्यासाठी कोणी जिवावर उदार होऊन जीवघेण्या संकटात स्वतःस ढकलतात, तेव्हा केवळ अशा अपघातांची चौकशी करण्याचा तांत्रिकपणा पुरेसा ठरत नाही. ही घटना दुर्दैवी आहेच; त्यातील निरपराध प्रवाशांच्या मृत्यूमुळे सर्वत्र शोकाचे वातावरण आहेच आणि सांत्वनाचे सूरही उमटत आहेत. तरीही काही कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि समंजसपणा यांची जाणीव ठेवून सावधगिरी बाळगली तर जीवघेण्या संकटातून वाचविणे शक्य होते. चाकातून ठिणग्या येत असल्याचे पाहून कोणीतरी आगीची आवई उठविली आणि जिवाच्या आकांताने प्रवाशांनी गाडीतून रुळावर उड्या टाकल्या. अशा भयाच्या काळात विवेक आणि विचाराचे संतुलन राखणे मानसिकदृष्ट्या अवघड असते हे खरेच, पण सामूहिक मानसिकतेपुढे कधी कधी वैयक्तिक मानसिकता दुबळी ठरते. या अपघातातही तसेच काहीसे झाले असावे. सामूहिक समंजसपणा हाच यावर उपाय ठरू शकतो. तो रुजविण्यासाठीदेखील प्रयत्न व्हावयास हवेत.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (११)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

महर्षी व्यासांनी लिहिलेले महाभारत हे महाकाव्य साहित्याच्या क्षेत्रात 'अक्षय', 'अक्षर', 'अमर' संजीवक ज्ञानाचा ठेवा म्हणून आज जगमान्य झाले आहे. रामायण आणि महाभारत ही दोन महाकाव्ये म्हणजे विराट पुरुषाचे, सनातन धर्म पुरुषाचे सूर्य आणि चंद्रासारखे डोळे आहेत. भारतीय संस्कृतीने त्यांच्या माध्यमातून संपूर्ण विश्व-ब्रह्मांडाचे अवलोकन केले आहे. त्यांतूनच भारतीय जीवन पद्धती, आचारसंहिता, वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, विविध क्षेत्रातील उदात्त शाश्वत, नैतिक जीवनमूल्ये निर्माण झालीत. त्या शाश्वत जीवन मूल्यांना धरून प्रवाहित होणारी जीवनशैली हेच भारतीय जीवन पद्धतीचे म्हणजे हिंदू संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. महाभारत म्हणजे महर्षी वेद व्यासांची वाणी, म्हणजे ऋषिवाणी ऋषी हे मंत्र द्रष्टे म्हणजे 'दिक' आणि 'काल' यांना भेटून भविष्याचा वेध घेणारे. त्यामुळेच त्यांच्या वाणीतून प्रस्फुटित झालेले सिद्धांत हे शाश्वत सिद्धांत ठरतात. युगानुयुगे ते सिद्धांत त्या त्या स्थल-काल निरपेक्षतेने, कमी-अधिक प्रमाणात अनुभवायला येतात. परिस्थितिजन्य घटक, संदर्भ बदललेले असले तरी सत्यानुभूतीचा गाभा (स्पिरीट) कायम असतो.

महाभारतात प्रकट झालेली भगवद्‌गीता! वेदकाळापासून तो महाभारत काळापर्यंत जे जे संपूर्ण ज्ञान निर्माण झाले, सांगितल्या गेले त्या सर्व विविध ज्ञान शाखांचे अतिशय सघन, सर्वस्पर्शी, विवेचन आणि परस्परांशी कोणत्याही प्रकारचा विसंवाद निर्माण होऊ न देता केलेले समावेशन आहे. त्यामुळेच गीतेला सर्वसमावेशक गीता, सर्वशास्त्रसंग्रहिणी गीता, सर्वतत्त्वदर्शिनी गीता अशा विविध नावांनी संबोधिले जाते. भगवदगीता ही जशी सर्वज्ञान विज्ञानाचे भाष्य, माहात्म्य वर्णन करते, त्याचप्रमाणे महाभारत काळापर्यंत विविध राजकीय विचारांचे, तत्त्वज्ञानाचे, जे अनेक प्रवाह, पद्धती, नीती निर्माण झाल्या होत्या त्या सर्वांचे एक समयावच्छेदेकरून युधिष्ठिराला उपदेश करण्याच्या निमित्ताने राजधर्माचे समग्र विवेचन, शांतिपर्वात महर्षी व्यासांनी पितामह भीष्मांच्या तोंडून केले आहे. महाभारताच्या दृष्टीने 'भगवद्‌गीता आणि 'शांतिपर्व' हे दोन व्यावहारिक जीवनात राष्ट्राचा, समाजाचा, व्यक्तीचा 'अभ्युदय' आणि 'निःश्रेयस' कसा साधावा, संपन्न करावा, याचे मूलगामी चिंतन करणारे दोन आयाम आहेत. कोणत्याही सार्वभौम, समर्थ, अजिंक्य असणाऱ्या राष्ट्र, समाज, संस्कृतीसाठी, जगाच्या धकाधकीच्या मामल्यात टिकण्यासाठीच नव्हे, तर द्रुत गतीने विकसित होण्यासाठी वरील दोन्हीही विचारधारा या रथाच्या दोन चाकांप्रमाणे अत्यावश्यकच असतात, हा महाभारताचा संदेश आहे. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया', 'फ्रॉम चंद्र-मंगळ यान ते ऑटोमिक सबमरीन, ब्रह्मोस ते पृथ्वी-अग्नी (४) मिसाईल्स या विविध शस्त्र-अस्त्र सिद्धतेमुळे जणू चक्रवर्ती भरताचे वंशज हे 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र शास्त्र चिंता प्रवर्तते' या महाभारतात निर्देशित संदेशाचे पालन करीत आहेत, असे सुखद वातावरण चित्र निर्माण झाले आहे. हे परिवर्तन देश स्वतंत्र झाल्यापासून सुमारे सात दशके (१९४७-२०१४) इतक्या प्रदीर्घ काळात का झाले नाही? त्याचेही उत्तर आपल्याला महाभारतातच सापडते.

### राजा कालस्य कारणम्

या आधी वर्णन केल्याप्रमाणे महाभारतातील 'शांतिपर्वात' पितामह भीष्मांनी युधिष्ठिरास राजधर्माचा संपूर्ण इतिहास, विवेचन आणि राजा म्हणून करावयाच्या कार्यवाही, कर्तव्य धर्माचे मार्गदर्शन या संबंधात सखोल आणि विस्तृत मार्गदर्शन केले आहे. जिज्ञासूंनी मुळातूनच त्याचा आस्वाद घ्यावा. त्यांना विचारलेल्या विविध प्रश्नांच्या मालिकेत एक प्रश्न विचारला की, 'हे पितामह! राज्याच्या विनाशासाठी कोण कारण आहे?' त्याचे निःसंदिग्ध उत्तर देताना त्यांनी उत्तर दिले की, ''हे युधिष्ठिरा, राज्याचा, प्रजेचा विनाश करण्यास कालपुरुष कारणीभूत नसून राजाच कारण असतो. त्याच्या चांगल्या वा वाईट कृत्यांचा परिणाम म्हणून या राज्याचा, राष्ट्राचा विनाश वा विकास होत असतो. त्या राज्यातील प्रजा नष्ट होते, पण हे राजन! जो राष्ट्राधिपती, देशाधिपती सत्यनिष्ठ, धर्मतत्पर, मातृभूमीवर असीम प्रेम करणारा (आजच्या परिभाषेत देशहित सर्वतोपरी) जितेन्द्रिय शूर, देवतांवर प्रेम करणारा आणि बुद्धी, भक्ती, श्रद्धा या गुणांनी परिपूर्ण असणारा आहे, त्यांचे प्रजाजन हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुणार्थ यथास्थितपणे पार पाडू शकतात. म्हणजे आपले जीवन शांततेने, संकटरहिततेने घालवू शकतात.'' (शांतिपर्व - अ ६४ वा)

सन १९४७ ते १९६२ या कालखंडातील नेहरूंची राजवट, त्यानंतर कन्येचा पंतप्रधानकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी 'कामराज योजने'चा कुटिलतेने उपयोग करून कानाखालचे न राहणारे प्रखर देशभक्त असलेल्यांचे केलेले अहिंसामय शिरकाण, आपद्धर्म म्हणून मध्ये आलेल्या शास्त्रींचा ताश्कंद कराराच्या निमित्ताने संशयास्पदरीत्या केलेला बंदोबस्त, तेथून पुढे राजीव गांधी यांच्या स्फोटक मृत्यूपर्यंत एकाच घराण्याची पूर्ण सत्ता, एकछत्री अंमल, भारतावर राहण्याचा इतिहास घडला आहे. जो आपण अनुभवला आहे. त्या कालखंडात 'राजा कालस्य कारणम्' हाच महाभारतातील सिद्धांत सिद्ध झाला की नाही? आधुनिक युगात महाभारतातील सिद्धांत 'प्रजा कालस्य कारणम्', 'यथा प्रजा तथा राजा' असा बदलतो. विभूतिपूजेच्या, व्यक्तिमाहात्म्याच्या अंगी मुरलेल्या दोषामुळे, अनधिकारी स्वार्थी, भ्रष्टाचारी, हिंदू धर्माचा, परंपरेचा, द्वेष करणाऱ्या मुस्लिमधार्जिण्या मनोवृत्तीच्या पाश्चात्त्य संस्कृतीने पछाडलेल्या, चंगळवादाने ग्रासलेल्या, स्वतःच्या स्वार्थासाठी घटनेला पायी तुडवून लक्षावधी लोकांना कारागृहात डांबणाऱ्या आणि घराणेशाहीच्या हुकूमशाही मनोवृतीच्या व्यक्तींना चक्रवर्ती भरताच्या पवित्र सिंहासनावर आम्हीच बसविले होते ना?

सन १९४७ ने २०१४ या प्रदीर्घ कालखंडात प्रदूषित, अधर्मी संस्कार असलेल्यांच्याच हातात लोकशाहीसारखे पवित्र राज्यतंत्र होते. पण या धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या मुळे (कारण भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून सर्व प्रांतिक कमिट्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नावाची निवड केली होती.) त्या पवित्र लोकशाहीचे स्वरूपच या नतद्रष्टांनी बदलले, याचे विदारक वर्णन करताना एक राजकीय विचारवंत म्हणतो,

"Democracy means the government of the people, by the people and for the people"

पण, या राष्ट्रविघाती मनोवृत्तीच्या नेत्यांनी त्या व्याख्येचे स्वरूपच असे बदलवून टाकले-

Democracy means government OFF, the people, BUY the people and 'FAR' - the people लोकांपासून पूर्ण दुरावलेले, आणि विकत घेता येणारे (परदेशी फंडिंग) सरकार; पण...

...जनतेचा आत्मा जागृत झाला. ही जागृत जनशक्ती त्यागी, निःस्वार्थी, प्रखर राष्ट्रप्रेमी, लोकसंग्रही आणि लोक कल्याणेच्छु सामान्य व्यक्तीच्या मागे उभी राहिली आणि परिवर्तन झाले. महाभारताने म्हटलेच आहे- ''कुळाच्या हिताकरिता एका पुरुषाचा त्याग करावा. गावाच्या हिताकरिता कुळाचा त्याग करावा. देशाच्या हिताकरिता गावाचा त्याग करावा आणि आत्म्याच्या हिताकरिता पृथ्वीचाही त्याग करावा.'' (विदुर नीती - अध्याय ३७, श्लोक १७)

वरील आदेशाप्रमाणे हिंदुराष्ट्र आणि लोकशाही वाचविण्यासाठी 'नेहरू-गांधी' घराण्याचा सतत त्याग करावा. त्यातच भारत, हिंदू धर्म, लोकशाही आणि भारतीय राज्य घटनेची सुरक्षितता आहे.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**संजय रामगिरवार**

# व्याघ्र'काळ!'

देखण्या वैदर्भीय वाघांसाठी २०२५ हे नववर्ष जणू काळ ठरत आहे. या २२ दिवसांत तब्बल ११ वाघांचा मृत्यू बघावा लागला. यातील काही नैसर्गिक असले, तरी काही मृत्यूंना वन विभागाचा निष्काळजीपणा भोवला. जंगलाच्या एका राजपुत्राला ताडोबासारख्या संरक्षित क्षेत्रातही कुजेपर्यंत पडून राहावे लागते तर दुसऱ्याला आपल्या हक्काच्या जंगलातला रस्ता ओलांडताना रेल्वेच्या धडकेत जीव गमवावा लागतो, हे कशाचे लक्षण आहे.

वाघाची राजधानी म्हणून गर्वाची अनुभूती होत असताना, एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात २०० च्यावर वाघ असल्याचा अहंभाव प्रदर्शित करीत असताना, येथील वाघिणींना थेट ओडिशाच्या सिमलीपाल व्याघ्र प्रकल्पात स्थलांतरित करून मोठेपण मिरवताना आणि गतवर्षी तब्बल पावणेचार लाख पर्यटक एकट्या ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील वाघ बघायला आली म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत असतानाच, अवघ्या २२ दिवसात ११ वाघांचा मृत्यू होऊनही वन विभाग आणि संबंधित परिसंस्था कमालीची शांत आहे, हे धक्कादायक नाही का?

यंदाचे वर्ष सुरू होताच चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रात एका वाघाचा मृत्यू झाला. ११ जानेवारीला मूल बफरमध्ये अवघ्या पाच महिन्याच्या बछड्याचा बळी एका वाहनाने घेतला. १९ जानेवारीला सिंदेवाही परिक्षेत्रात रेल्वेच्या धडकेत एका वाघाला जीव गमवावा लागला तर दोन वाघांच्या झुंजीत २० जानेवारीला याच जिल्ह्यातील शिवनी वनपरिक्षेत्रात एक वाघ मृतावस्थेत आढळला. ६ जानेवारीला भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे एक रूपवान व रुबाबदार वाघ तीन तुकडे होऊन पडलेला आढळला. ७ जानेवारीला यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा वनविभागांतर्गत येणाऱ्या उकणी कोळसा खाण परिसरात अर्धवट कुजलेल्या अवस्थेत एक वाघ सापडला. ८ जानेवारीला नागपूरच्या देवलापार वनपरिक्षेत्रात वाघिणीच्या बछड्याचा मृतदेह बघावा लागला. असाच एक बछडा ९ जानेवारीला मूल बफरमध्ये मरण पावला. १४ जानेवारी रोजी गोंदिया जिल्ह्यातील भानपूर परिसरात



वाघाचा मृतदेह आढळला. १५ जानेवारीला नागपूर जिल्ह्यातील देवलापार वनपरिक्षेत्रात वाघाच्या बछड्याचाच मेलेला सापडला. अशा ११ वाघांच्या मृत्यूचे हे सत्र वर्षाचा पहिला महिना अजून शिल्लक असताना सुरूच आहे, हे चिंताजनक नाही का? एवढे होऊनही वाघ वाढले तर मृत्यू होणारच, अशी रूक्ष प्रतिक्रिया वनाधिकारी व्यक्त करीत असतील तर या वाघांचा 'काळ'च आला आहे, असे समजायला हरकत नसावी!

विदर्भातील केवळ ताडोबा प्रकल्पात ८७ वाघ, लागून असलेल्या ब्रह्मपुरी क्षेत्रात ५३, मध्य चांदाच्या जंगलात १०, वरोडा-भद्रावती क्षेत्रात १३, राजुरा परिसरात २, कन्हाळगाव क्षेत्रात १२ तर जुनोना क्षेत्रात २१ असे कमीत कमी १९८ वाघ आहेत. कमीत कमी आकडा म्हणजे, या सर्व वाघांची छायाचित्रे टिपली गेली आहेत. शिवाय या गणनेत बछड्यांची संख्या गृहीतच धरली नाही. कारण त्यांची केवळ नोंद होत असते. त्यांना मोजल्या जात नाही. असे जिल्ह्यात वाघाचे एकूण बछडे ५० ते ६० आहेत. प्रत्यक्षात वाघांची जास्तीत जास्त संख्या २५० च्याहीवर असू शकते. वाघांचे संवर्धन व्हावे यासाठी चंद्रपूर जिल्ह्यात पसरलेल्या विस्तीर्ण जंगलात विशेष काही करायची गरज भासत नाही. कारण येथे त्यांचे खाद्यान्न पुरेसे आहे. २०१५ मध्ये ताडोबात ७१, २०१६ मध्ये ७०, २०१७ मध्ये ७५, २०१८ मध्ये ८१, २०१९ मध्ये ८८, २०२० मध्ये ८५, २०२१ मध्ये ८५ आणि आता २०२२ मध्ये ८७ वाघांची नोंद झाली आहे. त्यातील काही वाघ वाघ नैसर्गिकरीत्या स्थलांतरित झाले आहेत. पण काहींनी चंद्रपूर जिल्ह्यात धुडगूसही घातला आहे. त्यामुळे वन्यजीव व माणसांतील संघर्ष येथे दिसतो. पण म्हणून वाघांना कमी लेखायचे आणि त्यांचा मृत्यू हा सहज घ्यायचा ही मोठी चूक आहे. वाघ परिसंस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. त्याचे संरक्षण म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण होय आणि त्यासाठी माणसांनी संवेदनशील असणे आवश्यकच आहे. वाघाने माणसाचा जीव घेतला तर राजकीय पुढारी, समाजसेवक बेंबीच्या देठापासून ओरडतात. आता वाघांच्या होणाऱ्या मृत्युसत्रावर मात्र कुणीच बोलत नाहीत, हा दुजाभाव नाही का? याचाही विचार झाला पाहिजे. वाघांचे कॅरिडोर मोकळे करून देणे माणसाचे कर्तव्य आहे. पण निधी नाही म्हणून मूलसारख्या रस्त्यावर जेथे सातत्याने अपघात होतात आणि त्यात वन्यजीवांचा जीव जातो, त्यावरील पुलाचा प्रस्ताव धूळ खात पडला आहे. ही काय वाघाची चूक आहे?

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# बळ हरवलेल्यांच्या तोंडी स्वबळाची भाषा

**मोरेश्वर बडगे**

मोठ्या निवडणुकी संपल्या, त्याला दोन महिने उलटले. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडाला. त्या धक्क्यातून अजूनही विरोधक सावरलेले नाहीत. सुरुवातीला त्यांनी ईव्हीएमला खलनायक ठरवू पाहिले. रडारड करूनही उपयोग झाला नाही. आता साऱ्याच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वेध लागले आहेत. येत्या तीन-चार महिन्यात महापालिका निवडणुका लागू शकतात. महायुती केव्हाही तयार आहे; अडचण विरोधी पक्षांची आहे. विधानसभा निवडणुकीत मार खाल्ला. आता पुढे काय? महापालिका निवडणुकीला कसे सामोरे जायचे? ते त्यांना सुचेनासे झाले आहे. गेल्या आठवड्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे उबाठा पक्षाचे म्हणजे शिल्लक शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी स्वबळाची भाषा केली. लोकसभेसाठी इंडिया आघाडी होती, विधानसभेसाठी महाविकास आघाडी होती. आता पक्ष वाढवायचा तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांना संधी द्यावी लागेल, असा मुद्दा त्यांनी मांडला. विधानसभेत आपटी मिळाल्यानंतर महाविकास आघाडी तशीही मोडीत निघाली आहे. त्यामुळे राऊतांच्या भाषेने माजायचा प्रश्नच नव्हता.

उद्धव ठाकरे आपल्या 'मातोश्री' या घरून सहसा बाहेर पडत नाहीत. मुख्यमंत्री असतानाही ठाकरे शरद पवारांच्या घरी गेले नव्हते. मात्र आता गेले. उद्धव ठाकरे पुन्हा एकदा 'शरद बळ' मिळविण्याच्या धडपडीत आहेत, असे त्यावरून दिसते. पण सध्या 'स्वबळ' आहे कोणाकडे? 'मुंबई माझी'च अशी गर्जना करणाऱ्या ठाकरेंना विधानसभा निवडणुकीत मुंबईतील एकूण ३६ जागांपैकी फक्त १० जागा जिंकता आल्या. उरलेल्या राज्यात अवघ्या १० जागा मिळाल्या. बाळासाहेब ठाकरेंनी मिळविलेले स्वबळ उद्धव यांनी टिकवले असते तर आज शरद पवारांकडे धावण्याची पाळी आली नसती. पण मुख्यमंत्री होण्याचा कंडू शमवण्याच्या नादात उद्धव शरद पवारांच्या नादी लागले आणि सर्वस्व गमावून बसले. तुम्ही ४० वर्षांचा इतिहास काढा. शरद पवारांच्या आहारी गेलेले सारे संपले. शेकापचे नेते जयंत पाटील यांचे उदाहरण ताजे आहे. शरद पवारांच्या पाठिंब्यावर जयंत पाटलांनी विधान परिषद निवडणूक लढवली. पडले. शरद पवार आता संपले आहेत. त्यांच्याकडे बळ आहे ही अंधश्रद्धा आहे. काँग्रेसला सोबत घेऊन लढण्याचे जुगाड पवार जमवू शकतात. त्या जोरावर ५-५० नगरसेवक निवडून आणता आले तर मुंबईच्या राजकारणात थोडा तरी श्वास घेता येईल, असा उद्धव यांचा विचार असावा. पवारांच्या नादात महाराष्ट्राचे सिंहासन हातून गेले. गेली २५ वर्षे खिशात राहिलेली मुंबई महापालिका त्यांना सोडवत नाही. पण नाना पटोले आता उद्धव यांना सोबत घेण्याच्या मूडमध्ये अजिबात नाहीत. घाट्याचा सौदा कोण करेल. मात्र उद्धव यांना एक आशा आहे. गेल्या वेळेला शरद पवारांनीच सोनिया गांधी यांना शिवसेनेसोबत बसायला पटवले होते. पवारांनी पुन्हा एकवार महाविकास आघाडीची मोट बांधावी म्हणजे विरोधी ऐक्याच्या नावावर काहीतरी जागा मिळतील, असा उद्धव यांचा गेम आहे. पण यावेळेला सोनियाही तयार होणार नाहीत. महाविकास आघाडीच्या पोपटाने केव्हाच मान टाकली हे त्यांना छान समजले आहे. त्यामुळे यावेळी महाआघाडी वगैरे काही होणार नाही. मग निकाल सांगायला ज्योतिषी कशाला हवा?

राजकारण निष्ठूर असते. चुकीला माफी नाही. या जन्मीची फळं याच जन्मात भोगावी लागतात. दोन महिन्यांपूर्वी याच उद्धव ठाकरेंची काय भाषा होती? 'तू राहशील किंवा मी राहीन' अशा गुर्मीत उद्धव यांनी देवेंद्र फडणवीस यांना ललकारले होते. आपण मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आहोत, अशा मस्तीत उद्धव होते. जनतेने एका फटक्यात मस्ती उतरवली. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातला फरक पहा. सारे गमावल्यानंतर एकाला मुंबई महापालिका जिंकायचे डोहाळे लागले आहेत तर दुसरा दूर लाओसमध्ये सध्या भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रात काही लाख कोटी रुपयांची गुंतवणूक कशी आणता येईल यासाठी खपत आहे. अवघ्या दोन दिवसात महाराष्ट्राने १५ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. हा एक विक्रम आहे. ही गुंतवणूक आली तर १५ लाख तरुणांना काम मिळेल. या परिषदेसाठी फडणवीसांनी किती तगडे होमवर्क केले असेल, याचा अंदाज यावरून येतो. अर्थात सामंजस्य करार झाले म्हणजे ते सारेच उद्योग लगेच येतील अशातला भाग नाही. करार आणि प्रत्यक्ष गुंतवणूक यात फरक असतो. एकूणच विदेशी गुंतवणुकीचा विचार केला तर महाराष्ट्र इतर राज्यांच्या पुढे आहे. निम्मी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. बाहेरच्या उद्योगपतींना राजकारणाशी काही घेणेदेणे नसते. त्यांना आश्वासक वातावरण हवे असते. ते निर्माण करण्यात फडणवीस सरकारने यश कमावले, असा याचा अर्थ आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घ्यायला अवघी दोन महिने होत आहेत. या दोन महिन्यात सरकार बनलं. थोड्या विलंबाने का होईना, मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप आणि पालकमंत्र्यांचेही वाटप झाले. महायुतीमधला एकजिनसीपणा यातून दिसतो. मात्र राजकारणी अजूनही विकासाच्या मानसिकतेत यायला तयार नाहीत. राज्यात सध्या काय सुरू आहे? एका सरपंचाची हत्या झाली. त्यावरून झालेला गदारोळ पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीच्या तीन-तीन चाळण्या लावल्या. राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या निकटवर्तीयाला 'मकोका' लावण्याचे धाडस दाखवले. हत्येचा तपास निष्पक्ष पद्धतीने होतो आहे, असे वातावरण निर्माण केले. त्यामुळे सध्या बीड जिल्हा शांत आहे. मात्र तिकडे रायगड आणि नाशिक या दोन जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री वाटपावरून महाभारत सुरू झाले आहे. शिंदे सेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांना रायगडचे पालकमंत्रिपद हवे आहे. तिथे अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे यांना पालकमंत्रिपद गेल्याने गोगावले यांचे समर्थक पेटून उठले आहेत. नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपाचे मंत्री जळगावचे गिरीश महाजन यांना गेले आहे. तिथे शिंदे सेनेचे दादा भुसे आणि राष्ट्रवादीचे माणिकराव कोकाटे यांनी दावा ठोकला आहे. तसे पाहिले तर पालकमंत्री हे पद घटनात्मक नाही. मात्र जिल्ह्याच्या विकासासाठी येणारा निधी पालकमंत्र्यांच्या माध्यमातून वाटला जातो. जिल्ह्यावर पकड ठेवण्यासाठी राजकारणी या पदासाठी आग्रही असतात. आणखी तीन वर्षानि नाशिकला सिंहस्थ मेळा आहे. या मेळ्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार हजारो कोटी रुपयांचा निधी देते. २०१५ मध्ये झालेल्या सिंहस्थासाठी साडेतीन हजार कोटी रुपयांचा नियोजन आराखडा होता. यावेळी तर किमान १० हजार कोटी रुपये या मेळ्याच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यात जातील, असा अंदाज आहे. हे वाटप पालकमंत्र्यांच्या अखत्यारीत होणार आहे. चढाओढ आहे ती त्यामुळे. मात्र असंतुष्टांना कसे शांत करायचे याचे तंत्र मुख्यमंत्री फडणवीस यांना चांगले अवगत आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### ट्रोलिंगचे वाढते प्रमाण चिंताजनक

आपल्या समाजात एखाद्याची मानहानी करणे, चारित्र्यहनन करण्याची धमकी देऊन खंडणी वसूल करणे, समाजमाध्यमांवर मजकूर, छायाचित्र पोस्ट करणे, एखाद्याचे खासगी जगणे समाजमाध्यमांवर जाहीर काढणे, त्याच्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरूच ठेवणे, त्यावर आक्षेपार्ह टीकाटिपण्णी करण्याला सोशल मीडियात 'ट्रोलिंग' असे हायटेक दिले जाते. मात्र हे ट्रोलिंग महिला आणि पुरुषांच्या बाबतीत वेगवेगळे असते. पुरुषांच्या ट्रोलिंगमध्ये पुरुषार्थावर हल्ला केला जातो तर महिलेच्या बाबतीत चारित्र्य हे सॉफ्ट टार्गेट असतेश्र आपल्याकडे पुरुषांना नामर्द ठरवणे हे मानहानीचे अखेरचे टोक असते. याच मर्दानीपणाला जोडून पुरुषांच्या लैंगिक संदर्भाने ही मानहानी संबंधित पुरुषांच्या संपर्कात असलेल्या महिलांशीही जोडली जाते. केवळ लैंगिक संदर्भानेच आपल्याकडे एखाद्याची मर्दानगी ओळखण्याची पद्धत असल्याने या पलीकडे पुरुषांच्या कर्तृत्वाचे इतर संदर्भ दुय्यम ठरवले जातात. चारित्र्यहनन किंवा लोकलज्जा जाहीर करण्याचा धोका पुरुषांच्या सोबतच महिलांना अधिक असतो. एखाद्या महिलेच्या एखाद्या विधानाचे विविध अर्थ काढून चारित्र्यहनन करणे, विकृत आनंद मानणारे ट्रॉलर्स, खंडणीखोर युट्युबवर्सनी पत्रकारितेची अपरिमित हानी केली आहे. टीआरपीच्या स्पर्धेत टिकण्यासाठी या अनैतिक पत्रकारितेची लागण मुख्य प्रवाहातल्या प्रसार माध्यमांनी स्वतःला करून घेतली आहे. समाजमाध्यमांना धरबंधच नसल्याने तिथे कोणीही कोणावरही चिखलफेक करू शकतो. या चिखलफेकीच्या खेळातून आपण कोणाचे आयुष्य उद्ध्वस्त करत आहोत, कोणाला आयुष्यातून उठवत आहोत, संबंधितांच्या नागरिक आणि व्यक्ती म्हणून असलेल्या अधिकारात शिरण्याचा प्रयत्न करत आहोत, याचे भानही गुंडाळून ठेवले असते. व्यक्तिगत जीवनावर आरोप करण्याचा अधिकार कुणालाही नाही. अशा बेताल प्रवृत्तीच्या लोकांना सरकारनेही अंकुश लावणे आवश्यक आहे.



**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### आजकालचे बदलते आध्यात्मिक वातावरण

सध्या अध्यात्मावरील चर्चांचा सुकाळ झाला आहे. जेवणात हवे तसे मीठ वापरावे, तशी संत वचने व श्लोक वापरून मला सगळे समजते हा आविर्भाव दिसून येतो. खरे तर, साधू-संत, प्रवचन-स्वाध्याय, गुरूकडून मंत्रदीक्षा व जीवनातला सहजयोग हे विषय समजून आचरणात आणणे हे प्रमुख उद्देश हवे. केवळ सत्त्वरजतम, जड चेतन, आत्म अनात्म, ब्रह्म-माया, उपासना यावर अलंकारिक लिहून व्यक्ते होणे हे फारसे उपयोगाचे ठरणारे नाही. गायीच्या मानेला हळुवार गोंजारले तर तिला बरे वाटते एवढेच. त्यामुळे तिचे पोट मात्र भरत नाही. अंतर्मुख होऊन क्षीण झालेला सत्त्व गुण व ज्ञानाची उपासना शुद्ध कर्मांनीच केली पाहिजे. हे कर्म करण्यासाठीचे आधार साधना आहे. साध्य मात्र निष्काम कर्म योगाने प्राप्त होणाऱ्या चित्तशुद्धीनेच गाठता येते. म्हणून वेदउपनिषद काळात समित्पाणी (हातात यज्ञासाठी, समर्पण समिधा घेऊन) ज्ञानार्जन करण्यासाठी शिष्य दाखल होत तेव्हा त्यांची जिज्ञासा, चिकाटी व संयम तपासण्याकरिता गुरू सांगत असत, या. तुमचे स्वागत आहे, येथे राहा व या १०० गायींच्या १००० गायी झाल्यावर, मला जेवढे समजते तेवढे सांगण्याचा मी प्रयत्न करीन!' गुरूंची ही केवढी ऋजुता, नम्रता!

**मिलिंद वसमतकर**/९६६५० ७१७८३

### वाईट नियत व कपटी वृत्ती

समाजात वावरताना विविध प्रकारच्या व्यक्ती पदोपदी भेटत असतात. काही स्वच्छ व निर्मळ मनाच्या, काही विधायक वृत्तीच्या तर काही सरळ मार्गी असतात. अशा सरळ मार्गी जगणाऱ्या व्यक्ती आचारविचार व संचाराने सदैव विधायक आणि सकारात्मक वृत्ती व विचारांच्या असतात. अशा व्यक्तींच्या मनांत कपट, विश्वासघात वृत्ती ठेवून संपर्कात येणाऱ्यांचे अहित चिंतणे कदापिही येत नाही ते सदैव विधायक कार्य करीत राहतात. अशा व्यक्तीच्या चांगल्या व विधायक कार्याची दखल घेत समाजही अशा सर्वगुणसंपन्न व्यक्तींची वाहवा करीत असतो. याउलट समाजात वाईट नियत व वृत्ती असणाऱ्या व्यक्तीही असतात. त्यांचे विचार व आचार विघ्नसंतोषी असतात. त्यांना दुसऱ्यांचे चांगले कार्य व विचार सहन होत नाहीत. दुसऱ्याची निंदानालस्ती करणे हा त्यांचा उद्योग होऊन बसतो. अशा विघ्नसंतोषी व्यक्ती नेहमीच आपल्या विचारांच्या व्यक्तीसमवेत या सर्वगुणसंपन्न व विधायक कार्य करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध समाजमनात सदैव विष कालविण्याचे कुकर्म करीत असतात. अशी गुणवान व्यक्ती बदनाम कशी होईल, याचा सदैव विचार करून कटकारस्थान रचत असते. त्याचे पाय ओढण्याचा प्रयत्न करीत असते. ही कपट वृत्तीची व्यक्ती त्या सर्वगुणसंपन्न व्यक्तीच्या तोंडावर (समोर) त्यांचे गुण गाते; मात्र पाठीमागे निंदानालस्ती करून त्या आदर्श व्यक्तीला बदनाम करण्याची संधी शोधत असते. अशा विघ्नसंतोषी व वाईट नियत आणि कपटी वृत्ती असणाऱ्या व्यक्तींपासून समाजातील सर्वच थरातील व्यक्तींनी अतिसावध राहण्याची गरज आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दीड कोटी आंतरजातीय विवाह अनुदानाला ग्रीन सिग्नल

## मार्च महिन्यात अनुदान होणार जमा

### समाज कल्याण अधिकारी कवले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

जातीं जातींमधील अंतर व दुरावा कमी व्हावा, समाजामध्ये आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत आंतरजातीय विवाह योजनेअंतर्गत आंतरजातीय लग्न केलेल्या नवविवाहित दांपत्यांना अनुदान दिले जात आहे. हे अर्थसहाय्य मिळवण्यासाठी शासन स्तरावरून आर्थिक वर्षात ठराविक



निधींची तरतूद केली जाते. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत समाज कल्याण विभागाच्या मार्फत सदरचे अर्थसहाय्य दिले जात आहे. परंतु सन २०२३-२४ ते २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सुमारे दीड कोटींचे अनुदान अद्यापही प्रलंबित आहे. त्यामुळे आंतरजातीय विवाह केलेल्या नवदांपत्यांना अद्याप अनुदानाची प्रतीक्षा लागलेली आहे. मात्र आताही प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. मार्च महिना अखेर पर्यंत अनुदानाचा निधी लवकरच समाज कल्याण विभागाच्या खात्यावर वर्ग केला जाईल. त्यानंतर हे अनुदान संबंधित लाभार्थ्याच्या जॉईंट बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीने जमा होणार आहे.

दरम्यान, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनाच्या वतीने जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत सदरची योजना राबवली जात आहे. सोलापूर जिल्ह्यातून सन २०२३-२४ ते २०२४-२५ या आर्थिक वर्षात समाज कल्याण विभागाकडे सुमारे ३०० प्रस्ताव यासाठी दाखल झालेले आहेत. चालू आर्थिक वर्षातील बजेटमध्ये यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. सुमारे दीड कोटींच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या बजेटमध्ये सादर करण्यात आला आहे. त्यावर अंतिम शिक्कामोर्तब होऊन मार्च अखेरपर्यंत सदरचा निधी संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल असे समाज कल्याण विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

लोकसभा व विधानसभा निवडणूक, यासाठी लागलेली आचारसंहिता यामुळे सदरचा निधी वर्ग करण्यात अनेक अडथळा निर्माण आला होता. मात्र आता बजेट बैठक होऊन त्यामध्ये विशेष निधीची तरतूद करण्यात आल्याने आंतरजातीय विवाह अर्थ सहाय्य अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना लवकरच या निधीचा लाभ मिळणार आहे.

### अनुदानासाठी या कागदपत्रांची पूर्तता आवश्यक

आंतरजातीय विवाह अर्थसाह्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी लग्नाचे प्रमाणपत्र, दांपत्यांचे आधार कार्ड, दांपत्यांचे शाळा सोडल्याचा दाखला, प्रतिज्ञापत्र, जातप्रमाणपत्र, लग्नाचे फोटो, रहिवासी दाखला, लग्न खर्च तपशील, बँक खात्याचे जॉईंट अकाउंट, एन.एफ.टी फॉर्म याकागदपत्रांची पूर्तता अर्ज सादर करावयाच्यावेळी करायची आहे. तदनंतर त्या सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रासह कागदपत्रकांची पडताळणी केली जाणार आहे. काही त्रुटी असल्यास तात्काळ त्यांची पूर्तता करावी लागणार आहे.

### कागदपत्रांची अंतिम पडताळणी करून निधी वर्ग

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत सदरचा आंतरजातीय विवाह अर्थसहाय्य अनुदान लाभार्थ्यांना लवकरच वितरीत केला जाणार आहे. यासाठी समाज कल्याण विभागाकडे सुमारे ३०० प्रस्ताव दाखल झालेले आहेत. त्याची अंतिम पडताळणी केल्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पद्धतीने निधी वर्ग केला जाईल. मार्च महिना अखेरपर्यंत हा निधी संबंधित लाभार्थ्यांना प्राप्त होईल.

**- सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी जि.प. सोलापूर.**

## संक्षिप्त वृत्त

### रेल्वे पोर्टर चाळ येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

शहरातील रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे पोर्टर चाळ येथून चोरट्याने ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत अक्षय जगदीश गामीत (वय ३३, रा. सोनटक्के हाऊस, संतोष नगर, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय गामीत यांनी त्यांची एमएच १२ एजली २८९२ क्रमांकाची दुचाकी ही २१ जानेवारी रोजी रात्री रेल्वे पोर्टर चाळ येथे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### फिनेल पिल्याने तरूणास त्रास

**सोलापूर :** अज्ञात कारणावरून तरूणाने फिनेल पिल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. संतोष सोम नाथ उमराणी (वय २७, रा. हत्तुरे वस्ती, विमानतळसमोर, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. संतोष उमराणी याने २२ जानेवारी रोजी सायंकाळी घरी अज्ञात कारणावरून फिनेल पिल्याने त्यास त्रास होऊ लागल्यावर शेजारी राहणाऱ्या मल्लिनाथ कल्लूरकर यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या वादातून महिलेस लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर :** पैशाच्या वादातून भावाने बहिणीस लोखंडी रॉडने मारहाण केली. स्वाती प्राणेश नल्ला (वय ३३, रा. रामवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २२ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास रामवाडी येथील ॲड. रजाक वकिल यांच्या घराच्या बाजूला असताना स्वाती यांना पैशाच्या वादातून भाऊ गंगाराम नागनाथ जाधव याने लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे स्वाती यांना पती प्राणेश यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### टमटमची ट्रॅक्टरला धडक; तिघी जखमी

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

सोलापूर ते कामती रोडवरील तिऱ्हे गावातील ब्रिजजवळ ट्रॅक्टरची टमटमला धडक बसून तीन महिला जखमी झाल्या. सुलभा सुभाष पारवे, शुभांगी बजरंग आदटराव आणि रेखा लक्ष्मण आदटराव (वय ३२, रा. दादपूर, ता. मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. तीन महिला या टमटममधून २२ जानेवारी रोजी सायंकाळी सोलापूर ते कामती असे जात होते. त्यावेळी तिऱ्हे गावातील ब्रिजजवळ टमटमच्या आडवा अचानक चारचाकी ट्रॅक्टर आल्याने टमटमची ट्रॅक्टरला धडक बसली. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### पूर्व वैमनस्यातून तरूणास फायटरने मारहाण

**सोलापूर :** पूर्व वैमनस्यातून तरूणास फायटरने मारहाण करून जखमी करण्यात आले. राहुल खाजप्पा अण्णारेड्डी (वय २७, रा. मौलाली चौक) असे जखमीचे नाव आहे. २२ जानेवारीला रात्री सव्वा दहाच्या सुमारास राहुल हा गेंटयाल चौक ते ७० फुट रोड रस्त्याने जात असताना सॅमसंग शोरूमसमोर चिकन ६५ घेत होता. त्यावेळी पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून अजय बसप्पा श्रीराम व इतर तीन जणांनी राहुल यास फायटर, हंटर व काचेच्या बाटलीने मारहाण केली. राहुलच्या डोक्यास मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

### हरवले आहे

मी भाग्यश्री महादेव रिंगणे, रा. फुलवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव. माझी हॅलो नर्सिंग कॉलेज अणदूर येथील A.L.M या नर्सिंग कोर्सची प्रथम वर्षाचे सन २०२१-२२ ची मार्कमेमो दिनांक १५/०१/२०२५ रोजी अणदूर येथून उमरगा-सोलापूर गाडीने प्रवासात हरवले आहे. जर कोणास सापडले तर देऊन सहकार्य करावे. माझा मो.नं. ९३२५७४२३३५

## पहिली इलेक्ट्रिक एसयूव्ही-ई व्हिटारा सादर

**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सर्वांसाठी कार्बन मुक्तता आणि मोबिलिटीच्या आनंदासाठी आपल्या वचनबद्धतेची प्रदर्शना करत,मारुती सुजुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली पहिली बीईव्ही (बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल) एसयूव्ही - ई व्हिटारा सादर केली,तसेच भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपो २०२५ मध्ये व्यापक 'ई फॉर मी' इलेक्ट्रिक इको-उपाय सादर केले.उद्घाटन दरम्यान बोलताना तोशिहिरो सुजुकी म्हणाले,आम्ही बीईव्ही ग्राहकांसाठी आकर्षक बनविण्याचा उद्देश तीन-टप्प्यांची रणनीती वापरणार आहोत.

### जाहीरनामा

रे.मु.नं.७६/२०२२
निशाण क्र.

**उमरगा येथील ३ रे सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर उमरगा**

**पुजा वि. महादेवी व इतर**
**प्रति,**
**२. इरफान रफिक मणियार**
**रा. इम्रान मंजील मस्जीद रोड, गंज गोलाई लातूर, ता. जि. लातूर**
**३. सय्यद अकबर सय्यद अहेमद**
**रा. मियाँभाई कॉलनी, अंबेजोगाई ता. अंबेजोगाई जि.बीड**

ज्या अर्थी वादी राहणार लातुर व अंबेजोगाई यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरूध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी हया वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनाक २०/०२/२०२५** रोजी दिवसा **१०.३० वाजता** तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जा वाद संबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकेल अशा वकीला मार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीला मार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफद्धउ किंवा प्रतिवाद कॉउंटर क्लेमद्ध ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किवा नियंत्रणाखाली अमलेले सर्व दस्तऐवज सादर करावेन आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या मेट ऑफद्धउ किंवा प्रतिवादाच्या कॉउंटर क्लेमद्ध पुष्टर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्राणाखाली असलेल्या किवा नसलेल्या इतर कोणत्याही दम्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करून ती सूची तूमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तूम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसून केल्यास तूमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसून केल्यास तुमचा बचार रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

**आज दिनांक २१/०१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**३ रे मह दिवाणी न्यायालय**
**क स्तर उमरगा आदेशावरून**

### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पंढरपूर यांचे कार्यालय, पंढरपुर इंद्रप्रस्थ इमारत, पहिला मजला, वीर सावरकर चौक, पंढरपूर-४१३.३०८

**-: जाहीर प्रसिध्दीकरण :-**

पंढरपूर तालुक्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्थांना याव्दारे सूचित करण्यांत येते को, नियोजित आवताडे महिला रुलर क्रेडिट को-ऑप. सोसायटी एकलासपुर मर्या., पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर या संस्थेचा नोंदणी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला असून, सदर संस्थेचे नोंदणी कामी कोणाची हरकत असल्यास या कार्यालयात दिनांक ०७/०२/२०२५ रोजी समक्ष उपस्थित राहून आपले लेखी म्हणणे पुराव्यासह सादर करावे. विहीत मुदतीत कोणाचेही काहीही म्हणणे न आल्यास नोंदणीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**दिनांक** :- २४/०१/२०२५
**स्थळ** :- पंढरपूर

**सही/-**
**एम.एल.शिंदे**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, ता.पंढरपूर**

Classifieds

**पाहिजेत**

**हेवेनली ब्युटी लेडिज सलोन ॲन्ड ॲकॅडमी पत्ता : शॉप नं. ७ मेलोडी अपार्टमेंटजवळ आयएमएस स्कूल येथे अनुभवी स्टाफ पाहिजेत. बेसीक टू ॲडव्हॉन्स कोर्स चालू आहेत. संपर्क : ८८८८४३३२८५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

### जाहीर नोटीस/समन्स

**मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी,**

**लवाद न्यायाधिकरण, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापुर यांचे समोर लवाद न्यायाधिकरण कार्यालय,**

श्री. भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. बार्शी,
के. टी. ट्रॅक्टर्स शोरूम, (कुबाटा), दुसरा मजला, लातुर रोड, बार्शी ता बार्शी जि. सोलापूर

**(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट २००२ आणि अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये) दि. २३/०१/२०२५**

**अर्जदार : श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**
**विरूद्ध - गैरअर्जदार**

१. लवाद अर्ज क्र. १४९/२०२४ १) सोहिल ईस्माइल शेख रा. इंदिरा नगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) शाहरूख खाजाभाई बागवान रा. नेहरू चौक, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर ३) साहिल आदम नदाफ रा. रिकामी टेकडी, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
२. लवाद अर्ज क्र. १६२/२०२४ १) अविनाश संतनाथ खेंदाड २) खेंदाड आनंद भीमा दोघे रा. खेंदाड गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) पाटील चेतन दिनकर, रा. मातोश्री मंगल कार्यालयाजवळ, सोलापूर रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
३. लवाद अर्ज क्र. १६३/२०२४ १) विजय सर्जेराव शेळके २) सर्जेराव महादेव शेळके ३) शेळके दत्तात्रय कल्याण ४) शेळके शंकर शेकू सर्व रा. सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर
४. ल. अर्ज क्र. १६४/२०२४ १) श्रीमंत बाबा पंके २) सोमनाथ श्रीमंत पंके ३) गेनदेव गजीरंग निचळ ४) मनोज जनार्धन मुरकुटे सर्व रा. राळेरास ता. बार्शी
५. लवाद अर्ज क्र. १६५/२०२४ १) विशाल हरिभाऊ केकडे, रा. नवी पेठ, चाटे गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) गणेचारी श्रीकांत संतोष रा. हॉटेल शिवाई, बार्शी रोड, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) भस्मे ओकांर गुरूनाथ रा. चाटे गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
६. लवाद अर्ज क्र. १६७/२०२४ १) रियाज नबिलाल शेख २) शेख शरफुद्दीन सिराज दोघे रा. आझाद चौक, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) शेख खाजा अमीन, रा. नवी पेठ, आझाद चौक, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर
७. लवाद अर्ज क्र. १७०/२०२४१) संतनाथ सुधाकर टिपे २) साळवे शरद भारत, दोघे रा. निंबाळकर गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) चव्हाण सुरतीसेन अण्णासाहेब रा. शिवाजी नगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. १ हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

सदर नोटीसद्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेऊन गैरहजर राहिलात काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण दि. १७/०२/२०२५ रोजी सकाळी ११ वा. तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्याबाबतीत तुमचे काहीही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**ॲड. अजित एम. देशमुख**
**लवाद अधिकारी, बार्शी**

### ग्रामपंचायत खैरेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत खैरेवाडी ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | १,४८,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |
| २ | जि.प. शाळेस गेट बसविणे | १,००,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |
| ३ | जि.प. शाळेस शौचालय टाकी बसविणे | ९०,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |
| ४ | ग्रा.पं.स. पाईपलाईन जोडणी | ७०,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |
| ५ | दलित वस्तीसह धोबीघाट बांधणे | ६०,०००/- | - | १००/- | ३ महिने | खुला |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी २४/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ सकाळी १० पासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २४/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते ६.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय खैरेवाडी
३ निविदा उघडण्याचा दिनांक ३१/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रा.प. कार्यालय
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खैरेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी हद्दीतील गट नंबर ४०६/५/४०६/६ या जमिनीतील सुरेश बिटला नगर या नावाने ओळखले जाणारे वसाहती मधील बिनशेती प्लॉट नंबर ५० याचे क्षेत्र ६२.४४ चौ.मी. (०.६२.४४. आर चौ.मी.) इतके आहे. यात तळमजला एक हॉल, एक बेडरुम, एक किचन व संडास बाथरुम ४१.४४ चौ.मी. चे बांधकाम आर.सी.सी. पध्दतीने केलेले आहे व उर्वरित खुलीजागा आहे. आहे. यासी चतुः सिमा :- यात एक बोअर असून त्याचे १/६ हिस्सा

पुर्वेस : प्लॉट नंबर ४५
दक्षिणेस : प्लॉट नंबर ४९
पश्चिमेस : ले आऊट मधील ९ मीटर अंतर्गत रस्ता.
उत्तरेस : प्लॉट नंबर ५१

येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकत ही संदीप शहाजी केते, राहणार सोलापूर यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिल यांना कायम खूषखरेदीने देण्याचे ठरविलेले आहे. तसेच इसारा रक्कम स्विकारुन इसारापावती ही करुन दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचीही व कसल्याही प्रकारचा हक्क, हित. संबंध असल्यास किंवा पोटगी, लिज, दान, टाच, हक्कसोडपत्र, साठेखत, खरेदीखत, गहाणखत, इसारापावती व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाच्या आत योग्य कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाचीही व कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्जाखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करील. तद्नंतर कोणत्याही स्वरुपाची हरकत आल्यास ती आमच्या अशिलांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २३/०१/२०२५.

**सही/-**
**(ॲड. श्रीकांत एस. कोटा)**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**बी.ए., एल.एल.बी. चेंबर नं.३९, लायर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय कंपॉउंड, सोलापूर ४१३००३**
**मो.नं. ९८९०६१६३९६**

### बँक ऑफ बडौदा / Bank of Baroda

**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१**

**परिशिष्ठ 3-A प्रतिकात्मक ताबा नोटीस**

ज्या अर्थी, खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सेक्शन १३(१२) कलमाखाली व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **श्री. गोविंद मल्लिकार्जुन वंगारी, मल्लिकार्जुन सिद्रामप्पा वंगारी यांचा मुलगा, २९ कोंडा नगर, हनुमान मंदिरजवळ, कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना दिनांक ०९/०९/२०२४ रोजी मागणी नोटीस बजावली** होती की त्यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु. २६,७१,३९०/- (अक्षरी - सहवीस लाख ऐकाहत्तर हजार तीनशे नव्वद रुपये) + व्याज + इतर खर्च** हे या नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरले असल्याने विशेषकरुन कर्जदार / जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी त्यांना / तिला सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) चा रुल ८ अंतर्गत अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. २२/०१/२०२५ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार, आणि जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो बँक ऑफ बडोदा यांना येणे रक्कम **रु. २६,७१,३९०/- (अक्षरी - सहवीस लाख ऐकाहत्तर हजार तीनशे नव्वद रुपये) व्याज + इतर खर्च** यांच्या अधिन राहील.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल जुना सर्व्हे नं. ११०/२ आणि नविन सर्व्हे नं. १०८/२, प्लॉट नं. ए/३७ एकुण क्षेत्रफळ ७९९.०५ स्के. मी. फ्लॅट नं. ८, दुसरा मजला कार्पेट एरिया क्षेत्रफळ ४०.६१ स्के.मी. आणि बिल्टअप एरिया ५७.४१ स्के.मी. '' सिध्दीभवन अपार्टमेंट'' ''सोनिया नगर'' कसबे सोलापूर, ता. उत्तर, जि. सोलापूर

**चतु:सीमा खालील प्रमाणे**

**पुर्वेस : ओपन स्काय** **पश्चिमेस : पॅसेज**
**उत्तरेस : डक्ट व फ्लॅट नं.७** **दक्षिणेस : डक्ट व फ्लॅट नं.९**

दिनांक : २२/०१/२०२५
स्थळ : सोलापूर

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही/-
**राजेश कुमार सिन्हा**
चिफ मॅनेजुर / अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

### महाराष्ट्र महसूल व वन विभाग

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**

**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र. २०२५/अभिलेख/कावि/ /२०२५ दि. १०/०१/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. चिदानंद चंद्रशेखर पाटील - अर्जदार**
रा. चप्पळगांव ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, चप्पळगांव ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्री. चिदानंद चंद्रशेखर पाटील रा. चप्पळगांव यांनी त्याचे आजोबा कै. गुरुसिध्दप्पा कोमारप्पा पाटील यांचा मृत्यू दि. २०/०६/१९५५ रोजी मौजे चप्पळगांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे श्री. चिदानंद चंद्रशेखर पाटील यांनी त्याच्या आजोबाच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०२/१२/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आजोबाच्या यांचे नावे गुरुसिध्दप्पा कोमारप्पा पाटील यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. १०/०१/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

### जाहीर नोटीस/समन्स

रे.मु.नं. १३६/२००१
नि.नं. ३८९

**मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बार्शी यांचे न्यायालयात**

**जयचंद शांतीलाल सुराणा - वादी**
विरूध्द
**शरद दगडु निलाखे - प्रतिवादी**

प्रति,
प्रतिवादी नं. १ शरद दगडु निलाखे मयत
वारस - नियोजित प्रतिवादी नं. १अ) श्री. विजय शरद निलाखे,
३४१५, धारुरकर बोळ, बार्शी
नं.१ब) श्री. नंदकुमार शरद निलाखे, रा. सदर
यांसी

ज्याअर्थी, यातील वादी जयचंद शांतीलाल सुराणा यांनी हल्लीचा दावा रे.मु.नं. १३६/२००१ हे प्रतिवादी नं. १ शरद दगडू निलाखे व इतर प्रतिवादी यांचे विरूध्द दावा जागेचा कब्जा व थकित भाडे मिळणेसाठी आणलेला आहे. यातील प्रतिवादी नं. १ हे मयत झाल्यानंतर वारस रेकॉर्डवर घेणेसाठी अर्ज केलेला असून त्या अर्जावर नियोजित प्रतिवादी नं. १अ) व१ब) यांना नोटीस काढण्याचे आदेश झालेले आहेत.

त्याअर्थी, वर नमुद नियोजित प्रतिवादी नं. १अ) व १ब) यांना याद्वारे जाहीर नोटीस/समन्स देण्यात येते की, नियोजित प्रतिवादी नं. १अ) व १ब) हे वर नमूद ठिकाणी अगर जेथे कोठे असतील त्यांनी या जाहीर नोटीस/समन्सची दखल घेवून या दाव्याकामी सदर जाहीर नोटीस/समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीख दि. ०४/०२/२०२५ रोजी दाव्याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. स्वतः अगर विधीज्ञांमार्फत समक्ष हजर राहून वारस अर्जावर म्हणणे द्यावे, तसेच सदर दाव्यामध्ये कागदपत्रानिशी त्यांनी त्यांची कैफियत, म्हणणे अगर हरकत द्यावी. सदर विहित मुदतीमध्ये नियोजित प्रतिवादी नं. १अ) व १ ब) हजर न झाल्यास अथवा त्यांनी त्यांचे कैफियत, म्हणणे सादर न केल्यास त्यांचेविरूध्द वारस अर्जाची, दाव्याची एकतर्फा चौकशी होऊन त्यांचे अपरोक्ष वारस अर्जाचा व दाव्याचा गुणदोषावर निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी, कळावे.

हे जाहीर नोटीस/समन्स दिले. ता. १७/०१/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**मे. दिवाणी न्यायलय क.स्तर, बार्शी**

### जामश्री रिअलटी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – 413 001 सीआयएन : L17111PN1907PLC000258
दूरध्वनी : 91 22 43152424 इमेल आयडी: jammill1907@gmail.com वेबसाइट: www.jamshri.in

**31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ माहीच्या कालावधी करीता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण**

(रु. लाख )

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेली नऊ माही | | संपलेल वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.12.2024 (अलेखापरिक्षित) | 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | 31.12.2023 (अलेखापरिक्षित) | 31.12.2024 (अलेखापरिक्षित) | 31.12.2023 (अलेखापरिक्षित) | 31.03.2024 (लेखापरिक्षित) |
| 1 | एकूण महसूल उत्पन्न | 223.49 | 212.78 | 216.88 | 696.81 | 469.30 | 672.52 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (34.10) | (66.91) | (34.66) | (95.25) | (291.05) | (318.57) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (34.10) | (34.48) | (34.66) | (62.82) | (291.05) | (318.57) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.86) | (4.86) | (5.04) | (14.54) | (16.59) | (21.57) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.86) | (4.86) | (5.04) | (14.54) | (16.59) | (21.57) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा / (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन ( करपश्च्यात)) | (38.97) | (39.34) | (39.70) | (77.36) | (307.63) | (350.63) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/ | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | अखंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.49) | (0.49) | (0.50) | (0.90) | (4.17) | (4.56) |
| | खंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.07) | (0.07) | (0.07) | (0.21) | (0.24) | (0.31) |

टिप :अ) उक्त अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या जानेवारी 22, 2025 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांना मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्याप्रमाणे आणि अधिधिनयमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्यात कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ माहीचा आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीखः **22.01.2025**
ठिकाण : सोलापूर

**जामश्री रिअलटी लिमिटेड करीता**
**सही**
**राजेश दमाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### एमसीएने केला सर्वात मोठ्या क्रिकेट बॉल वाक्याचा विक्रम

**मुंबई** : मुंबई क्रिकेट संघटनेने (एमसीए) गुरुवारी 'सर्वात मोठ्या क्रिकेट बॉल वाक्याचा' नवा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करून आणखी एक कामगिरी केली. एमसीएने १४,५०५ लेदर क्रिकेट बॉल वापरून वाक्याचे काटेकोरपणे एकत्रीकरण केले आणि जुना विक्रम मोडीत काढला. वानखेडे स्टेडियमवर क्रिकेट प्रवास सुरू झाला तेव्हा १९७५ मध्ये खेळल्या गेलेल्या स्टेडियमच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय सामन्याच्या वर्धापनदिनानिमित्त हा विक्रम प्रस्थापित करण्यात आला. २३ ते २९ जानेवारी दरम्यान भारताने वेस्ट इंडीजचा सामना केला होता. एमसीएने हा विक्रम दिवंगत एकनाथ सोलकर व मुंबईतील इतर खेळाडूंना समर्पित केला आहे. या सामन्यात सोलकर यांनी शतक झळकावले होते. एमसीएचे अध्यक्ष नाईक यांच्यासह इतर पदाधिकारी आणि सर्वोच्च परिषदेच्या सदस्यांच्या उपस्थितीत हा विक्रम साकारण्यात आला.

### सूरमा हॉकी क्लब अंतिम फेरीपासून एक पाऊल दूर

**रांची** : जेएसडब्ल्यू सूरमा हॉकी क्लब महिला हॉकी इंडिया लीग २०२४-२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्यापासून एक पाऊल दूर आहे. अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी त्यांना शुक्रवारी रांची येथील मरंग गोमके जयपाल सिंग मुंडा ॲस्ट्रोटर्फ हॉकी स्टेडियमवर श्राची राढ बंगाल टायगर्सविरुद्ध किमान एक गुण मिळवावा लागेल. या संपूर्ण मोहिमेचा आमचा दृष्टिकोन असा आहे की, आम्ही खेळत असलेला प्रत्येक सामना जिंकू इच्छितो. म्हणून, आम्ही आता केवळ श्राची राढ बंगाल टायगर्सविरुद्धच्या सामन्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. या टप्प्यावर आमच्यासाठी हा सर्वात महत्त्वाचा सामना आहे, असे मुख्य प्रशिक्षक ज्यूड मेनेझेस यांनी सामन्यापूर्वी सांगितले.

### शाह, गांगुली एमसीसीच्या सल्लागार मंडळात सहभागी

**नवी दिल्ली** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह आणि माजी भारतीय कर्णधार व बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली हे नव्याने स्थापन झालेल्या एमसीसीच्या वर्ल्ड क्रिकेट कनेक्ट्स सल्लागार मंडळात सहभागी झाले आहेत, असे मेरीलेबॉन क्रिकेट क्लबने (एमसीसी) म्हटले आहे. नवीन स्थापन झालेले हे मंडळ २००६ मध्ये स्थापन झालेल्या आणि गेल्या वर्षी लॉर्ड्स येथे त्यांची अंतिम बैठक झाली होती. एमसीसीने पुढे म्हटले आहे की, नवीन कनेक्ट्स बोर्ड वर्षभर वर्ल्ड क्रिकेट कनेक्ट्सच्या नियोजनात आणि वार्षिक कार्यक्रमानंतर लगेचच प्रत्यक्ष भेटेल, तसेच एमसीसीचे अध्यक्ष मार्क निकोलस जवळून काम करेल. हा स्वतंत्र गट वार्षिक वर्ल्ड क्रिकेट कनेक्ट्स अजेंडा आकार देईल, कार्यक्रमाच्या चर्चा सुलभ करण्यास मदत करेल आणि त्या बदल्यात, खेळाच्या आरोग्यावर खऱ्या अर्थाने परिणाम घडवण्याची संधी जास्तीत जास्त करेल, असे एमसीसीने म्हटले आहे.

### मायकेल क्लार्कला हॉल ऑफ फेम

**सिडनी** : गुरुवारी सिडनी क्रिकेट मैदानावर मायकेल क्लार्कचा ऑस्ट्रेलियन क्रिकेट हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला. हा सन्मान मिळवणारा तो ६४ वा क्रिकेटपटू ठरला. ४३ वर्षीय माजी कर्णधाराची १२ वर्षांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द उल्लेखनीय होती, या काळात त्याने ११५ कसोटी, २४५ एकदिवसीय ३४ टी-२० सामने खेळले आणि १७,००० हून अधिक धावा केल्या. कर्णधार म्हणून, क्लार्कने ४७ कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले.

## सबालेन्का, कीज अंतिम फेरीत



ऑस्ट्रेलियन ओपन



**मेलबर्न, २३ जानेवारी**

गतविजेती व प्रथम विश्वमानांकित बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने स्पेनच्या पॉला बडोसावर सरळ सेटमध्ये विजय मिळवत सलग तिसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

दोन वेळच्या विजेत्या सबालेन्काने बडोसाचा ६-४, ६-२ असा पराभव केला. आता शनिवारी अव्वल मानांकित सबालेन्काचा अंतिम सामना अमेरिकेच्या मॅडिसन कीजविरुद्ध होणार आहे. या निर्णायक सामन्यात सबालेन्का आपल्या चौथ्या ग्रॅण्ड स्लॅम जेतेपदासाठी प्रयत्नशील असेल.

रॉड लेव्हर एरिना येथे रोमांचक ठरलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात मॅडिसन कीजने दुसऱ्या विश्वमानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकला ५-७, ६-१, ७-६ (८) असा पराभवाचा धक्का दिला. कीजने दुसऱ्यांदा ग्रॅण्ड स्लॅमची अंतिम फेरी गाठली. २०१७ साली अमेरिकन ओपनच्या अंतिम सामन्यात तिला आपलीच अमेरिकन मैत्रीण स्लोएन स्टीफन्सकडून पराभव पत्करावा लागला होता.

### सिनर वि.शेल्टन, जोकोविच वि. झ्वेरेव्ह उपांत्य लढती रंगणार

सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोवाक जोकोविच आता आपल्या विक्रमी २५ व्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदापासून दोन पावले दूर आहे. शुक्रवारी ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत ॲलेक्झांडर झ्वेरेव्हचा सामना करण्यासाठी जोकोविच तयारी करत आहे. डाव्या पायाच्या दुखापतीमुळे वेदनाशामक औषध घेत खुद्द जोकोविचने मान्य केले.

मी येथे स्पर्धा करत आहे व ग्रॅण्ड स्लॅम जेतेपद मिळवण्यासाठी माझे सर्वोत्तम प्रयत्न करत आहो, असे ३७ जोकोविच म्हणाला. अलिकडेच जोकोविचने स्पेनच्या २१ वर्षीय कार्लोस अल्काराझला उपांत्यपूर्व फेरीत पराभूत करून स्पर्धेच्या बाहेर केले. जर्मनीचा २७ वर्षीय झ्वेरेव्ह हा दुसरा मानांकित खेळाडू आहे. तोसुद्धा ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद जिंकू इच्छित आहे. (वृत्तसंस्था)

# त्रिशाची झुंजार खेळी, भारत सुपर सिक्स फेरीत

## १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक



त्रिशा गोंगडी ४४ चेंडूंत ४९ धावा



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला क्रिकेटपटू

**क्वालालम्पूर, २३ जानेवारी**

त्रिशा गोंगडीने केलेली ४९ धावांची झुंजार खेळी तसेच शबनम शकील, व्हीजे जोशिता व पारुनिका सिसोदियाच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारतीय महिला संघाने श्रीलंकेवर ६० धावांनी दणदणीत विजय नोंदविला आणि १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर सिक्स फेरीमध्ये प्रवेश केला.

त्रिशाने ४४ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ४९ धावांची खेळी केली. त्यामुळे भारताला ९ बाद ११८ अशी स्पर्धात्मक धावसंख्या रचता आली. प्रत्युत्तरात मात्र श्रीलंकेला २० षटकांत ९ बाद ५८ धावाच काढता आल्या.

वेगवान गोलंदाज व्हीजे जोशिता व शबनमने श्रीलंकेच्या अव्वल फळीला ३.२ षटकांत ४ बाद ९ अशी मोडीत काढले. एका षटकानंतर कर्णधार मनुदी नानायक्करा धावबाद झाल्यामुळे त्यांची अवस्था ५ बाद १२ अशी झाली. अखेर श्रीलंकेला २० षटकांत ९ बाद ५८ धावांपर्यंतच मर्यादित ठेवण्यात आले.

भारताने अ गटातील सर्व तीन सामन्यांमध्ये विजय मिळवून सुपर सिक्स फेरीत प्रवेश केला.

फिरकी गोलंदाजांना संधी मिळाल्यानंतर श्रीलंकेच्या धावांचा पाठलाग करण्यात फारसे जीव उरला नव्हता. भारताच्या डावखुऱ्या फिरकीपटूंनी अचूक कामगिरी केली. श्रीलंकेकडून रश्मिका सेववंडीने तेवढी एकाकी झुंज देत १२ चेंडूंत २ चौकारांसह सर्वाधिक १५ धावा काढल्या. ती सिसोदियाच्या गोलंदाजीवर पारुनिकाकडून झेलबाद झाली.

श्रीलंकेला २० षटकांत ९ बाद ५८ धावांवर रोखताना भारताच्या शबनम शकील, व्हीजे जोशिता व पारुनिका सिसोदियाने प्रत्येकी २ बळी, तर आयुष शुक्ला व वैष्णवी शर्माने प्रत्येकी १ बळी टिपला.

भारताचा पहिला सुपर सिक्स फेरीचा सामना रविवार २६ जानेवारी रोजी बांगलादेशविरुद्ध, तर दुसरा सामना २८ जानेवारी रोजी स्कॉटलंडविरुद्ध होणार आहे. (वृत्तसंस्था)



गुरुग्राम येथे गुरुवारी एका शाळेच्या वार्षिक क्रीडा समारंभात क्रिकेट मैदानाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांशी हस्तांदोलन करताना माजी क्रिकेटपटू कपिल देव

# रणजी करंडकात रोहित, यशस्वीचे निराशाजनक पुनरागमन

**मुंबई, २३ जानेवारी**

भारताचा कर्णधार रोहित शर्मा व त्याचा कसोटीतील सलामीवीर यशस्वी जयस्वालचे रणजी करंडक क्रिकेटमधील बहुप्रतिक्षित पुनरागमन हे मोठे निराशाजनक राहिले. गुरुवारी येथे जम्मू-काश्मीरविरुद्धच्या रणजी करडंक सामन्यात ही जोडी स्वस्तात बाद झाली.

रोहित व जयस्वालने गतविजेत्या मुंबईसाठी पहिल्यांदाच जोडी केली होती, परंतु या रणजी सामन्यात ते अनुक्रमे ३ व ४ धावांवर बाद झालेत. जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज औकिब नबीने जयस्वालला बाद केले. परंतु रोहित शर्मा वाईट पद्धतीने झेलबाद झाला. रोहितचा मिड-ऑफवर उडालेला झेल जम्मू-काश्मीरचा कर्णधार पारस डोग्राने पकडला. ३१ वर्षीय उमरने मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणेचा प्रतिकार संपवत त्याला १२ धावांवर बाद केले. स्टेडियममध्ये भारतीय क्रिकेटपटूंना पाहण्यासाठी गर्दी कमी होती.

**पंत, गिलही अपयशी**

राजकोट येथे दिल्ली संघाच्या गट ड मधील सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात ऋषभ पंत केवळ एक धाव काढून बाद झाला. तो डी.ए. जडेजाच्या गोलंदाजीवर प्रेरक मंकडकडून झेलबाद झाला.

बंगळुरू येथे एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर कर्नाटकविरुद्धच्या सामन्यात पंजाब संघाचा कर्णधार शुभमन गिल केवळ ४ धावा काढू शकला. तो अभिलाष शेट्टीच्या गोलंदाजीत केएल श्रीजितकडून झेलबाद झाला.

**महाराष्ट्राचा अंकित बावणे निलंबित**

रणजीर कंडक सामन्यात मैदानावरील पंचांच्या निर्णयाला विरोध दर्शविल्याबद्दल महाराष्ट्राचा फलंदाज अंकित बावणे याला बीसीसीआयने एका सामन्यासाठी निलंबित केले आहे. नाशिकमधील गोल्फ क्लब मैदानावर सुरू असलेल्या बडोद्याविरुद्धच्या गट अ रणजी करंडक सामन्यात त्याचा समावेश करण्यात आला नाही. (वृत्तसंस्था)

## लक्ष्य सेनचे आव्हान संपुष्टात

**जकार्ता, २३ जानेवारी**

येथे इंडोनेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनला पराभव पत्करावा लागला. याबरोबरच त्याचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

पुरुष दुहेरीत जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीला किटिनुपोंग केड्रेन व डेचापोल पुवारानुक्रोह या थायलंडच्या जोडीकडून २०-२२, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला. दहाव्या मानांकित लक्ष्यला कडवा संघर्ष करूनही जपानच्या केंटा निशिमोटोविरुद्ध १६-२१, २१-१२, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला. ध्रुव कपिला व तनिषा क्रास्टो या मिश्र दुहेरी जोडीला दुसऱ्या फेरीत मलेशियाच्या पांग रॉन हू व सु यिन चेंगविरुद्ध २१-१८, १५-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# विदर्भविरुद्ध राजस्थान ६४ धावांनी पिछाडीवर

**रणजी करंडक क्रिकेट ● विदर्भ- सर्वबाद १६५, राजस्थान- ५ बाद १०१**

**जयपूर, २३ जानेवारी**

प्रतिष्ठेच्या रणजी करडंक क्रिकेट स्पर्धेत येथे गुरुवारपासून प्रारंभ झालेल्या राजस्थानविरुद्धच्या एलिट ब गटाच्या साखळी सामन्यात विदर्भाने पहिल्या डावात ५७.३ षटकांत सर्वबाद १६५ धावा काढल्या. प्रत्युत्तरात राजस्थानने दिवस अखेर ३० षटकांत ५ गडी गमावत १०१ धावांची नोंद केली. राजस्थान अजून ६४ धावांनी पिछाडीवर आहे. खेळ थांबला तेव्हा कर्णधार महिपाल लोमरोर नाबाद ४४, तर समर्पित जोशी नाबाद ३ धावांवर खेळत होते.

विदर्भ संघाचा कर्णधार अक्षय वाडकरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु संघाला अपेक्षेनुसार फलंदाजी करता आली नाही. ध्रुव शोरी (४) व अमन मोखाडे (३) ही भरवसाची सलामी जोडी लवकरच बाद झाली. राजस्थानचा डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमद विदर्भासाठी कर्दनकाळ ठरला.



करुण नायर ३९ धावा

खलीलने ३७ धावांत सलामी जोडीसह पाच फलंदाजांना बाद केले. करुण नायर (३९), कर्णधार अक्षय वाडकर (३४), नचिकेत भुते (३४) व दानिश मालेवारने (१७) तेवढी दोन अंकी धावा काढल्या व विदर्भाला ५७.३ षटकांत १६५ धावा उभारून दिल्या, परंतु इतर फलंदाज खलीलसह मानव सुतार व कुकना अजय सिंगच्या गोलंदाजीपुढे खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. सुतारने ४० धावांत ३ बळी, तर कुकना अजय सिंगने २ बळी टिपलेत.

प्रत्युत्तर देताना राजस्थानच्या डावाची सुरुवातही निराशाजनक झाली. मध्यम गती गोलंदाज आदित्य ठाकरे व नचिकेत भुतेने अनुक्रमे सलामीवीर अभिजीत तोमर (५) व मानव सुतारला (७) लवकरच तंबूत परत पाठवले. मध्यम गती गोलंदाज शुभम कापसेने कार्तिक शर्मा (१६) व दीपक हुड्डाला (०) बाद केले. डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबेने शुभमन गरीवालला (२२) पायचित केले. (वृत्तसंस्था)

# विद्यार्थी क्रीडा केंद्रांच्या ४ फुट ११ इंच व व्यावसायिक खो-खो स्पर्धेस सुरवात

**मुंबई, दि. २३ जानेवारी-**

विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित आणि मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने किशोर गट (४ फुट ११ इंच) तसेच व्यावसायिक पुरुष व महिला गटांसाठी खो-खो स्पर्धा बुधवार, २२ जानेवारी २०२५ पासून लाल मैदान (आई-माई मेरवानजी पथ, परळ, मुंबई) येथे सुरू झाली आहे. ही स्पर्धा २६ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार श्री. अजय चौधरी यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाला शिवसेनेचे उप शाखाप्रमुख धनंजय सावंत, विद्यार्थी क्रीडा केंद्राचे अध्यक्ष गजानन वाईरकर, कार्याध्यक्ष यशवंत नाईक, प्रमुख कार्यवाह पराग आंबेकर, खजिनदार समीर हडकर, तसेच मुंबई खो-खो संघटनेचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख, प्रमुख कार्यवाह सुरेंद्रकुमार विश्वकर्मा, कार्याध्यक्ष सुधाकर राऊळ आणि कार्यपाध्यक्ष विकास पाटील उपस्थित होते.

**सामन्याचे थरारक निकाल**

आज झालेल्या ४ फुट ११ इंच किशोर



गटाच्या पहिल्या सामन्यात सरस्वती स्पोर्टस क्लब अ संघाने श्री समर्थ व्यायाम मंदिराचा (१३-२-५) १३-७ असा १ डाव ६ गुणांनी पराभव केला. सरस्वती तर्फे महेक अडवडेने नाबाद ४ मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. अनिकेत सोनारने १:४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले. शिवम झा ने २ मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. श्री समर्थतर्फे मोहम्मद लांजेकरने २:४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले.

# राज्य शालेय क्रिकेट; कोल्हापूर विभागाची हॅटट्रिक

## १७ वर्षांखालील मुलींची स्पर्धा : नागपूर विभाग उपविजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

कोल्हापूर विभागाने राज्य शालेय १७ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावित हॅटट्रिक केली आहे.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात त्यानी नागपूर विभागाचा २० धावांनी पराभव केला. कोल्हापूर विभागाच्या श्री साई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कोल्हापूर तर नागपूर विभागाच्या श्री राजेंद्र हायस्कूल नागपूर या संघामध्ये अंतिम सामना झाला. कोल्हापूरने प्रथम फलंदाजी करताना १५ षटकात ५ बाद ९७ धावा केल्या. नागपूर विभागाला १५ षटकात ८ बाद ७६ धावांच करता आल्या. कोल्हापूरकडून परिणीता पाटील हिने ३२ धावा व श्रुतिका पाटील हिने २० धावा केल्या. नागपूर विभागाच्या वतीने अक्षरा ईटणकर व श्रेया लांजेवार यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. कोल्हापूरकडून सुहानी कहांडळ हिने तीन गडी टिपले.

स्पर्धेची पारितोषिके हॉटेल सूर्या एक्झिक्युटिव्हचे पृथ्वीराज सुरवसे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, निवड समिती सदस्य जयराज मुंडे, राकेश उबाळे, क्रीडा अधिकारी सुनील धारूरकर, नदीम शेख, गणेश पवार, प्रा. प्रमोद चुंगे, खंडू



शिंदे पंचप्रमुख बाळासाहेब रनवरे, मंजीत नवले आदी उपस्थित होते.

**पुणे विभागास तृतीय स्थान**

तृतीय क्रमांकाच्या सामन्यात पुणे विभागाने छत्रपती संभाजीनगर विभागावर ५१ धावांनी मात केली. पुणे विभागाकडून श्री श्री रविशंकर विद्या मंदिर संगमनेर खुर्द (जिल्हा अहिल्यानगर) विरुद्ध छत्रपती संभाजीनगरच्या इंदिरा गांधी विद्यालय जावळा बाजार हिंगोली यामध्ये हा सामना झाला. यात पुणे विभागाने १० षटकात २ बाद १०१ धावा केल्या. पुणे विभागाकडून आदिती राऊत हिने २९ धावा व साईश्री चौरे हिने २१ धावा केल्या. प्रतिउत्तरात छत्रपती संभाजीनगर संघाने ७ बाद ४९ धावा केल्या.

# अनुराधा थोरात स्पोर्ट्स अकॅडमीला प्रथम क्रमांकाचा सांघिक चषक

## राष्ट्रीय कराटे स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. २१ जानेवारी -**

युनिव्हर्सल शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया यांच्यामार्फत जत (सांगली) येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये अनुराधा थोरात स्पोर्ट्स अकॅडमीच्या ३५ पैकी १४ स्पर्धकांनी आपापल्या वजनी व वयोगटात प्रथम, १६ स्पर्धकांनी द्वितीय आणि ३० स्पर्धकांनी तृतीय क्रमांक पटकावून या स्पर्धेतील मानाची प्रथम क्रमांकाची ट्रॉफी पटकविली. या स्पर्धेमध्ये भारतामधून सुमारे ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

सर्व विजयी स्पर्धकांना मुख्य कराटे प्रशिक्षिका व आंतरराष्टीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात (ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री), सोनिया सतीशकुमार थोरात, विनायक नीलम गायकवाड व निशा गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

**काताज प्रकारातील कामगिरी केलेले खेळाडू या प्रमाणे : प्रथम** : विश्वराज



कृष्णादेवराय गरड, प्रियेश राजशेखर सुनकनपल्ली, ध्रुव उमेश ढगे, प्रथमेश पांडुरंग चौधरी, विहान विनोद कांबळे, अध्या सागर एकबोटे, महेवीश दावलम लिक शेख, शिवप्रिया सिद्राम येलदी.

**द्वितीय** : मयुरेश नरसय्या गुंटुक, वेदांत सचिन खोकले, स्वरूप सुरज पवार, वेदिका राघवेंद्र मिठ्ठाकोल, शुभरा अभिषेक पराळकर, शैझीन नाझ मोहम्मद मैगेरी, शालिनी बेंजामीन योहान, हर्षिता शैलेश मारा.

**तृतीय** : दिलनवाज इलाही पठाण, कौस्तुभ अविनाश आडम, सच्चीदानंद सिद्राम येलदी, धानेश दौलप्पा बिराजदार, समीक्षा समाधान राऊत, आराध्या महेश नळे, वेदिका विनोद कांबळे, सेजल महेश कोरे.

**कुमिते प्रकारातील कामगिरी केलेले खेळाडू याप्रमाणे** : **प्रथम** :निरंजन विकास हनगंडी, विश्वराज गरड,ऋत्विक पोंनामांडा,प्रियेश सुनकनपल्ली, ध्रुव ढगे.

**द्वितीय** :विरेंद्र रविंद्र भिमनपल्ली, धानेश बिराजदार, वेदिका मिठ्ठाकोल, शुभरा पराळकर, अध्या एकबोटे, समीक्षा राऊत, शैझीन नाझ मैगेरी, दिव्याराणी नरहरी कोनकुंटला

**तृतीय** : मयंक बाबुराव चौधरी, अथर्व किशोर खुणे, अंशुल नरसय्या गुंटुक, आराध्या विजय गायधनकर,संस्कृती संतोष कुलकर्णी, चैत्राली विजय गायधनकर, अक्षरा विजय पंडील्ला, दिलनवाज पठाण, कौस्तुभ आडम,मयुरेश गुंटुक, वेदांत खोकले,स्वरूप पवार, प्रथमेश चौधरी, विहान कांबळे, सच्चीदानंद येलदी,आराध्या नळे, महेवीश शेख,वेदिका कांबळे, सेजल कोरे, शालिनी योहान, शिवप्रिया येलदी, हर्षिता मारा.

# नूमवि शाळेत क्रीडा महोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

नूमवि मराठी शाळेत क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे उपस्थित होते. मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय लंगोटे यांनी करून दिला. यानंतर माननीय मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच क्रीडा शिक्षक प्रकाश कंपली यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करून क्रीडा महोत्सवाची सुरुवात केली. त्यानंतर क्रीडा ज्योतीचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हवेत रंगीत सुंदर फुगे सोडण्यात आले. क्रीडा ध्वजाला संचलन टीमने मानवंदना दिली. इयत्ता चौथीच्या मुलींनी झांज नृत्याचे उत्कृष्टरित्या सादरीकरण केले. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी खेळाचे महत्व आपल्या सुंदर नृत्यातून सांगितले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या उपस्थितीत इयत्ता दुसरीचे रस्सीखेच या खेळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी साहित्य कवायत प्रकार सादर केले. सूत्रसंचालन शिवा जाधव यांनी केले तर आभार व्हंड्राव यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### पालकमंत्र्यांना रयत क्रांती संघटनेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन

**टेंभुर्णी, दि. २३ जानेवारी-**
पालकमंत्री जयकुमार गोरे हे पंढरपूर येथे आले असताना रयत क्रांती संघटनेच्या वतीने शेतकरी प्रश्नांचे निवेदन देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी राज्य प्रवक्ते प्रा. सुहास पाटील, राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसल, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष रुपेश वाघ, जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण बोबडे, माढा तालुकाध्यक्ष नागेश गायकवाड, चंद्रभागा साखर कारखान्याचे संचालक सुनील पाटील, संपत काळे, पंढरपूर तालुका कार्याध्यक्ष राहुल पवार उपस्थित होते. जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यांनी उसाची पहिली उचल अद्यापपर्यंत दिलेली नाही, अशा साखर कारखान्यांवर कारवाई करावी. शेतकऱ्यांना फळबाग लागवड व ठिबक सिंचन अनुदान दोन वर्षापासून मिळालेले नाही, अनुदान मिळावे, उजनी धरणातील पाणी वाटपाचे नियोजन कालवा, नदी व सिंचन व्यवस्थेद्वारे समान पातळीवर करण्यात यावे. सरकारच्या माध्यमातून कडधान्य खरेदी केंद्र पूर्ववत सुरू करावेत, उजनी धरणाच्या नदीपात्रातील पहिले गाव रांजणी येथे रांजणी-आलेगाव हद्दीमध्ये बॅरिगेज बंधारा बांधण्यात यावा. सिना माढा उपसा सिंचन योजनेतून सोडण्यात येणारे पाणी सर्व वितरिकांना समान वाटप करण्यात यावे. ई-पीक पाणी ऑनलाईन नोंदणी १५ फेब्रुवारीपर्यंत सुरू ठेवावी. अशा शेतकरी प्रश्नांच्या मागण्यांचे निवेदन पालकमंत्र्यांना देण्यात आले.

### शिवाजी पॉलिटेक्निकच्या २० विद्यार्थ्यांची बजाज ऑटोमध्ये निवड

**सांगोला, दि.२३ जानेवारी-**
सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन या विभागातील २० विद्यार्थ्यांची पुणे येथील बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. पी. सी. चव्हाण यांनी दिली. बजाज ऑटो लिमिटेडचे एच. आर. मॅनेजर चनगोंडा कोरे यांनी सदर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये मेकॅनिकल इंजिनीयरिंग विभागातील मंगेश लोहकरे, शुभम बजबळकर, दत्तात्रय नरके, सुशांत माने, प्रथमेश चौधरी, अमर सावंत, अभिजित पाटील, गणेश कुलाल, निखिल गायकवाड, ऋषिकेश खटकाळे, शिवप्रसाद गायकवाड तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागातील प्रीतम भडंगे, रोहित लेंडवे, शुभम घुले, अमन पठाण, संकेत इंगवले, विजय, काटकर, पृथ्वीराज गायकवाड, प्रतीक लोहार, हर्षल इंगवले या विद्यार्थ्यांची निवड झाली. सदर विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, डॉ. आर. ए. देशमुख, प्रा. पी. सी. चव्हाण यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना प्रा. एस. डी. बावचे, प्रा. आनंद गायकवाड, प्रा. ऋषिकेश गयाळी, प्रा. अक्षय आटकळे यांचे मार्गदर्शन लाभले.

### अन्न सुरक्षा अधिकारीपदी साजिदा मुल्ला यांची निवड

**अकलूज, दि. २३ जानेवारी-**



शंकरनगर येथील सर्व साधारण कुटूंबातील साजिदा मुल्ला यांनी सातत्य,अथक परिश्रमाच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश खेचून आणले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने २०२३ मध्ये घेतलेल्या स्पर्धा परीक्षेचा निकाल लागला .यामध्ये यशवंत नगर पोस्टामधील सेवानिवृत्त पोस्ट मास्तर ए.एम.मुल्ला यांची कन्या साजिदा यांनी पहिल्या प्रयत्नातच यश मिळविले.महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागात अन्न सुरक्षा अधिकारी पदी त्यांची निवड झाली. साजिदा मुल्ला यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.कन्या शाळा माळशिरस,माध्यमिक लक्ष्मीबाई कन्या प्रशाला शंकरनगर ,सदाशिवराव माने विद्यालय अकलुज येथे तर कृषी विषयातील पदवी व पदवीत्तर शिक्षण अनुक्रमे कोल्हापूर व म.फुले कृषी विद्यापिठ राहुरी या ठिकाणी झाले. साजिदा मुल्ला यांनी मिळविलेल्या यशाबद्दल स. म. शंकरराव मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळ अकुजचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

### श्री श्री दिव्यज्ञानानंदगिरी महाराजांचे ३१ जानेवारीला प्रवचन

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**



श्री तोगटवीर क्षत्रिय समाज व श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम्च्या वतीने सेवा संघमच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त समाजाचे कुलगुरु श्री श्री दिव्यज्ञानानंदगिरी महाराजांच्या प्रवचनाचे शुक्रवारी ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वा. तोगटवीर सांस्कृतिक भवन, सोलापूर येथे आयोजन केले आहे. समाज बांधवांनी या प्रवचनास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वीरशैव महासभेच्या उपाध्यक्षपदी सिद्धरामप्पा उप्पीन

**विजयपूर, दि. २३ जानेवारी-**



विजयपूर येथील समाजसेवक सिद्धरामप्पा उप्पीन यांची अखिल भारतीय वीरशैव महासभेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री डॉ. श्यामनुर शिवशंकरप्पा यांच्या अध्यक्षतेखालील या महासभेच्या उपाध्यक्षपदी सिद्धरामप्पा उप्पीन यांची निवड करण्यात आल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पंढरीत १,७०० विद्यार्थ्यांची शोभायात्रा

## कवठेकर प्रशालेची शोभायात्रा समस्त पंढरपूरकरांचा कौतुकाचा विषय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ जानेवारी -**
येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी पंढरपूरच्या कवठेकर प्रशालेमध्ये २४ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सप्तरंग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची सुरुवात भव्यदिव्य अशा शोभायात्रेने करण्यात आली. या शोभायात्रेत जवळपास सतराशे विद्यार्थ्यांनी एकाच वेळेस विविध वेशभूषा विविध वाद्य व ऐतिहासिक पौराणिक व क्रांतिकारकांच्या वेशभूषा व देखावे यामधून समस्त पंढरपूरकरांना दर्शन देऊन आश्चर्यचकित केले.



दरम्यान शोभा यात्रेची सुरुवात गुरुवारी (दि.२३) शहरातील मध्यवर्ती असलेल्या टिळकस्मारकच्या भव्य मैदानावरून करण्यात आली.पंढरपूर नगरपरिषदेचे प्रशासनाधिकारी सुनील वाळुजकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शोभा यात्रेची सुरुवात झाली. यावेळेस क्रीडा अधिकारी श्री. यादव, पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, मानदसचिव सु. र. पटवर्धन, सदस्य मिलिंद जोशी, शांताराम कुलकर्णी, द. ह. कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी, ज्येष्ठ क्रीडाशिक्षक प्रशांत मोरे, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक जी. एस. पवार, श्री.चव्हाण आदींसह पालकवर्ग आवर्जून यावेळी उपस्थित होते.

या शोभा यात्रेची सुरुवात ते शेवट जवळपास पाऊण किलोमीटरचा होता. या शोभायात्रे मध्ये उंट ,घोडे, रथ व ट्रॅक्टर मधून विविध वेशभूषा करणारे चारशे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा समावेश होता. ढोल- ताशा, हलगी- लेझीम, टाळ- मृदुंग आदीं पथका मध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा लक्षणीय सहभाग दिसत होता.

अनेक ठिकाणी पंढरपूरकारांनी स्वयंस्फूर्तीने या शोभायात्रेला आवर्जून हजेरी लावून रांगोळ्या व पुष्पवृष्टी करून शोभायात्रेचे स्वागत केले. अनेक ठिकाणी पालकांनी शोभयात्रेतील विद्यार्थ्यांना पाण्याची सोय करून आपला सहभाग नोंदविला. पंढरपुरात दर्शनासाठी आलेले भाविक देखील रस्त्याच्या दुतर्फा थांबचन शोभायात्रेला पाहण्यात इतके दंग होते की त्यांनी रथयात्रेमधील श्री विठ्ठल-रखुमाई,श्रीराम- सीतामाई लक्ष्मण व हनुमान यांना कृतार्थतेने हात जोडून नमस्कार देखील करीत असताना दिसत होते.

ही शोभायात्रा यशस्वी करण्यामध्ये प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, उपमुख्याध्यापक एम. आर. मुंडे, पर्यवेक्षिका विश्वासे आणि प्रशालेतील सर्व शिक्षक- शिक्षकेतर, विद्यार्थी, पालक आणि पोलीस प्रशासनाने यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

### ऐतिहासिक प्रसंगाचे पंढरपूरकर साक्षीदार

ढोल ताशाच्या आवेशपूर्ण नादात सहभागी विद्यार्थी आनंदाने बेभान होऊन व पारंपारिक भक्तीरचना विठ्ठलाची आळवणी करताना वारकऱ्यांच्या वेशभूषामधील विद्यार्थी भजनामध्ये रममाण झालेले दिसत होते. डॉक्टर, वकील त्याचबरोबर ज्युडो-कराटे आणि जवान यांचे स्वतंत्र गट पालकांचे व पंढरपूरकरांचे लक्ष वेधून घेत होते. धनिक्षेपकावरून लावलेली भजन व समर्पक अशा पद्धतीचे माहितीप्रद निवेदन यामुळे आजची ही शोभायात्रा ही ऐतिहासिक ठरली.

# मैंदर्गी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कट्टीमनी निलंबित

**कामकाजात हलगर्जीपणासह अनेक मुद्दे अहवालात नमूद**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ जानेवारी**
तालुक्यातील मैदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक महांतेश कट्टीमनी यांच्यावर विविध प्रकारचे गंभीर ठपका ठेवून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अक्कलकोटचे गटविकास अधिकारी शंकर कवीतके यांनी केली आहे. सदर शिक्षकांवर अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

मुख्याध्यापक महांतेश कट्टीमनी यांनी मागील दोन वर्षापासून मेंदर्गी येथे कार्यरत होते. त्यांच्याविरुध्द अक्कलकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांच्याकडे विविध तक्रारी आल्या होत्या. यानुसार अनेकवेळा भेटी देऊन पाहणी केली. अनेक प्रकारची धक्कादायक माहिती समोर आली. त्यानुसार गटशिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी स्वरूपात अहवाल सादर केला होता. त्या अहवालावरून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी शंकर कवितके यांना निर्णयाचा अधिकार दिला होता. त्यावरून सदरची निलंबन कारवाई करण्यात आली आहे.

### असा आहे ठपका

शालेय कामकाजात हलगर्जीपणा करणे, महिला शिक्षकावर अत्याचार करणे, शाळेत अनधिकृत शिक्षक नेमणे, वर्तणूक सुधारण्यासाठी यापूर्वी वारंवार संधी देण्यात आली होती. सतत गैरहजर राहणे, शालेय कामकाजात अनियमिता असणे आदी कारणाने मुख्याध्यापक कट्टमनी यांना निलंबित करण्यात आले आहे.



### माजी मंत्री बच्चू कडू यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**राज्याचे माजी मंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन त्यांचा सन्मान केला.**

# श्री खंडोबाचे अणदूरमध्ये स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २३ जानेवारी-**
लाखो भक्तांचे श्रद्धास्थान श्री खंडोबा देवाचे मैलारपुरातील पावने दोन महिन्याचे वास्तव्य संपल्यानंतर गुरुवारी २३ रोजी पहाटे अणदूरमध्ये मोठ्य उत्साही वातावरणात जयजयकारात आगमन झाले.



खंडोबाची पालखी पहाटे चार वाजता वेशीत येताच अणदूरकरांनी फटाक्याची आतषबाजी करून, येळकोट, येळकोट जय मल्हार असा जयघोष केला आणि खोबरे भंडाऱ्याची मुक्त उधळण केली. यावेळी हलगीच्या तालावर आणि वारूंच्या भक्तीरसात वाजत-गाजत पालखी मंदिरात नेण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी महिलांनी श्री खंडोबास पंचारती ओवाळून औक्षण केले. त्यामुळे अणदूर नगरी गुरुवारी पहाटे भक्तीभावाने डुबून गेली होती. पालखी वेशीपासून वाजत गाजत मंदिराच्या पश्चिम प्रवेशव्दाराजवळ येताच महिलांनी श्रीचे औक्षण केले आणि नंतर पालखी मंदिरात आली. त्यानंतर मुर्तीची अणदूरच्या मंदिरात विधिवत प्रतिष्ठापणा करण्यात आली. त्यानंतर मंत्रोउच्चारात पंचारती झाल्यानंतर पाच मिनिटांसाठी मुख्य गाभाऱ्याचा दरवाजा पाच मिनिटे बंद करण्यात आला. नंतर तो उघडून काकडाआरती करण्यात आली. त्यानंतर देवाची मूर्ती दर्शनासाठी खुली करण्यात आली. दिवसभर भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



# कंदलगावच्या उपसरपंचपदी भाजपाचे अमित नरूटे बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २३ जानेवारी-**
कंदलगाव येथील उपसरपंच निवडणुकीत भाजपाचे आमदार सुभाष देशमुख समर्थक कडते गटाचे अमित नरूटे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

सरपंच शारदाताई कडते यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवडणूक पार पडली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुनील गायकवाड व सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून दयानंद पाटील व नागेश जोडमोटे यांनी काम पाहिले. यावेळी १३ ग्रामपंचायत सदस्यांपैकी सायप्पा कांबळे, नीलकंठ राऊतराव, जयश्री राऊतराव, सुशाबाई बनसोडे, सरस्वती राऊतराव, सोमनाथ जोकारे, चांदबाशा सयद आदी आठ सदस्य उपस्थित होते तर विरोधी गटाचे पाच सदस्य गैरहजर होते.

यावेळी सर्व सदस्यांनी अमित नरोटे यांच्या निवडीला पाठिंबा दिल्याने उपसरपंच निवड बिनविरोध पार पडली. यावेळी बाबासाहेब पाटील, बाबुराव कोले, प्रभू पाटील, धनेश कडते, जगदेव व्हंड्राव, शशिकांत बनसोडे, इरप्पा राऊतराव, तुकाराम राऊतराव, मळसिध्द नरूटे, बिळेणी व्हनमाने, बिळेणसिध्द नरूटे, गेनसिध्द नरूटे, शिवप्पा नरूटे, पुतळाजी घोडके आदी उपस्थित होते. उपसरपंच निवडीनंतर कडते गटाच्या समर्थकांनी फटाके वाजवून जल्लोष केला.

# वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो

## प्रा. डॉ. रमेश शिंदे : उमा महाविद्यालयात आजचा तरुण आणि वाचन संस्कृतीवर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ जानेवारी-**
वाचनाने व्यक्तीच्या संवेदना जागृत होतात. व्यक्तीमध्ये वैचारिकताही निमर्ण होते. एकच पुस्तक वाचतानाचा अनुभव वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगळ्या पद्धतीने येतो. साहित्यात जी संस्कार मूल्ये असतात. ती वाचकाच्या मनामध्ये रुजतात. त्यामुळे व्यक्तिमत्व विकास होतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी केले.




येथील उमा महाविद्यालयामधील मराठी विभागांतर्गत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त आजचा तरुण आणि वाचन संस्कृती' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे होते. विद्यार्थ्यांनी क्रमिक अभ्यासक्रमातील पुस्तके वाचन करीत असताना आपल्या मनाला भावणाऱ्या व अनुभव समृद्ध करणाऱ्या इतरही मराठी साहित्याचे वाचन करावे. वाचनाने व्यक्तीच्या संवेदना जागृत होतात. व्यक्तीमध्ये वैचारिकताही निमर्ण होते. एकच पुस्तक वाचतानाचा अनुभव वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगळ्या पद्धतीने येतो.साहित्यात जी संस्कार मूल्ये असतात ती वाचकाच्या मनामध्ये रुजतात त्यामुळे व्यक्तिमत्व विकास होतो. म्हणूनच ग्रंथ हेच गुरु मानत असताना त्यांचे वाचनही महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन केले.

प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी 'राष्ट्राची प्रगती भाषा आणि संस्कृती यावर अवलंबून असते. या संस्कृतीचे जतन भाषेच्या माध्यमातून साहित्यात केले जाते. इतर भाषा अवगत असल्या तरी मराठी भाषे बद्दल अभिमान असावा. आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगत असताना मराठी साहित्याचे वाचन करणे व मराठी बोलणे आवश्यक आहे; त्यामुळे भाषा जिवंत व प्रवाही राहते असे विशद केले.

या कार्यक्रमासाठी आयक्युएसी कॉर्डिनेटर प्रा. अविनाश देशपांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एन. एस. लोखंडे, प्रा. ए. व्ही. कुलकर्णी, प्रा. ए. यू. चौगुले, प्रा. आर. डी. गाडे, प्रा. ए. डी. बनसोडे, प्रा. डी. एस. रणदिवे यांच्यासह पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. एन. सी. सर्वगोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दत्ता सरगर यांनी केले. आभार प्रा. वर्षा सरतापे यांनी मानले.

### उशिरा जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरणाला स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ जानेवारी-**
जन्म-मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ मधील सुधारणा २०२३ नुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही पुढील आदेशापर्यंत करण्यात येऊ नये, असे शासनाचे उपसचिव महेश वरुडकर यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना २१ जानेवारी २०२५ च्या पत्राद्वारे कळविले आहे. केंद्र सरकारने जन्म मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ मध्ये सुधारणा करुन उशीरा जन्म व मृत्यु नोंदणी संबंधीचे अधिकार हे जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीसंदर्भात शासनाकडे मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारींची चौकशी करणेकरिता गृह विभागामार्फत विशेष तपासणी पथकाची (एस.आय.टी.) स्थापना करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर सुधारणेनुसार उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही पुढील आदेशापर्यंत करण्यात येऊ नये, असे त्यांनी आपल्या पत्राद्वारे कळवले आहे. आता एसआयटी काय अहवाल देते? व यावर काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, क्लोज फाईलची ऑर्डर होणार का? नवीन दाखल करुन घेणार का? व दाखल केलेल्याचे काय? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

# ऑर्किड अभियांत्रिकीमध्ये सहा दिवसीय एफडीपीचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

तळे हिप्परगा येथे नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी येथील जनरल सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्यावतीने आयोजित एआयसीटीई, नवी दिल्लीच्यावतीने अटल ट्रेनिंग अ‍ॅण्ड लर्निंग अ‍ॅकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने सहा दिवस अटल ऑनलाईन एफडीपी आयडियाज टू इनोव्हेशन : ए पेटेंट लँडस्कॅप अ‍ॅप्रोच टू सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी को-रिलेशन या विषयावरील प्रोग्रामचे उद्घाटन झाले. या एफडीपीमध्ये सायन्स आणि टेक्नॉलॉजीमध्ये पेटंटचे महत्त्व, पेटंट बद्दल शोध आणि विश्लेषण तंत्र, तसेच ते कसे दाखल करावे, त्याच्या वेगवेगळ्या पद्धती व साधने याबद्दलची माहिती मिळणार आहे.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सेंट्रल फॉर रिसर्च अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट, सिंहगड इन्स्टिटयूट, सोलापूरचे प्रोफेसर व डायरेक्टर डॉ. शिवाजी पवार हे होते. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. पंचशीला उबाळे, तर सहसमन्वयक म्हणून डॉ. अश्विनी सदलापूरकर यांनी काम पाहिले. या सहा दिवसीय एफडीपीमध्ये एकूण १३ तांत्रिक सत्रांचा समावेश असून, विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली अनेक विषयांवर चर्चा करण्यात येणार असल्याचे सांगितले.

या प्रोग्रामसाठी विविध राज्यांतून २४२ लोकांनी सहभाग नोंदवला आहे. डॉ. मुमताज शेख यांनी सूत्रसंचालन केले तर समन्वयक डॉ. पंचशीला उबाळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे तांत्रिक दायित्व प्रा. आदित्य ढोबळे, आर. आर. पाटील यांनी काम पाहिले.

# नो डिजिटल झोनमध्ये डिजिटल लावल्याने किरकोळ वाद; काही काळ तणावाचे वातावरण

## महापालिकेने हटवल्यानंतरही दुसऱ्यांदा लावले डिजिटल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. २३ जानेवारी-**

सोलापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सात रस्ता चौकात नो डिजिटल झोन असताना परवानगीशिवाय भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून पालकमंत्र्यांच्या स्वागताचे डिजिटल फलक लावण्यात आले. महापालिका प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात पहिल्यांदा ते फलक काढले मात्र अवघ्या तासभरातच पुन्हा त्या पदाधिकाऱ्याने त्याच ठिकाणी डिजिटल लावला. महापालिका प्रशासनाने पुन्हा ते डिजिटल हटविण्याची कार्यवाही हाती घेतली.

सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्यानंतर जयकुमार गोरे हे आज प्रथमच सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांच्या स्वागतासाठी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी डिजिटल फलक लावले. सात रस्ता या ठिकाणी नो डिजिटल झोन असतानाही भाजपचे पदाधिकारी असलेले प्रकाश घोडके यांच्याकडून मोठा डिजिटल फलक लावण्यात आला होता. नो डिजिटल झोन मध्ये फलक लावता येत नाही. यामुळे महापालिका प्रशासनाकडून परवानगी देण्याचा संबंध येत नाही. तरीही या ठिकाणी भाजपच्या पदाधिकाऱ्याकडून डिजिटल फलक लावण्यात आले. हे निदर्शनास येताच महापालिकेच्या झोन क्रमांक सात कार्यालयाकडून सात रस्ता येतील डिजिटल हटविण्याची कारवाई करण्यात आली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई दुपारी करण्यात आली.

दुपारी कारवाईच्या वेळी संबंधित भाजपचे पदाधिकारी घोडके आणि पोलीस अधिकारी यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. दरम्यान पोलीस वर्षा पोलिसांनी भाजप पदाधिकाऱ्यास ताब्यात घेतले. नो डिजिटल झोन असलेल्या सात रस्ता चौकातील दोन डिजिटल हटविण्यात आले. मात्र तासाभरातच पुन्हा भाजपचे पदाधिकारी घोडके यांनी त्याच ठिकाणी दुसऱ्यांदा नवा डिजिटल फलक लावला. महापालिका प्रशासनाच्या विरोधाला न जुमानता खुद्द सत्ताधारी असलेल्या भाजप पदाधिकाऱ्यांकडून नियमबाह्यरित्या डिजिटल झळकवण्यात आले. खुद्द पालकमंत्र्यांच्या स्वागतासाठी संबंधित पदाधिकाऱ्यांकडून नियमबाह्यरित्या डिजिटल लावण्यात आल्याने शहरवासीयांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.

सात रस्ता चौकात काढण्यात आलेल्या त्या डिजिटल च्या जागेवरच पुन्हा संबंधितांनी डिजिटल लावल्याची माहिती मिळताच महापालिकेच्या झोन अधिकाऱ्यांनी ते विनापरवाना डिजिटल हटविण्याची कार्यवाही सायंकाळी हाती घेतली. पुन्हा नव्याने यंत्रणाची जुळवाजुळव करण्याची कार्यवाही महापालिका झोन कार्यालयाकडून सुरू होती.




### पोलीस अधिकारी आणि पदाधिकाऱ्यात शाब्दिक चकमक

दुपारी नो डिजिटल झोन मध्ये विनापरवाना लावलेले पालकमंत्र्यांच्या स्वागताचे डिजिटल बॅनर महापालिका प्रशासनाकडून काढण्यात येत असताना भाजपचे पदाधिकारी असलेले घोडके यांच्याकडून विरोध झाला. यादरम्यान पोलिस आणि त्यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. या दरम्यान पदाधिकारी घोडके यांनी थेट सात रस्ता चौकात रस्त्यावरच ठिय्या मांडला. अखेर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

### पुन्हा लावलेले डिजिटल काढण्याचे आदेश : उपायुक्त लोकरे

नो डिजिटल झोन असलेल्या सात रस्ता परिसरातून सकाळच्या सत्रात डिजिटल बॅनर पोलिसांच्या मदतीने काढण्यात आले होते. परंतु काही तासाने ते बॅनर पुन्हा लावण्यात आले आहेत. यावर संबंधित झोन अधिकारी हिदायत मुजावर यांना तातडीने पोलीस बंदोबस्त घेऊन काढण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.



सोलापूर : नवी दिल्ली येथे झालेल्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेचे उत्कृष्ठ वार्तांकन केल्याबद्दल तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांचा सत्कार समूह मुख्य संपादक दिलीप पेठे यांनी केला. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, ज्येष्ठ खो-खोपटू विजय तडसरे, रविंद्र नाशिककर उपस्थित होते.

# १०० दिवसात पेंडेन्सी कमी करण्यावर भर देणार

### पोलिस आयुक्त एम राजकुमार यांची माहिती

### आयुक्तालयाचा परिसरातही दिसणार बदल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**



पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सोलापुरात रूजू झाल्यानंतर सोलापूर शहर आयुक्तालयातील पेंडेन्सी ही १२०० वरून ४०० वर आणली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार आगामी १०० दिवसामध्ये ही पेंडेन्सी पूर्णपणे काढणार असल्याचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सांगितले. तसेच सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाचा परिसराचादेखील १०० दिवसामध्ये कायापालट झालेला असेल असेदेखील सांगितले.

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रत्येक खात्याने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून ठोस कामगिरी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या आराखड्यात लोककेंद्रित व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेला लाभ मिळणाऱ्या योजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत.

त्यानुसार सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयात सध्या असलेली ४०० अर्जांची पेंडेन्सी ही शून्यावर आणण्यासाठी प्रयत्न करणार येणार असल्याचे पोलिस आयुक्त राजकुमार यांनी सांगितले. तसेच सोलापूर शहर आयुक्तालयाच्या समोरील बाजूस असलेल्या जागेमध्ये नव्याने बाग तयार करण्यात येत असून याठिकाणी विविध फुलांची झाडे लावण्यात येणार आहेत. त्याचबरोबर आयुक्तालयाच्या वॉल कंम्पौडच्या भिंतीवर आकर्षकपध्दतीने चित्रे काढण्यात येणार आहे. जेणेकरून आयुक्तालयात येणाऱ्या नागरीकांना तणावमुक्त वातावरणात जात असल्याचा अनुभव येईल असेही आयुक्तांनी सांगितले.



# जिजामाता प्राथमिक शाळेत रथसप्तमी उत्सव व बक्षिस वितरण समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदास नगर कोंडी येथे रथसप्तमी उत्सव निमित्त हळदी- कुंकू, तिळगुळ -वाण वाटप व विद्यार्थी बक्षिस वितरण समारंभ झाला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ अश्विनी किणीकर, रुपाली कोरे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी बालवर्ग प्रमुख सुरेखा नान्नजकर होत्या. यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर व प्रमुख अतिथींचे भाषणे झाली. उपस्थित पालकांना वाण वाटप करण्यात आले तर विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या उपक्रमाचे माजी आमदार निर्मलाताई ठोकळ अध्यक्ष सचिन ठोकळ, उपाध्यक्ष अ‍ॅड. बिपिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर कदम, वनमाला ग्राम, राजश्री ढवण , अपर्णा चव्हाण, शुभांगी पाटील, विजयकुमार राजापुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी शाळांनी प्रस्ताव दाखल करावेत

**सोलापूर दि. २३ जानेवारी-**

जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त शासकीय अनुदानित, विना अनुदानित, कायम अनुदानित शाळांची त्यांच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांचे सर्व मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्तीचे प्रस्ताव तालुक्यातील शाळांनी संबधित पंचायत समितीकडे दाखल करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक मनिषा फुले यांनी केले आहे.

शासन निर्णयानुसार व विहीत प्रपत्रात सन २०२४-२५ चे प्रस्ताव सादर करण्यात यावे, तसेच सोलापूर शहरातील प्राथमिकचे प्रस्ताव प्रशासन अधिकारी सोलापूर मनपा शिक्षण मंडळ सोलापूर यांचे कार्यालयास व सोलापूर शहरातील माध्यमिक शाळांचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयास सादर करण्यात यावेत

"पहिल्या 3 दिवसात मिशन अयोध्या पहा आणि "चलो अयोध्या"च्या लकी ड्रॉ मध्ये सहभागी व्हा!
अधिक माहितीसाठी मिशन अयोध्याच्या सोशल पेजेसना भेट द्या."




लक्ष्मीनारायण सोलापूर ६.३०

पीव्हीआर मार्केट सिटी १.२५; आयनॉक्स हिंजवडी हायस्ट्रीट १.२०; पिव्हीआर पीएमसी वाकड ३.००; हेरिटेज मॉल पुणे दुपारी १२.३५; मिराज सिनेमा स्पाईनसिटी भोसरी पुणे दुपारी १.३०; वैभव हडपसर पुणे दुपारी ४.००; सिटीप्राइड मंगला पुणे दुपारी १.४५; सिटीप्राइड अभिरुची पुणे ४.३०; सिटीप्राईड कोथरूड दुपारी १.३०; विशाल पुणे दुपारी १२.००; फनटाइम सिहगड पुणे २.००; फनटाइम डिलक्स पुणे दुपारी २.३०; वसंत सिनेप्रो १२.३०; सिनेपोलिस सीझन मॉल पुणे ५.४५; पीआर सिनेप्लेक्स कोल्हापूर दुपारी ३.००; दिव्य सिनेमा नाशिक दुपारी १२.१५; अगस्ती अकोला दुपारी ३.००; स्टारलाईट देवगड दुपारी १२.००; राघवेंद्र कुरुंवाड दुपारी ३.००; गुंजन न्हावरे सायंकाळी ६.००; अतुल पुसेगाव दुपारी ३.००; अनुप वडुज दुपारी ३.००; गुंजन शिक्रापूर दुपारी ४.००; गुंजन यवत दुपारी ३.००; सिनेमार्क येवला दुपारी १२.००; सत्यम राजगुरुनगर संध्याकाळी ६.००; मुव्हीमॅक्स अमानोरा ११.१५; नवनाथ वाणेवाडी ३.००;

मुंबई - प्लाझा सिनेमा दादर १.००; जयहिंद लालबाग १२.००; पिव्हीआर - आयनॉक्स सिनेमाज : आर सिटी घाटकोपर १२.४५, मेट्रो कल्याण १.२५, रघुलिला वाशी १.२५, एक्सप्रीया पलावा डोंबिवली १.४०; मिराज सिनेमाज : आयमॅक्स वडाळा २.१५, अनुपम गोरेगाव १.००, दत्ताणी वसई १२.००, फनफिएस्टा नालासोपारा ६.००, सिनेराज पनवेल ५.००, आर मॉल मुलुंड १२.००, बी डोंबिवली १२.४५, स्टारसिटी अंबरनाथ ४.३०; मुव्हीमॅक्स सिनेमा : एसएम५ कल्याण ३.००; हुमा कांजुरमार्ग १२.००, वंडरमॉल ठाणे ३.३०; सिनेपोलिस विव्हीयाना मॉल ठाणे २.३०; मुव्हीटाईम हब गोरेगाव ५.१५; मॅक्सस बोरिवली २.००, भाईंदर ४.४५; के टि व्हिजन वसई १.३०; के टि व्हिजन बोईसर १२.३०; ट्रायोज लोणावळा ६.००

आयनॉक्स प्रोझोन छ. संभाजीनगर १२.४५; रिलायंस छ. संभाजीनगर १२.३०; मोहन नोवा छ. संभाजीनगर २.३०; रिवसरा छ. संभाजीनगर ६.१५ ; रिवसरा वळूज ६.००; मोहन आंबेजोगाई १२.३०; ईस्क्वेअर : अभिनय छ. संभाजीनगर १२.००; यशोदा लातूर स.११.००; भारत नांदेड १२.४५; संतोषीमाता बीड ३.१५; माऊली कैज ३.००; स्वस्तिक वैजापूर १२.००, ६.००; मनोहर मुखेड ३.००; ओमराज जाफराबाद ३.००; प्रदिप सोयेगाव ६.००; राधाराम बासमत १२.००; हिरा भोकरधन १२.००; कृष्णा जालना १२.००; जवाहर तुळजापूर ६.००; मिनाक्षी शेलू ३.३०; ताज उस्मानाबाद ३.३०; आर के उदगीर ३.००; श्रीनाथ परळी ३, ९; मिराज अकोला १.३०; मिराज अमरावती ४.००; सिनेमॅजिक चिखली १२.००; मिराज चंद्रपूर १.४५; सिनेमार्क मेहकर ३.००; मिराज नंदुरबार ४.४५; एआरडी बुलढाणा स. ११.००; स्टार जळगाव ११.००; एलिमेंट यवतमाळ १२.३०; विजयश्री मालेगाव १२.००, ३.००

भागवत सिनेमाज

फुल्ली एअर कंडिशंड




Sky Force (Hindi) (U/A): 9.30 am, 12.30, 3.30, 6.30, 9.30 & 10.00 pm
Fussclass Dabhade (Marathi) (U/A): 12.15 & 7.00 pm
Pushpa 2: Reloaded (Hindi) (U/A) (2D): 3.00 pm

*Schedule subject to change




चित्रपटाचा आनंद
घ्या आता आलिशान रिक्लिनर सीट्स, आरामदायी सोफा सीट्स वर

८, भागवत सिनेमा मुरारजी पेठ, सोलापूर.
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा (0217) 2725866 / 82630 95102

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सद्‌भावना तिरंगा केंद्राचा आज शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २४ ते २६ जानेवारी २०२५ रोजी सद्भावना तिरंगा केंद्र सुरू राहणार आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शहरातील हॉटेल सिटी पार्कच्या मागे असलेल्या तिरंगा बंगला येथे शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी सकाळी या सद्भावना तिरंगा केंद्राचा शुभारंभ होणार आहे. या ठिकाणी साडेतीन ते चार फुटाची फायबरची भारत मातेची मूर्ती उपलब्ध आहे. तसेच तिरंगा ध्वज, अशोक स्तंभ, तिरंगा टी-शर्ट यासह विविध तिरंगा वस्तूसह मिठाई उपलब्ध राहणार आहे. रविवार दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता मान्यवरांच्या हस्ते भारत मातेच्या मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे. मंगळवार दि. २८ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता अमेरिकेतील अभियंता दिलीप गांधी यांच्यासोबत वार्तालाप कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान, दि. २८ व ३० जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने विविध आश्रम शाळा आणि कॉलनीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिठाईवाटप कार्यक्रम अभियंता दिलीप गांधी यांच्या हस्ते होणार आहे. या पत्रकार परिषदेस ध्रुवेश गांधी, रोशन शेख, सोना गांधी, स्मृती गांधी, स्नेहा गांधी, रूपा पारेख, नारायण छाबरीया, प्रकाश लोढा, राकेश मालू , गणेश खेडकर आदी उपस्थित होते.

## क्राईम वृत्त...

### मुल्लाबाबा टेकडीजवळ कोयत्याने वार; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

मुल्लाबाबा टेकडीजवळ कोयत्याने वार करून खूनाचा प्रयत्न करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उमर बडेसाब पटेल (वय ४२, रा. सिध्देश्वर पेठ, मुल्लाबाबा टेकडी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सोहेल उर्फ कासीम शेख (रा. मुल्लाबाब टेकडी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमर पटेल यांचे मुल्लाबाब टेकडीच्या पायथ्याशी किराणा दुकान आहे. २२ जानेवारी रोजी सायंकाळी मुल्लाबाबा टेकडीच्या पायथ्याशी उमर पटेल याच्या दुकानात दारूच्या नशेत येऊन सोहेल शेख याने उमर पटेल यांच्या वडीलांना मारहाण केली होती. त्याबाबत उमर पटेल हे सोहेल शेख यास विचारणा करण्यासाठी गेले असता सोहेलने त्यांस ठार मारण्याची धमकी देत त्याच्याजवळील कोयत्याने डोक्यात तीन ते चार वार करून खूनाचा प्रयत्न केला. तसेच यावेळी जमलेल्या लोकांना दमदाटी करून दहशत निर्माण केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे तपास करीत आहेत.

### लॉजच्या पार्कींगमधून १ लाख ३० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

शहरातील मुरारजी पेठेतील अनिल लॉजच्या पार्किंगमधून चोरट्याने मोटारसायकल व मोबाईल असा १ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबबात अकलाक अ.वहाब काझी (वय ३१, रा. आयशा नगर, शांती नगर, नई जिंदगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० जानेवारी रोजी रात्री अकलाख काझी यांनी त्यांची एमएच १३ ईएम ०७८३ क्रमांकाची दुचाकी अनिल लॉजच्या पार्किंगमध्ये पार्क केली होती. चोरट्याने काझी यांची मोटारसायकल व मोबाईल असा १ लाख ३० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीला धडक; रुग्णावहिका चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

शहरातील बाळे येथील खडक गल्ली येथे दुचाकीला धडक देणाऱ्या रुग्णवाहिकेच्या चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अशोक पांडुरंग आयवळे (वय ५६, रा. हौसे वस्ती, आमराई, होलार समाज मंदीर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रुग्णवाहिका क्र. एम एच १३ सीयू ८८८२ च्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक आयवळे हे २२ जानेवारी रोजी दुपारी बार्शी ते सोलापूर कडे येणाऱ्या रस्त्याने एमएच १३ डीजी ९९३२ क्रमांकाच्या दुचाकीवरून जात होते. त्यावेळी रुग्णवाहिका क्र. एमएच १३ सीयू ८८८२ च्या चालकाने रुग्णवाहिका निष्काळजीपणे चालवून अशोक आयवळे यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये आयवळे हे गंभीर जखमी झाल्याने याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

### चारित्र्याच्या संशयावरून छळ;पतीसह सातजणावर गुन्हा

**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

विवाहितेचा चारित्र्याच्या संशयावरून छळ करणाऱ्या पतीसह सातजणांविरुध्द एआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मेघा नितीन मंताटी (वय २२, रा. पिठ्ठा नगर, विडी घरकुल, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती नितीन मंताटी, सासरे श्रीनिवास मंताटे, सासू रजन मंताटी, सागर मंताटी, अक्षय मंताटी, भारताबाई मंताटी, अंबादास म्हंता (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जानेवारी २०२३ ते २२ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मेघा या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती नितीन व इतरांनी मेघा यांना नांदविण्यास तयार नव्हते. त्यामुळे मेघा यांनी समाजातील प्रतिष्ठित लोकांना घेऊन बैठक केली असता तेथे पती व इतरांनी मेघा यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्यांना नांदविण्यास नकार दिला, तसेच घटस्फोट देणार आहे व जे काही आहे ते कोर्टात बघू, असे म्हणून बैठकीतून निघून गेले. भविष्यात पती व इतरांकडून मेघांना चांगले नांदवितील याची खात्री नसल्याने याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






सोलापूर - शहर पोलिस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण, राज्य राखीव बल, पोलिस प्रशिक्षण केंद्र येथील प्लाटून तसेच एनसीसी, आरएसपी विद्यार्थ्यांचे प्लाटून यांचा प्रजासत्ताक दिनाच्या परेडचा सराव सुरु आहे. परेडमध्ये सहभागी होणाऱ्या प्लाटूनची रंगीत तालीम सध्या मुख्यालयाच्या मैदानावर सूरू आहे. (छाया : केवल तिवारी)

# सोलापूर जिल्ह्यात ९५ टक्के रब्बी पेरणी

## बार्शी तालुक्यात सर्वाधिक तर करमाळ्यात सर्वात कमी पेरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात यंदा मुबलक पाऊसकाळ झाल्याने शेतकरी बांधवांत अत्यंत समाधानाचे वातावरण आहे तर सोलापूर शहराचाही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णत: मिटला आहे. दरम्यान, यंदा उशिरापर्यंत परतीचा पाऊस पडल्याने जमिनीचा वापसा लवकर झाला नसल्याने उशिराने रब्बीच्या पेरण्या झाल्या. या पेरणीमध्ये बार्शी तालुक्याने बाजी मारून जवळपास १३२ टक्के पेरणी केली तर करमाळा तालुक्यात अवघी ६६ टक्के रब्बी पेरणी झाली आहे. तर संपूर्ण जिल्ह्यात ९५ टक्के पेरणी झाली आहे.

सध्या जिल्हाभरातील रब्बी हंगामाची पिके जोरात आल्याचे दिसत असून, ज्यांच्याकडे पाण्याचे साधन आहे त्यांचा कडबा 'परसाच्या'वर (६ फूट) आहे. या हंगामातील पिकांच्या कोळपणी, खुरपणीसाठीही पावसाने उघडीप दिल्याने ही पिके चांगलीच बहरली आहेत. ज्वारीबरोबर गहू, हरभरा, करडई आदी पिकेही जोमात आहेत. तर उसाचीही लागण वाढल्याने यंदा शिवारांमध्ये उसाचे पीकही चांगलेच डोलत आहे. ऊस पिकाला जास्तीचे पाणी



लागत असल्याने ते पाणी मोकळे न देता ठिबकद्वारे द्यावे, असेही आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील सरासरी ४ लाख ६० हजार ९१८ हेक्टर क्षेत्रापैकी ४ लाख ३६ हजार २९१.८ हे. क्षेत्रावर ९४.६६ टक्के इतका पेरा झाला आहे. तर तालुकानिहाय रब्बी हंगाम पेरणी पाहता उत्तर सोलापूर ९७.४१ टक्के, द. सोलापूर ८५.१४, बार्शी १३१.५२, अक्कलकोट ९५.३५, मोहोळ ८२.८३, माढा ८४.०२, पंढरपूर ११७.६७, सांगोला ९९.१२, माळशिरसस १००.६६ टक्के तर मंगळवेढा तालुक्यात ९८.९१ टक्के इतकी पेरणी झाली आहे. सध्या हरभरा, गहू, ज्वारी आणि ऊस चांगलाच डोलत असून, यंदा शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

### ● उशिराने पेरणी झाल्याने ज्वारीची पेरणी कमी

यावर्षी पावसाळ्यात सर्वच नक्षत्राच्या पाऊसधारा जोरदार कोसळल्याने जिल्ह्याच्या सरासरीच्या दीडपट (७०० मिमीच्या पुढे) यंदा पाऊस झाला. यामुळे जमिनीला वापसा लवकर झाला नसल्याने ज्वारी पेरणीचा मोसम निघून गेला. यामुळे सरासरी ३ लाख १८ हजार ०५७ हेक्टरपैकी २ लाख ५२ हजार ४६० हे. क्षेत्रावर ज्वारी पेरणी झाली आहे. मात्र यंदा ज्वारी पिकाला पोषक वातावरण मिळाल्याने उत्पन्नाचा टक्का चांगलाच वाढणार आहे. गव्हाचे क्षेत्र ४२ हजार ५८८ हे. वरून ५२ हजार १०८ हे. पर्यंत यंदा गेले तर हरभरा पिकाचे क्षेत्र सरासरी ५९ हजार ४१२ असते तर यामध्येही वाढ होवून यंदा ६८ हजार १९९ पर्यंत हरभरा पेरणी झाली आहे.

### ● बांधावर जावून पीक पाहणीचा फायदा शेतकऱ्यांना

जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी यंदा नवा पॅटर्न राबवून जिल्ह्यातील १९ तालुक्याचे कृषी अधिकारी, मोहोळचे कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख, विभागीय कृषी केंद्र, राहुरीचे अधिकाऱ्यांचा तालुकानिहाय संयुक्त पाहणी दौरा सुरू केला आहे. आतापर्यंत सांगोला आणि उत्तर सोलापूर तालुक्याचा दौरा त्यांनी केला. त्यांच्या पाहणीत आढळलेल्या त्रुटींबाबत शेतकरी बांधवांना ही टीम थेट मार्गदर्शन करत आहेत. यामुळे शेतकरी आणि कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या ज्ञानात मोठी भर पडत आहे. याचा परिणाम पीकवृध्दी, फळबागा, द्राक्षबागांना होणार आहे.

### ● आवर्तन सोडल्याने ऊस, रब्बी हंगामाला फायदा

उजनी धरणामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रात मोठी उत्क्रांती निर्माण होवून शेतकरी बांधवांची आर्थिक उन्नती झाली. यामुळेच 'पिकांची विविध'ता जोपासण्यात आपला सोलापूर जिल्हा सध्या राज्यात अव्वल ठरला आहे. नुकतेच उजनीतून पाण्याचे पहिले आवर्तन सोडल्याने या पाण्याचा ऊस, फळबागा, द्राक्षबागा, रब्बी हंगामातील पिकांना फायदा होणार आहे.

### ● शासनाकडून योजनांचा पाऊस; मात्र अनुदान थकले

राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, सोलर पंप, शेततळी, पिकविमा, कोल्ड स्टोरेज, पॉलिहाऊस, विविध कृषी विषयक अवजारे, सवलतीच्या दरात ट्रॅक्टर्स देणे, माती नमुने तपासून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, खते, बि-बियाणे आदींचा शासनस्तरावरून मुबलक पुरवठा होत असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांची समृध्दीच्या दिशेने वाटचाल चालू आहे. दरम्यान, शासनाकडून देण्यात येणारे जिल्ह्याचे ५० कोटीच्या पुढे अनुदान थकल्याची खंत जाणकार शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत. यामुळे शासनाने काही योजनांवर दिलेले थकीत अनुदान (शेततळी वगैरे) शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकर वर्ग करावे, ही अपेक्षा शेतकऱ्यांची आहे.

### इथेनॉलमध्ये मका वापर होत असल्याने क्षेत्र वाढले

तृणधान्य पिकांमध्ये गहू, धान, पिकानंतर मक्याचा समावेश होतो. पाण्याची उपलब्धता, हवामान यानुसार सदर पिके घेतली जातात. परंतु भिन्न हवामानाशी जलद समरस होण्याची क्षमता असलेल्या मक्याकडे शेतकरी वळला आहे. त्यामुळे यंदा जिल्ह्यात मका पिकाचे क्षेत्र वाढले आहे. जिल्ह्यात यंदा सरासरी ३६ हजार ४९३ हेक्टरवरुन ६२ हजार क्षेत्रावर मका पेरणी, लागवड झाली आहे. इतकेच नाहीतर इथेनॉलमध्ये मका वापर होत असल्याने या पिकाचे दरही वाढले आहेत. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मका पिकाकडे वळला आहे.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

# एकाचवेळी आढळून आले दोन वेगवेगळ्या जातीचे विषारी साप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

विजापूर रोडवरील रेणुकानगर येथील शुभम सुभाष धुमाळ यांच्या घराच्या कंपाउंड मधील लाकडाच्या ढिगाऱ्यामध्ये पहिला घोणस जातीचा साप आढळून आला. तत्काळ धुमाळ यांनी सर्पमित्र आणि अनिल अलधर यांना बोलाविले.



हा साप पकडत असताना लाकडाच्या ढिगाऱ्याखाली आश्चर्यकारक अजून एक साडेपाच फुटाचा नाग जातीचा विषारी साप आढळून आला. सर्पमित्र अलधर यांनी मोठ्या शिताफीने दोन्ही विषारी सापास काही ईजा न होता पकडून निसर्गाच्या सान्निध्यात सोडून दिले. परिसरातील नागरिकांना सापाविषयी माहिती व काळजी कशी घ्यावी. कारण थंडीच्या दिवसात साप, गरम उबदार ठिकाणी आढळतात अशी माहिती अलधर यांनी सांगितली.

# महिला प्रांताधिकाऱ्यांना वाळू तस्कराकडून शिवीगाळ अन्‌ धक्काबुक्की

## तीन जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

सोलापूरमध्ये अवैध वाळू घेऊन जाणाऱ्याला अटक करण्यात आली आहे. पेट्रोलिंगला गेलल्या महिला प्रांताधिकारी यांच्या अंगावर जात शिवीगाळ व धक्काबुक्की देखील केली.

अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी पेट्रोलिंगला गेलल्या महिला प्रांताधिकारी यांच्या शासकीय वाहनाला आपले वाहन आडवे लावून महिला प्रांताधिकाऱ्यांच्या अंगावर जात शिवीगाळ व धक्काबुक्की करत शासकीय कामात अडथळा आणला. ही घटना दि. २३ रोजी पहाटेच्या सुमारास वरवडे टोल नाक्यानजीक घडली. याबाबत ग्राम महसूल अधिकारी (कुर्डुवाडी) प्रवीण किसन बोटे यांच्या फिर्यादीवरुन टेंभुर्णी पोलिसांत अण्णा पाटील शिराळ (रा. टेंभुर्णी, ता.माढा), अप्पा पराडे (रा. बाबुळगाव ता. माळशिरस), गणेश सोमनाथ काशीद (रा. परितेवाडी ता. माढा) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबरोबरच प्रांताधिकारी यांच्या पथकाकडून वाळू वाहतूक करताना पकडलेला बिगर नंबरचा टिपर व ४ ब्रास वाळू असा एकूण



२ लाख २८ हजारांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.२३ रोजी पहाटे १२.३० वाजण्याच्या सुमारास कुर्डुवाडी -भोसरे- घाटणे-लऊळ- उजनी मा- वरवडे यामार्गे टेंभुर्णीकडे जात असताना पुणे-सोलापुर रस्त्याच्या लाईनवरून एक वाळूचा टिपर सोलापुरच्या दिशेने जात असताना दिसला.

यावेळी प्रांताधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे यु टर्न घेऊन वाळूच्या टिपरचा पाठलाग करुन वरवडे टोल नाक्याजवळ टिपर थांबवण्यात आला. यावेळी टिपर चालक पळून जात असताना त्याला पथकातील कर्मचाऱ्यांनी पाठलाग करत पकडले असता त्याने त्याचे नाव गणेश सोमनाथ काशीद असे सांगितले. प्रांताच्या पथकाने टिपरची पाहणी केली असता एकूण ४ ब्रास वाळू आढळून आली. दरम्यान टिपर चालक कोणाला तरी फोन लावून आपला टिपर पकडला आहे असे सांगत होता.

सदर टिपरबाबत चालकाकडे चौकशी केली असता त्याने अप्पा पराडे यांचा टिपर असून टिपरमधील वाळू अण्णा पाटील यांच्या शिराळा टेंभुर्णी येथील खड्ड्यावरुन आणल्याचे सांगितले. पांढऱ्या रंगाची फॉर्च्यनर गाडी क्रमांक एम एच ४२ बी ३३९६ या गाडीतूनही कोणीतरी शासकीय गाडीला हात करुन थांबविण्याचा प्रयत्न करत होते. प्रांतांची गाडी थांबत नसल्याचे दिसताच संबंधित फार्च्यूनर गाडीतील इसमाने रोडवर गाडी आडवी लावून रस्ता बंद करुन टाकला. त्यावेळी महिला प्रांताधिकारी यांना धक्काबुक्की करत पथकातील कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून गेले. त्यावेळी त्यांच्यासोबत अप्पा पराडे व टिपर चालक देखील होते. टिपर घेऊन जाण्याचा ते प्रयत्न करत होते. त्यानंतर टेंभुर्णी पोलिस ठाण्यास फोन केला व पोलिस आल्याचे पाहून ते वाहनासह पळून गेले. सदर पथकाने पोलिस बंदोबस्तात टिपर व टिपरवरील चालकास टेंभुर्णी पोलिस ठाण्यात आणले. याबाबत टेंभूर्णी पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बोर्ड परीक्षेला 'त्या' शाळेतील केंद्र संचालक नसणार

## १० वी व १२ परीक्षेसाठी बोर्डाची नवे नियम | पारदर्शक कारभारासह कॉपीमुक्त परीक्षेला मिळणार गती

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने नवीन नियमावली जाहीर करण्यात आली आहे. या नव्या नियमानुसार संबंधित शाळेतील मुख्याध्यापकांची नियुक्ती त्याच शाळांमध्ये केंद्र संचालक या पदावर नसणार आहे. त्यापदावर ईतर शाळेतील मुख्याध्यापकाची केंद्र संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. परीक्षेचा कारभार पारदर्शक राहणार आहे.



दरम्यान, इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी व मार्च महिन्यात संपन्न होणार आहेत. याच पार्श्वभूमीवर बोर्डातील अधिकाऱ्यांची मुख्याध्यापकांसमवेत बैठक संपन्न झाली. सोलापूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या मुख्याध्यापकांच्या या बैठकीत विविध विषय चर्चेला आले. सीसीटीव्ही कॅमेरा, सुरक्षा, पोलीस बंदोबस्त, कॉपीमुक्त परीक्षा यांसह केंद्र संचालक नियुक्ती विषय महत्त्वाचे ठरले. परीक्षेच्या काळामध्ये विशेषतः ग्रामीण भागामध्ये त्याच शाळेतील मुख्याध्यापक केंद्र संचालक या पदावर कार्यरत असतात. अपवाद वगळता काही परीक्षा केंद्रांमध्ये कॉपी प्रकरण वाढलेले दिसते. तसेच संस्था आणि शाळेची पत टिकून राहण्यासाठी पारदर्शकतेला केराची टोपली दाखवली जाते. त्यामुळे कॉपीमुक्त परीक्षेला अधिक गती मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात दहावीचे १८५ केंद्र तर बारावीचे १२१ परीक्षा केंद्र संख्या आहे. त्यानुसार या केंद्र संचालकांची नियुक्ती बदली प्रमाणे केली जाणार आहे. यासंदर्भात बोर्ड अधिकारी व मुख्याध्यापक यांची बैठक मागील महिन्यात संपन्न झाली. यानंतर लवकरच केंद्र संचालक आणि बोर्ड अधिकारी यांची देखील बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीमध्ये यासंदर्भात अंतिम निर्णय घेऊन नियुक्ती केली जाणार आहे.

### पारदर्शक कारभारासह कॉपीमुक्त परीक्षेला मिळणार गती

इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेसाठी बोर्डाच्यावतीने नवीन नियम जारी करण्यात आले आहेत. या संदर्भात संबंधित केंद्रांच्या मुख्याध्यापकांची बैठक घेण्यात आली आहे. त्यानंतर केंद्र संचालकांची निवड करून परीक्षा केंद्र प्रमाणे केंद्र संचालकांची नियुक्ती बदली प्रमाणे केली जाईल, त्यासाठी लवकरच आढावा बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीत संवेदनशील परीक्षा केंद्र यांची माहिती घेतली जाणार आहे. संबंधित परीक्षा केंद्रामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा आवश्यक असून त्याची देखील पाहणी केली जाणार आहेत. सोलापूर शहर जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांसाठी लवकरच भरारी पथकांची देखील नेमणूक देखील केली जाणार आहे. विशेषतः संवेदनशील परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांद्वारे कॉपीमुक्त परीक्षेसाठी पाहणी केली जाणार आहे.



# नॉव्हेल्टी दुकानातून १ लाख २० हजारांचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

शहरातील विडी घरकुल परिसरातील मेघा नॉव्हेल्टी या दुकानातून चोरट्याने महिलेचे १ लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण ठेवलेली पर्स चोरून नेली.

याबाबत लक्ष्मी विजय पोतदार (वय ५२, रा. किसान संकुल, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मी पोतदार या २२ जानेवारी रोजी दुपारी विडी घरकुल परिसरताल मेघा नॉव्हेल्टी या दुकानात खरेदीसाठी गेल्या होत्या.

त्यावेळी त्यांनी काऊंटरवर त्यांची सोनेरी पर्स ठेवली होती. ती पर्स चोरट्याने चोरून नेली. या पर्समध्ये १ लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण होते, अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१२

**वस्तू घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे ।**
**नातरी कन्या पाहूनियां म्हणिजे । मना नये हें ।।**

विश्वरुपातील काही भयानक तोंडे पाहून व विश्वमुखात जात असलेले जीव पाहून अर्जुन भयभीत झाला होता. विश्वरुप पाहण्याअगोदर त्याला विश्वरुप गोजिरवाणे, गोंडस असेल असे वाटत होते. पण जगाच्या पाठीवर निर्माण होणाऱ्या सर्व चांगल्या-वाईट, गोड-भेसूर जीवांचे एकत्रीकरण या विश्वरुपात असते, हे अर्जुनाला माहित नव्हते. विश्वरुपातून अर्जुनाला भगवंताचा खरा परिचय तर झालाच होता पण स्वत:चाही परिचय त्याला झाला होता. भिती बरोबर तो विश्वरुप पाहून खूप आनंदीही झाला होता. या आनंदाच्या भरात तो भगवंताला अलिंगन देऊ इच्छित होता. हे अलिंगन तो विश्वरुपाला न देता तो श्रीकृष्णाच्या मूळ स्वरुपाला देऊ इच्छित होता.


संत ज्ञानेश्वर महाराज

विश्वरुप पाहून त्याचे मन आता भरले होते. म्हणून आता त्याला विश्वरुपाऐवजी श्रीकृष्णाचे मूळ गोजिरवाणे स्वरुप पाहावे वाटत होते. अर्थात त्याची इच्छा पूर्ण झाल्याने किंवा त्या विश्वरुपाचा पाहिजे तसा व पाहिजे तेवढा आनंद घेतल्याने आता त्याला विश्वरुप नको होते. माणूसही आपल्या जीवनात असेच वागतो. एखाद्या वस्तूचा उपभोग घेतल्यानतर ती टाकून देतो किंवा उपभोग संपल्यानंतर रत्नालाही दुषण ठेवतो. लग्न करण्यासाठी एखाद्याच्या कन्येला पाहण्याची उत्सुकता दर्शवून तिला पाहिल्यानंतर मला ती पसंद नाही असे तो म्हणतो. हे सांगतांना माऊली म्हणतात,

**वस्तू घेऊनि वाळिजे । जैसें रत्नासि दूषण ठेविजे ।**
**नातरी कन्या पाहूनियां म्हणिजे । मना नये हें ।।**

या ओवीप्रमाणे अर्जुनाची विश्वरुप पाहण्याची इच्छा पूर्ण झाल्याने, आता हे विश्वरुप बंद कर, मला ते आता नको आहे, असे म्हणत असल्याचे माऊली सांगतात माऊलींनी आजच्या ओवित अत्यंत मार्मीक व समाजात दैनंदिन घडत असलेला दृष्टांत दिला आहे. अनेक तरूण स्वत:साठी पत्नी म्हणून एखाद्याची मुलगी पाहायाला जातात. मुलीबद्दल जवळपास सर्व काही त्या तरूणाला माहितीही असते. तरीपण तिला अनेक तरुण वस्तू समजतात आणि आपणाला ती पसंद नाही असे म्हणतात. तिच्या मनाचा अजिबात विचार करत नाहीत, एवढेच काय मूलीला पहातात, ती पसंद आहे असे म्हणून तिच्याशी लग्न करतात, आणि कालांतराने मला ही पत्नी पसंद नाही म्हणून तिला वेगवेगळ्याप्रकारे नांव ठेवुन सोडून देण्याची भाषा वापरतात. स्त्री म्हणजे जणू एक वस्तूच आहे असे समजून तिचा उपभोग घेउन आता तिची गरज नाही असे समजून तिला परत घेऊन जायला तिच्या आई-वडिलांना सांगतात. बऱ्याचवेळा तर घरातून हाकलून देण्याचा किंवा तिला संपवून टाकण्याचा प्रयत्नही करतात. माऊलींना या ठिकाणी सांगायचे आहे की स्त्री ही एक वस्तू नाही. तिलाही पुरूषांबरोबर बरोबरीने सर्व हक्क आहेत. तिलाही मन, अपेक्षा असतात. या सर्व गोष्टींचा प्रत्येक पुरुषाने विचार करुन तिला जीवनसाथी समजुन बरोबरीचा दर्जा द्यावा. आपण माऊलींचे शिष्य असल्याने स्वप्नातही आपल्याकडून स्त्रीचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २४ जानेवारी २०२५ | राष्ट्रीय बालिका दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - पौष | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. दशमी - (१९.२४) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - शिशिर | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - अनुराधा (३१.०६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - वृध्दि (२९.०७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - बव (अहोरात्र) | |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# मंगळवेढ्यात उद्या शिवार साहित्य संमेलन

## ''शेती मातीची गाणी'' या कार्यक्रमाने समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा-दामाजीनगरचे ६वे शिवार साहित्य संमेलन शरदनगर मंगळवेढा येथे शनिवार २५ जानेवारीला होत आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. दौलतसिंह रजपुत हे असुन संमेलनाच्या अध्यक्षपदी जेष्ठ लेखिका वासंती मेरु हे आहेत, अशी माहिती मसाप दामाजी नगरचे कार्याध्यक्ष दिगंबर भगरे यांनी दिली.



संमेलनात निघणाऱ्या साहित्य कृषी दिंडीची सुरुवात माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांचे हस्ते आणि प्रयोगशिल शेतकरी वैभव मोडक यांच्या प्रमुख उपस्थिती निघणार आहे. संमेलनाचे उदघाटन संमेलनाच्या अध्यक्षा मेरु यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. शिवाजीराव काळुंगे आणि प्रा. शोभा काळुंगे यांचे हस्ते होईल. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी आणि कल्याणराव शिंदे यांच्या उपस्थितीत होईल. याच वेळी श्रीमती मेरु लिखित ''व्यथा काळजाची'' या कथासंग्रहाचे प्रकाशन मसाप दामाजीनगर शाखेचे अध्यक्ष प्रकाश जडे यांचे हस्ते होईल. या नंतरच्या सत्रात जेष्ठ कथालेखक राजेंद्र भोसले यांचे अध्यक्षतेखाली संध्या धर्माधिकारी, दिगंबर यादव, महादेव ढोणे, भारती धनवे, अक्षय टोमके हे सहभागी होणार आहेत. शिवार चर्चेत ज्वारीचे कोठार अशी ओळख असणाऱ्या मंगळवेढ्याची ओळख पुसली जात आहे या संबंधाने-जोंधळ्याचे चांदणे मावळु लागलय या विषयावर चर्चेत ॲड. नंदकुमार पवार यांचे अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. वामन जाधव, प्रा. दौलतसिंह रजपुत, माजी सनदी अधिकारी भूषणा करंदीकर, डॉ.मीनाक्षी कदम या सहभागी होतील. यांची असेल. शिवार भोजनानंतर प्रा. रघुराज मेटकरी यांचे अध्यक्षतेखाली कवि संमेलन होईल. सूरसंगम ग्रुप प्रस्तुत ''शेती मातीची गाणी'' हा गाण्याचा कार्यक्रम होईल. समारोप रिद्दी सध्दी गणपती ट्रस्टचे अशोक कोळी करतील.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो. ९९६००५३५२१

### अलक:- (३०) हिंदू

भारताला आपली मातृभूमी मानणारे सगळे हिंदू आहेत. या हिंदू समाजाचे एकत्रिकरण करणे हे संघाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे भारतीय म्हणजे हिंदू ही संघाची व्यापक भूमिका आहे. हिंदू समाज हा पुरातन काळापासूनच अनेक वर्ण-जाती- पंथ यात विभागला गेला आहे. प्रत्येक जात स्वत:ला इतरांपेक्षा वेगळी समजते. कोणत्याही प्रकारचा वर्णद्वेष तसेच जातीभेदाला संघात थारा नाही. तमाम जातीपंथांमध्ये एकोपा असलेला हिंदू समाज असणे; हे संघाला अपेक्षित आहे. हे साध्य करताना अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करून; उरलेल्या हिंदू परंपरांचे संवर्धन व्हावे, असे संघाचे धोरण आहे. भारतीयत्व - राष्ट्रीयत्व-हिंदुत्व या गोष्टींचा सर्वसामान्यांमध्ये अभिमान जागृत करणे व. भारत देशाला परम वैभवाकडे नेणे; हे आपले कर्तव्य आहे; असे संघ कार्यकर्ते समजतात. संघ कोणाच्या विरोधात काम करत नाही. तो इसाई किंवा मुस्लिम किंवा तत्सम धर्म संप्रदाय यांचा विरोधक नाही. हे सर्वजण पूर्वीचे हिंदूच आहेत; त्यांचे काही कारणाने धर्मांतरण झाले आहे. आज या लोकांनी त्यांच्या स्वभावातील उदारता दाखवावी. राष्ट्र सर्वप्रथम मानावे भारत माता की जय आदराने म्हणावे. वंदे मातरम.

**- क्रमश:**

# पोलिस, वकिल यांच्या संयुक्त विद्यमाने हेल्मेट रॅली

## रस्ता सुरक्षा सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सोलापूरचे प्रमुख न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी सोलापूर शहरामध्ये शिरणान फेरी (हेल्मेट रॅली) काढण्यात आली.

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर शहर पोलीस वाहतुक शाखा व सोलापूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्हा न्यायालयातून बुधवारी सकाळी सदर रॅली काढण्यात आली. रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्ताने सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तर्फे आयोजीत करण्यात आलेल्या हेल्मेट रॅलीला प्रमुख जिल्हा न्यायाधीश मो. सलमान आझमी, पोलिस आयुक्त एम राजकुमार, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी विजय पाटील व सोलापूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात आला. या प्रसंगी पोलिस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, जिल्हा न्यायाधीश आर.जे. कारीया, जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंह राजपूत, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय तिराणकर आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाची प्रस्तावना विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी यांनी केले. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी रस्ता सुरक्षा बाबत माहिती दिली. पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी प्रत्येक नागरिकांना वाहन चालवताना हेल्मेट घालावे असे अवाहन केले. तसेच प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी रस्ते वाहतुकीच्या नियमाचे पालन करण्याबाबत जनतेला आवाहन केले.

सदरची रॅली जिल्हा न्यायालय येथून सुरु होऊन रंगभवन चौक-डफरिन चौक-रेल्वे स्टेशन-मोदी पोलिस चौकी-सातरस्ता-गांधीनगर-गुरुनानक चौक-अशोक चौक पोलीस चौकी-पोलिस मुख्यालय या मार्गावरून जिल्हा न्यायालयापर्यंत रॅली काढण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. देवयानी किणगी यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहायक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर यांनी मानले. सदर कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, विधीश, न्यायालयीन कर्मचारी, प्रादेशिक परिवहनचे मोटार वाहन निरिक्षक विश्वंभर कोकाटे, श्रीमती. पल्लवी पांडव, श्रीमती प्रियंका माने, महेशकुमार गावडे, श्रीमती, तेजस्वीनी वायचळ, श्रीमती. भाग्यश्री रोडगे, पोलिस निरीक्षक श्री. रविंद्र भंडारे व सुरज मुलाणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सोलापूरचे कर्मचारी, लोकअभिरक्षक कार्यालयाचे विधिज्ञ, पोलीस कर्मचारी, मोटार रायडर संघटनेचे पवन मोंढे, मोटार ड्रायविंग स्कुलचे प्रफुल्ल पानगांवकर, पोतदार शाळेचे शिक्षक करण शिंदे, पोतदार शाळेचे विद्यार्थी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणी भरताना तोल जाऊन पडल्याने तरूणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

होनसळ (ता. उत्तर सोलापूर) येथे पाणी भरून घरी आलेल्या तरूणाचा अचानक तोल जाऊन पडून डोक्यास मार लागल्याने मृत्यू झाला.

एकनाथ विठ्ठल करडे (वय २७, रा. होनसळ) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. २१ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास एकनाथ करडे हा होनसळ येथे घराजवळ पाणी भरत असताना पाणी भरून घरी आल्यानंतर अचानक त्याचा तोल जाऊन तो पडून डोक्यास मार लागल्याने बेशुध्द झाला. त्यामुळे त्यास बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात नातेवाईक राजेंद्र पवार यांनी दाखल केले असता एकनाथ हा उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉ. ध्रुव गायकवाड यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गावडी दारफळ येथे तरूणाचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** - गावडी दारफळ (ता. उत्तर सोलापूर) येथे तरूणाने अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. परशुराम रामकृष्ण कदम (वय ३२, रा. गावडी दारफळ) असे उपचारासाठी दाखल झालेल्याचे नाव आहे. २१ जानेवारी रोजी सायंकाळी स्वत:च्या शेतात अज्ञात कारणावरून परशुराम कदम यांनी कोणतेरी विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे कदम यांस त्रास होऊ लागल्यावर त्यांना पती मंजुशा कदम यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून स्वत:वर ब्लेडने वार करून तरूण जखमी

**सोलापूर** - घरगुती वादातून स्वत:वर ब्लेडने वार करून घेतल्याने तरूण जखमी झाला. खाजण्णा रमेश डेरबेर (वय २३, रा. कुंचीकोरवे नगर, मौलाली चौक, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २१ जानेवारी रोजी रात्री आकराच्या सुमारास घरगुती वादातून राहत्या घरी खाजण्णा डेरबेर याने स्वत:वर ब्लेडने वार केले. त्यामध्ये खाजण्णा याच्या छातीला जबर जखमा झाल्याने त्यास उपचारासाठी वडील रमेश डेरबेर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या व्यवहारातून मारहाणीत दोन तरूण जखमी

**सोलापूर** - राठी पेट्रोल पंपाच्या बोळात पैशाच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत दोन तरूण जखमी झाले. किरण चंद्रकांत गायकवाड (वय ३५, रा. राजू गांधी नगर, मजरेवाडी, सोलापूर) आणि रजाक जैनुद्दीन शेख (वय ३०, रा. नविन विडी घरकुल, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. २१ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास गेंट्याल टॉकीजसमोरील राठी पेट्रोल पंपाच्या बोळात पैशाच कारणावरून किरण व रजाक शेख यांच्यात हाणामारी झाली. या हाणामारीत एकमेकांना मारहाण केल्यामुळे दोघेही जखमी झाल्याने दोघांनाही उपचारासाठी शासयकी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## कोठारी प्रशालेची शैक्षणिक सहल संपन्न

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेची शैक्षणिक सहल जयपूर राजस्थान, लाल किल्ला, आग्रा, मथुरा, वृंदावन, ताजमहाल, अजमेर शरीफ, पुष्कर ब्रह्मदेव मंदिर, अजमेर किल्ला, आदी स्थळांना भेट देऊन संपन्न झाला. विद्यार्थ्यांना या भेटीतून ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक माहिती तसेच परराज्यातील लोकसंस्कृती, वारसा, जनजीवन याची माहिती मिळाली. भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासुवृत्तीला चालना देण्यासाठी ऐतिहासिक व भौगोलिक गोष्टीचे ज्ञान व्हावे या उद्देशाने प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी या सहलीचे आयोजन केले होते. माधुरी जमादार, अमृता माने, स्मिता काळे, रितेश मेहता,सिद्धाराम बिडवे संपदा शिंदे या शिक्षकांनी पुढाकार घेऊन सहल यशस्वी केले. सहल यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत कोठारी, सचिव अजितनाथ उपाध्ये सर्व विश्वस्तानी अभिनंदन केले.




## घरगुती वादातून मुलीचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जानेवारी -**

सोलापूर - घरगुती वादातून औज (ता. दक्षिण सोलापूर) येथील अल्पवयीन मुलीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला.

प्रतिक्षा हुन्नुरसिध्द रेवे (वय १७, रा. औज) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या मुलीचे नाव आहे. २१ जानेवारी रोजी १२ च्या सुमारास राहत्या घरी प्रतिक्षा हिने घरगुती वादातून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्यावर नातेवाईकांनी मंद्रुप येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. पुढील उपचारासाठी २२ जानेवारी रोजी भाऊ अमोगसिध्द रेवे यांनी प्रतिक्षाला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# दुहेरी जलवाहिनीचे काम एका महिन्यात पूर्ण होणार

**महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांचे प्रतिपादन**

**शहराची गरज ओळखूनच केला शहर विकास आराखडा**

**महापालिकेच्या वतीने पत्रकारांचा सन्मान**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ जानेवारी-**

सव्वा दोन वर्षाच्या आयुक्त पदाच्या कार्य काळामध्ये सोलापूर शहरासाठी महत्त्वाचे असलेले पण दुर्लक्षित असलेले अनेक प्रश्न मार्गी लावले. उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम एका महिन्यात पूर्ण होणार आहे. सोलापूर शहराची गरज ओळखूनच शहर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, असे महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांनी सांगितले.

पत्रकार दिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने आयुक्त तेली-उगले यांच्या हस्ते महापालिका बीट पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी तेली-उगले पुढे म्हणाल्या, सव्वा दोन वर्षांपूर्वी महापालिका आयुक्त पदाचा पदभार घेतला. अनेक प्रश्न प्रलंबित होते. जे प्रश्न सर्व शहराचे आहेत मात्र ते दुर्लक्षित आहे असे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले. यामध्ये भरती नियमावली, बिंदू नामावली, ३०२ पदांची भरती प्रक्रिया, पदोन्नती यासह विविध प्रशासकीय कामे प्राधान्याने पूर्ण केली. विशेष म्हणजे विविध टप्प्यांवर रखडलेली उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचा प्रकल्प मार्गी लावला आहे याचे समाधान आहे. ११० किलोमीटरची असलेली ही जलवाहिनी सर्व अधिकाऱ्यांच्या टीमने अथक परिश्रम घेऊन अनेक अडथळे येऊनही हे काम मार्गी लागले आहे. सद्यस्थितीत १०५ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. मागील वर्षी उजनी वजा पातळीमध्ये होती. यामुळे या एका सीझनमध्ये जॅकवेलचे काम पूर्ण केले, असेही त्या म्हणाल्या. प्रास्ताविक उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांनी केले. महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनी आभार मानले. यावेळी कामगार कल्याण जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे यांच्यासह विविध माध्यमांचे पत्रकार, कॅमेरामन उपस्थित होते.

### २०० कोटी रुपयांचे दायित्व दिले

महापालिकेने विविध प्रकारचे देणे द्यायचे होते. यामध्ये स्मार्ट सिटीचा हिस्सा, कर्ज परतफेड आदी पैशांसह एकूण २०० कोटी रुपयांचे दायित्व आतापर्यंत दिले आहे. सर्व सोयी सुविधा देत असताना हे काम करण्यात आले असल्याचेही तेली - उगले यांनी सांगितले.

### विकास आराखड्यात काय लिहिले ते बघावे

सोलापूर शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार करत असताना सोलापूर शहराची गरज ओळखून तो करण्यात आला आहे. प्रारूप आराखडा काय आहे ? हे पाहून हरकत घ्यावी. शहरात जिथे आवश्यक आहे. तिथेच आरक्षण टाकावे लागले आहे. स्टेडियमची जागा कमी केली नाही, त्यासाठी जितकी गरज होती तेवढीच जागा ठेवण्यात आली आहे. तटस्थपणे हा आराखडा केला आहे. त्यामुळे नागरिकांनी आराखड्यात काय लिहिले आहे हे आधी बघावे. त्यांच्या हरकती व सूचनांवर सुनावणी होईल, असेही तेली - उगले यांनी यावेळी स्पष्ट केले.

### कायम व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न

शहर हे हृदय असते. रोजच्या सोयी सुविधा चालू ठेवून सर्व प्रकल्प पूर्ण करावे लागते. त्याप्रमाणे हे प्रकल्प मार्गी लावले आहेत. अनेक कामे पूर्ण केली. पायाभूत सुविधा व्यवस्था चांगली केली. कायम व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचेही यावेळी तेली - उगले यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### प्रा. नितीन तळपाडे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान

**करमाळा, दि.२३ जानेवारी-**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सेवेत असलेले मराठी विभाग प्रमुख व पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. नितीन तळपाडे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रधान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा राजूर (जि. अहिल्यानगर) येथे राज्यस्तरीय आदिवासी साहित्य संमेलनात पार पडला. यावेळी संमेलनाध्यक्ष राकेश वानखेडे, अप्पर राज्यकर आयुक्त वसंत पिचड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख तुकाराम रोंगटे, प्रा. डॉ. सखाराम डाखोरे यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सामाजिक व क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रा. तळपाडे यांचे विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य एल. बी. पाटील यांनी तळपाडे यांचे अभिनंदन केले.

### श्री तोगटवीर क्षत्रिय समाजातर्फे प्रजासत्ताक दिनी आरोग्य निदान शिबीर

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**


श्री तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर अंतर्गत श्री चौडेश्वरी तोगटवीर क्ष. सहकारी रुग्णालय नि. सोलापूर श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम्, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविरी प्रजासत्ताक दिनी रविवारी २६ जानेवारी योजी आरोग्य निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री तोगटवीर क्षत्रिय समाज अंतर्गत व श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम् यांची स्थापना होऊन १५० वर्ष शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, आरोग्य निदान शिबीर सकाळी ९ ते दु. १ पर्यत श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय सह. रुग्णालय नि., श्री चौडेश्वरी देवालय, कन्ना चौक, सोलापूर येथे होणार आहे. या शिबिरात ऑक्सिजन लेवल, रक्तदाब, इसीजी तपासणी, स्त्रीरोग, हृदयरोग, नेत्ररोग, जनरल फिजिशियन, अस्थिरोग, मधुमेह याची तपासणी करण्यात येणार आहे. आरोग्य तपासणीसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.



### वखारिया विद्यालयात स्वातंत्र्यसेनानी बोस, हिंदुहृदयसम्राट ठाकरे यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. २३ जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांची १२८ वी तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची ९९ वी जयंती गुरुवारी उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या उपस्थितीत सहशिक्षक अनिल वैद्य व विलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डी. डी. राऊत व तवले यांनी केले, तर सूत्रसंचालन मकरंद जगदाळे यांनी केले.



### बार्शीत बाळासाहेब ठाकरे, सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. २३ जानेवारी-**

बार्शी शहर शिवसेना व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त शहरातील मध्यवर्ती पांडे चौक येथे मान्यवरांच्या हस्ते स्व. ठाकरे व बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी.माजी नगरसेवक विजयनाना राऊत, डॉ. प्रशांत मांजरे, उमेश काळे, सचिन मांजरे-पाटील, शिवसेना शहर प्रमुख विजय माने, महेश देशमुख, धन्यकुमार पटवा, काका परीट, युवराज ढगे, उमेश रजपूत, दिलीप देशपांडे, दीपक ढगे, प्रशांत कानडे, आनंद ठोकडे, सुनील फल्ले, कुमार मोरे, प्रथमेश पवार,आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजयनाना राऊत यांनी जयंतीनिमित्त भाषण करुन अभिवादन केले.



### उमरड येथे हभप कबीर महाराज यांचे कीर्तन

**करमाळा, दि.२३ जानेवारी-**

उमरड (ता. करमाळा) येथे शहाजी सर्जेराव पाटील यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त सुप्रसिद्ध कीर्तनकार कबीर महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी कबीर महाराज यांनी समाजातील जातीय तेढ कमी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच अनेक संत वचनांचे दाखले दिले. सर्वधर्मसमभाव शिकवणारी वारकरी संप्रदायाची शिकवण समाजाला आवश्यक असल्याचे सांगितले. भारदस्त आवाज, अस्खलित शब्दफेक व समाजभान असलेल्या कबीर महाराजांच्या किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.आपल्या कीर्तनात त्यांनी न सम जणार बाप शब्दातून व्यक्त केला. गायक आणि मृदुंग वादकांच्या चालींनी उपस्थिती लोकांची मने जिंकली.स्वतः इस्लाम धर्मीय असून हिंदू धर्माचा गाढा अभ्यास असणाऱ्या कबीर महाराजांची लोकांनी वाहवा केली.या कीर्तन सेवेत त्यांनी स्वर्गीय शहाजी पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे आयोजन योगेश पाटील, बालाजी पाटील व उमरड भाजनी मंडळाने केले होते.

# बार्शीतील ब्युटी पार्लर, दवाखान्यात आता पुस्तक वाचन

## श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयाची 'वाचू आनंदे' नवी संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जानेवारी-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी व लायन्स क्लब बार्शी रॉयल, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शीतील दहा ब्युटी पार्लरमध्ये वाचू आनंदे...! ही नवीन संकल्पना महिलामध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून वाचनालयाचे पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी ही संकल्पना मांडली.

याला लायन्स क्लब बार्शी रॉयलच्या अध्यक्षा वर्षा संजीव गुंदेचा-खांडवीकर यांच्या पुढाकाराने ही संकल्पना प्रत्यक्षात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी बार्शी येथील दहा ब्युटी पार्लर महिला चालकांना वाचू आनंदे...! या नावाचे फलक देऊन



त्यांना वाचनालयाकडून दरमहा १०० पुस्तके व १५ मासिके महिलाविषयी देण्यात येणार आहेत. ही संकल्पना म्हणजे ज्या महिला ब्युटी पार्लरमध्ये जातात व तेथे त्यांना वाचन करता यावे तासनतास बसून रहाण्यापेक्षा एखादे पुस्तक किंवा मासिके घेऊन तेथे त्यांना वाचन करता यावे व त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाचनालयाने ही संकल्पना मांडली. पुढील संकल्पना बार्शीतील पाच मोठे खाजगी हॉस्पिटल (दवाखाने) येथील ॲडमिट पेशेन्टना किंवा त्यांचेबरोबर असलेले नातेवाईकांना दवाखान्यात टाईम घालवण्यासाठी वाचन करता यावे, या उद्देशाने ब्युटी पार्लरसारखेच त्यांनाही पुस्तके व मासिके देण्याची संकल्पना वाचनालयाचे पदाधिकारी व संचालक मंडळानी मांडली व खाजगी मोठे हॉस्पिटलच्या डॉक्टारांशी बोलून येत्या १५ दिवस ते एक महिन्याच्या आत ही संकल्पना राबवणार असल्याचे सांगितले.

> **वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न**
>
> वाचनालयाचे वाचक सभासद वाढवण्याबरोबर वाचन संस्कृती जोपसण्यासाठी वाचनालय आपल्या दारी या म्हणीप्रमाणे समाजामध्ये वाचनाचे महत्व कळावे, वाचनाने मनुष्य समृध्द व सुखी होतो. यासाठी हे वाचनालय सातत्याने नवनवीन संकल्पना राबवत असते व यालाही लोक चांगला प्रतिसाद देतात. आधुनिक काळात मोबाईलमुळे मनुष्य वाचनापासून व पुस्तकांचा सहवास हरवत चाललेला आहे. वाचनालयाकडे माणूस परत फिरावा, ही या मागची भावना आहे.



## देशाबद्दल अभिमान जागृत करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना

**प्राचार्य संतोष चव्हाण : राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २३ जानेवारी-**

राष्ट्रीय सेवा योजनेत नसानसात रक्तसरणारा विद्यार्थी तयार होत असतो. विद्यार्थी अनुभवाने घडतो समाजापर्यंत विकासगंगा घेऊन जाण्याचे सशक्त माध्यम आहे. जागतिक पातळीवर टिकायचे असेल तर, कौशल्याधिष्ठित शिक्षण घेणे गरजेचे आहे. चांगल्या गोष्टी शिका, वेगळेपण ओळखा. आयुष्य परत येत नाही. प्रत्येक क्षण जगा, देशाबद्दल अभिमान जागृत करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना एक माध्यम आहे. असे समारोपप्रसंगी विचार व्यक्त केले.

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने समृद्ध भारतासाठी युवक या संकल्पनेवर आधारित झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोपाप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य संतोष चव्हाण, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, आलियाबादचे सरपंच सूर्यकांत मोतीराम चव्हाण, ग्रामविकास अधिकारी अविनाश खुंटेगावे, कार्यक्रमाधिकारी डॉ.सूर्यकांत आगलावे डॉ. दयानंद कांबळे, डॉ. फुलचंद दूधभाते, डॉ. सुधाकर सांगळे, डॉ. अमोल पाचपिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अहवाल वाचन डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. सुदर्शन सोमवंशी, फरीद शेख, निखिल चव्हाण यांनी शिबिरातले अनुभव कथन केले. उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांनी विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. चनशेट्टी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून चांगले उत्तम संघटक बना कारण बोलणाऱ्याचे माती विकली जाते न बोलणाऱ्याचे सोने देखील विकले जात नाही पैसा नसला तरी सुर मारा फक्त पदवीसाठी शिकू नका ज्ञान मिळवा ज्ञानाशिवाय व्यक्तिमत्व फुलत नाही सुखाच्या लालसेपेक्षा सा हसाची ओढ पाहिजे. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले व आभार डॉ. दयानंद कांबळे यांनी मानले.

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीत पंढरपूरच्या सीमा लोकरे सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२३ जानेवारी-**

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी नुकताच पार पडला. शपथविधी सोहळ्यास भारताचे परराष्ट्र मंत्री सुब्रमण्यम जय शंकर, उद्योगपती अनिल अंबानी जगभरातील प्रसिद्ध उद्योजक, राजकीय व्यक्तीना निमंत्रित करण्यात आले होते. या शपथविधी सोहळ्यास अमेरिकास्थित भारतीय हिंदू उद्योजक व मूळच्या पंढरपूर तालुक्यातील सुपली येथील सीमा येलमार-लोकरे यांनाही या शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते.



शपथविधी सोहळ्यासाठी सीमा लोकरे या भारतीय स्त्रियांची पारंपरिक वेशभूषा असलेल्या साडीमध्ये उपस्थित होत्या. त्यांची ही पारंपारिक वेशभूषा ही सर्वांच्या आकर्षणाचा विषय ठरली. पंढरपूर तालुक्यातील सुपली येथील प्राध्यापक काशिनाथ येलमार यांचा त्या कन्या आहेत. सीमा यांचा विवाह १९९४ साली आयआयटी मुंबई येथे शिक्षण घेतलेले कॅप्टन शामराव लोकरे यांचे चिरंजीव रमेश लोकरे यांच्यासोबत झाला. १९९४ साली ते अमेरिका येथे वास्तव्यास गेले. तेव्हापासून ते अमेरिका येथे स्वतःची कंपनी स्थापन करून तेथेच ते कार्यरत आहेत. त्यांच्या सायकॉन या कंपनीची जगभरात विविध देशांमध्ये कार्यालये आहेत.या कार्यालयांच्या माध्यमातून मोठ्या स्वरूपात जगभरात कंपनीचे काम चालू आहे.

सीमा लोकरे या अमेरिकास्थित भारतीयांची अमेरिकन फॉर हिंदू या संघटनेच्या माध्यमातून भारतीयांसाठी काम करतात. पंढरपूर येथील आषाढीवारीच्या धर्तीवर अमेरिका येथे १७ दिवस निसर्गवारी नावाने वारीचे नियोजन करतात. सातत्याने अमेरिकेतील भारतीयांना एकत्रित आणून छोटे, मोठया कार्यक्रमांचे त्या नेहमीच आयोजन करतात.भंडीशेगाव (ता. पंढरपूर) या आपल्या मूळगावी त्यांनी सासऱ्यांच्या नावाने कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकादेखील सुरू केली आहे.

## उद्योग उभारून इतरांना रोजगार द्या




**संजीव बिराजदार : खेडगी महाविद्यालयात स्कील इंडिया, प्लेसमेंट सेल कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी-**

महाविद्यालयालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचा उद्योग उभा केल्यास भविष्यात खूप फायदा होतो व इतरांना देखील रोजगार देता येतो. प्रत्येकांनी व्यवसायात सुरुवातीला कमी भांडवल गुंतवणूक करून यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन देवा मशीनरचे संचालक संजीव बिराजदार यांनी केले.

येथील सी. बी. खेडगीज महाविद्यालयात स्कील इंडिया, प्लेसमेंट सेल व करिअर कौन्सिलिंग सेल यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळा आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळी रघुनाथ कापसे उपस्थित होते. बिराजदार पुढे म्हणाले, आयडियापासून ते स्टार्टअपपर्यंतचा प्रवास सांगताना योग्य मार्गदर्शन लाभल्याने नोकरीपेक्षा उद्योगधंदा करण्याची आवड निर्माण झाली. आज वार्षिक उलाढाल चांगला आहे. कोणताही उद्योग यशस्वी होण्यासाठी आपल्याला अथक परिश्रम व निष्ठा ठेवावी लागते असे सांगून उद्योजक होण्यासाठी भांडवल, संपर्क आणि आपल्या उद्योगाचे सादरीकरण, गुंतवणूक्त, याबाबत महत्त्वाची माहिती त्यांनी दिली. प्रगतीशील शेतकरी रघुनाथ कापसे यांनी आपल्या सेंद्रिय शेतीतील प्रवासात आलेले अडचणी व त्यावरील उपाय यावरून बोलताना आरोग्याच्या समस्या अणि ते सोडविण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्त्व अणि लोकांची गरज यावर मार्गदर्शन केले.तसेच आध्यात्मिक दृष्टिकोनातून गो-धनाचे महत्त्वाची भूमिका समजावून सांगितले. यात्प्रसंगी प्रा. लक्ष्मण ढाले, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. आबाराव सुरवसे, प्रा. मुद्देसार गौर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. लता हिंडोळे यांनी केले तर डॉ. भैरप्पा कोणदे यांनी आभार मानले.

> **कौशल्य अवगत करा**
>
> महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच काही कौशल्यावर आधारित कोर्स व कला अवगत करावी असे आवाहन प्राचार्य डॉ. शिवराया अडवितोट यांनी विद्यार्थ्यांना केले.



## भाजपाचे टेंभुर्णीतील भजन आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ जानेवारी-**

टेंभुर्णी शहरातील महामार्गाची निकृष्ट दर्जाची व अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या मागणीसाठी भाजपच्या वतीने मंगळवारी सुरू केलेले भजन आंदोलन मागण्याची पूर्तता करण्याचे लेखी आश्वासन महामार्ग प्राधिकारणचे कनिष्ठ अभियंता मोहसीन शेख यांनी दिल्याने तात्पुरते स्थगित करण्यात आले.

टेंभुर्णी शहरातील जुन्या महामार्गाचे सिमेंट काँक्रिटीकरण काम निकृष्ठ झाले असून ठीक-ठिकाणी खराब रस्ते, पुलाचे अर्धवट राहिलेले धोकादायक कठडे यासह रस्त्याची कामे अपूर्ण असल्याने रस्ता हस्तांतरित करण्यास टेंभुर्णी सरपंच सुरजा बोबडे यांनी तीव्र विरोध केला होता. डिझाईन इस्टिमेटप्रमाणे काम केले गेले नाही तसेच शहरातील रस्ते या महामार्गास योग्य पद्धतीने जोडले गेले नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.तसेच अपघात होत आहेत.यामुळे ग्रामपंचायतच्या वतीने वेळोवेळी निवेदने देऊनही या कामाबाबत रस्ते महामार्ग प्राधिकरण कडून व निर्धावलेल्या ठेकेदाराकडून त्यास कसलाही प्रतिसाद मिळत नव्हता. यामुळेच तीन-चार दिवसांपूर्वी भजन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, सरपंच सुरजा बोबडे यांनी सर्व मागण्या पूर्ण केल्याशिवाय ग्रामपंचायत नो ऑब्जेक्शन देणार नाही अशी ठाम भूमिका घेतली. यावेळी पोनि दीपक पाटील यांनी ही मध्यस्थी केली. माजी उपसभापती विक्रमसिंह शिंदे, शिवाजी पाटील, निवृत्ती तांबवे, लाला मोरे, रामभाऊ शिंदे, राजाराम थोरात, जयवंत पोळ, नागनाथ वाघे, बाळासो ढगे, सचिन होदाडे, गौतम कांबळे, तुकाराम डोके, हरिभाऊ सटाले, सोमनाथ ताबे, राम पवार, पंडित देशमुख, बंकट देशमुख, श्रीकांत लोंढे, नागेश बोबडे, शांतीलाल कुटे, रामदास खराडे, स्वराली बोबडे, रत्नमाला शिंदे, भाजपच्या शहराध्यक्ष अनिता लोंढे, उर्मिला बारबोले, सुवर्णा देशमुख, आशा निमसे, नागेश कल्याणी, दमन सपाटे यांच्यासह महिला, पुरुष शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोरेगाव येथे शनिवारपासून यात्रा महोत्सव

## विविध कार्यक्रमांचे आयोजन; प्रजासत्ताकदिनी होणार झेंडा वंदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जानेवारी-**

सोलापूर विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील जलशुद्धीकरण केंद्र सोरेगाव येथील सर्व धर्मीय श्रध्दास्थान ॐ श्री महादेव लिंग मल्लिनाथ देवस्थान २६ जानेवारी वार्षिक यात्रा महोत्सवानिमित्त २५ जानेवारीपासून विविध धार्मिक, देशभक्ती, सामाजिक कार्यक्रम आयोजित केले आहेत.

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात ॐ श्री महादेवलिंग मल्लिनाथ २६ वा वाढदिवस व २६ जानेवारी वार्षिक यात्रा महोत्सव



साजरा होणार आहे. राष्ट्रीय संत ॐ हवा मल्लिनाथ महाराजांनी संपूर्ण देशभरात शिवभक्तीतून देशभक्त निर्माण करण्यासाठी जय भारतमाता सेवा समितिचे हजारो शाखा स्थापना करून देशभरात देशभक्तीचा बुलंद आवाज निर्माण केले आहेत. याशिवाय देशभरात सहा हजारांहून अधिक शिवलिंगाची स्थापना करून शिवलिंगाची चिरंतर प्रसाद सर्वासमोर चिरंतर ठेवले आहे. यापैकी सोरेगाव येथील श्री महादेवलिंग मल्लिनाथ देवस्थान हे नवसाला पावणारा स्वयंजागृत सर्वधर्मीय श्रद्धास्थान देवस्थान आहे.

सोलापूर, विजापूर, कलबुर्गी, सांगली, पुणे जिल्ह्यातील भाविक भक्त या ठिकाणी गर्दी करतात. यंदा यात्रा कमिटीचे वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे. शनिवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळपासून रात्रभर देशभक्ती गीत, भजन, भारुड आदी कार्यक्रम होणार असून रात्रभर मलकारसिध्द गायन संघ, सोरेगांव आणि अमोगसिध्द गायन संघ सोरेगांव यांचे डोल्लीन पदाचे कार्यक्रम होणार आहे.रविवार दि. २६ जानेवारी रोजी पहाटे श्रीस रूद्राभिषेक व सकाळी ६ वा. राष्ट्रीय झेंडा वंदन कार्यक्रम होणार आहे. सकाळी ८ वाजता. सोलापूरातील भवानी पेठ येथील कै. शिवानंद साखरे यांच्या सिद्धेश्वर निवास येथून विविध वाद्य समवेत पूरवंत, पालखी व कलशचे सोरेगांव येथील महादेवलिंग मल्लिनाथ देवस्थान पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

> **दिवसभर देशभक्तीपर कार्यक्रम**
>
> २६ जानेवारी दिवसभर देश भक्ती गीत गायन भजन कार्यक्रम होणार असून महाप्रसाद वाटप होणार आहे. दुपारी १ ते ४ पर्यंत सुरेश बाणेगांव यांचे हरी भजन व भारुड कार्यक्रम होणार आहे. येथील सोयी सुविधेबाबत ९४२००८९५३५, ९०२२५१६१४३, ९३७३३९४४७९ या मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन यात्रा कमिटी वतीने करण्यात आला आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पालकमंत्र्यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ जानेवारी-**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी पालकमंत्री गोरे यांनी पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाच्या कामांबाबतची माहिती घेतली.

याप्रसंगी आ. समाधान आवताडे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ. प्रशांत परिचारक, माजी आ. राम सातपुते, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



## लोकमंगल फाउंडेशनतर्फे शेळगीत आरोग्य तपासणी

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने शेळगी येथील नागरिकांची रक्त व नेत्र तपासणी करण्यात आली. याचा १३३ जणांनी लाभ घेतला. या शिबिरामध्ये रक्तातील यूरिक सिड, कोलेस्ट्रॉल, एचबीवन सी, थायरॉईड टीएसएच व Creatinine या घटकांची तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूची तपासणीही करण्यात आली. यावेळी लोकमंगल समूहाचे रोहन देशमुख, सचिन जाधव, संतोष माळी, ज्योती जानकर आदी उपस्थित होते. लोकमंगल फाउंडेशन होटगी रोड येथे लोकमंगल अन्नपूर्णा योजनेमध्ये काम करणाऱ्या महिला व नागरिकांचीही रक्त व नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी अपोलो डायग्नोस्टिकचे व्यवस्थापक शंकर शिंगडगावकर व आदित्य आय केअर सेंटरचे डॉ. किरण कीर्तने यांचे सहकार्य लाभले. यासाठी लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे व्यवस्थापक संजय बागल व समन्वयक शामकुमार भंडारे, अमोल जोकारे यांनी परिश्रम घेतले.



## अबॅकस स्पर्धेत बार्शीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**बार्शी, दि. २३ जानेवारी-**

जामखेड येथे ग्लोबल व्हिजन फांउडेशन पुणे संचलित इन्स्पायर अबॅकस अँड वैदिक मॅथ अकॅडमीच्यावतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये ज्ञानदा अँबकस बार्शीच्या प्रणवी सांगळे हिने प्रथम क्रमांक, शौर्य पाटील द्वितीय, अदिराज घोंगडे, श्रीशा गुजर, आरमान शेख, समृध्दी गायकवाड, समर्थ गायकवाड, राजवीर सानप, राजवर्धन जाधवर, श्लोक उकरंडे यांनी यश संपादन केले आणि मास्टर लेव्हलमध्ये आर्यन मोरे, महेश जगताप, मल्हार जगताप यांनी उत्तुंग यश संपादन करुन सर्व अबॅकस लेवर पूर्ण केलेचे सन्मानचिन्ह मिळाले. तसेच अर्चना मोरे यांना स्टार टिचर अवॉर्ड बोराडे, गटशिक्षण अधिकारी पाटोदा यांच्या हस्ते देण्यात आला.



## नातेपुते येथे शिवसेनेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

**नातेपुते, दि. २३ जानेवारी-**

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना शिंदे गट यांच्यावतीने नातेपुते येथील कन्या शाळेत मुलांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख सतीश सपकाळ, नातेपुते शहराध्यक्ष निखिल पलंगे, मुख्याध्यापिका सुनंदा जाधव यांच्या हस्ते हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका बालिका गायकवाड, दिपाली दहिवाळ, मुख्याध्यापक विकास बडवे, अस्मिता उराडे आदींसह शिक्षक तसेच शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

## भंडारकवठे भूषण पुरस्कार जाहीर; प्रजासत्ताक दिनी होणार वितरण

**सोलापूर दि. २३ जानेवारी-**

भंडारकवठे विकास मंच आणि गुरू फॉर लाईफ फॉउंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने देण्यात येणाऱ्या भंडाकवठे भूषण पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून येत्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल अशी माहिती पुरस्कार समितीचे संयोजक निंगराज विंचुरे यांनी दिली. पुरस्काराचे यंदा तिसरे वर्ष असून यावेळी ज्येष्ठ पत्रकार पुरूषोत्तम कुलकर्णी, कला शिक्षक मधुकर बिराजदार, आदर्श शिक्षक शांतप्पा कांबळे, महानंदा कारभारी, कविता बिराजदार, गंगाधर कोरे, लक्ष्मण कुंभार, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी धोंडप्पा कमळे, प्रयोगशील शेतकरी नबी बारूदवाले, उद्योगपती बलभीम बिराजदार, शिवशंकर वठारे यांची निवड करण्यात आली आहे. मानचिन्ह, शाल, श्रीफळ, मानाचा फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २६ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता भंडारकवठे येथील श्री शिवयोगी महासिद्ध मंगल कार्यालयात आयोजित एका विशेष समारंभात जेष्ठ साहित्यीक डॉ. अप्पासाहेब पुजारी यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. अध्यक्षस्थानी भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर असतील. माजी प्राचार्य रामचंद्र कुलकर्णी, राज्य उत्पादन शुल्क विभागातील सेवानिवृत्त अधीक्षक भीमाशंकर बिराजदार, उद्योगपती श्रीशैल बहिरगोंडे, निंगराज विंचुरे, प्रशांत जोशी यांनी या पुरस्काराची संकल्पना पुढे आणली आहे.

# यापुढे बेकायदेशीर काम होणार नाही

## पालकमंत्री जयकुमार गोरे : मुख्यमंत्र्यांसह सर्वसामान्य जनतेला अपेक्षित कामे होणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ जानेवारी-**

सोलापूर जिल्ह्यामध्ये कुठलेही बेकायदेशीर काम इथून पुढे चालू दिले जाणार नाही. त्यासाठी जे काही करायला लागेल ते आपण निश्चित करु. जिल्ह्यामध्ये कायदा, सुव्यवस्था राखली जाईल. मुख्यमंत्री फडणवीसांच्या नेतृत्वाखाली काम करीत असताना त्यांना अपेक्षित असणारे काम आणि राज्यातील सर्वसामान्य जनतेला अपेक्षित असणारे काम इथून पुढे सोलापूर जिल्ह्यामध्ये होईल, अशी हमी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

गुरुवारी विठ्ठल दर्शनासाठी आले होते, त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ. राम सातपुते, माजी आ. प्रशांत परिचारक, चेतनसिंह केदार आदींसह भाजपाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

पंढरीनगरीमध्ये येऊन विठुरायाच्या दर्शनाने आपण धन्य झालो. राज्यातील जनतेची सेवा करण्याची ताकद याबरोबरच जे माझ्या शेतकरी, युवकांना अपेक्षित आहे ते संपूर्ण राज्यातील नागरिकांसाठी करण्याची शक्ती विठुरायाने द्यावी असे साकडे आपण विठ्ठलाच्या चरणी घातलेले आहे, असे गोरे यांनी सांगितले. पंढरपूर दौऱ्यावर येत असताना आपल्या स्वागताचे सर्वत्र बॅनर्स झळकले आहेत. यामध्ये वाळूमाफियांनी देखील काही बॅनर्स लावल्याचे पत्रकारांनी पालकमंत्र्यांना सांगितल्यावर या संदर्भात बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, मी येथे येत असताना अनेकांनी बॅनर्स लावून माझे जोरदार स्वागत केलेले आहे.

त्यामुळे कुणी, कुणी बॅनर लावलेले आहेत याचा आढावा मी काही घेतलेला नाही. मात्र या निमित्ताने एवढेच सांगतो की जनतेने मात्र माझे मनापासून स्वागत केलेले आहे याचा मला मनापासून अभिमान आहे.

मी खात्रीने सांगतो की, या जिल्ह्यामध्ये कुठल्याही माफियाचे राज्य चालू देणार नाही. कुठल्याही अधिकाऱ्याला त्रास होणार नाही, कुठल्याही जनतेला त्रास होणार नाही. त्यामुळे माफिया राज्य संपून जाईल आपण अजिबात चिंता करु नका असेदेखील पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.



### ३० तारखेला नियोजन बैठक

मंदिर समितीच्या अध्यक्षपदाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पालकमंत्री म्हणाले तो विषय माझ्या अखत्यारितला नाही. त्यामुळे या विषयासंदर्भात योग्य व्यक्ती निर्णय घेतील. याबरोबरच जिल्ह्यातील प्रश्न असतील किंवा पंढरपूर तीर्थक्षेत्रासंदर्भातील काही प्रश्न असतील त्या सगळ्या प्रश्नासंदर्भात आपण तातडीची बैठक देखील घेतो आहे. जिल्हाधिकाऱ्यांसोबत आढावा घेत असताना येत्या ३० तारखेला बैठकीचे नियोजन देखील केल्याची माहिती मंत्री गोरे यांनी दिली.

### पंढरपूर विकास आराखड्याबाबत मोठं विधान

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं पंढरपूरच्या विकासाचे खूप मोठं स्वप्न आहे. पंढरपूरच्या विकासाचा आराखडा बऱ्यापैकी अंतिम टप्प्यात आहे. मुख्यमंत्री पंढरपूरच्या विकासाबाबतचा जो निर्णय घेतील त्यामुळे या विठुरायाच्या पंढरीनगरीचा कायापालट होईल. या भागाचा विकास होईल. लाखो, कोट्यावधी भाविक या नगरीमध्ये येत असतात. या सगळ्या भाविकांची चांगल्या प्रकारे सोय व्हावी येथील वास्तव्यात त्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, आलेल्या भाविकांचे स्वागत चांगल्या प्रकारे व्हावं. शहरामध्ये तेवढ्या ताकदीची स्वच्छता रहावी अशा पद्धतीचे नियोजन मुख्यमंत्री फडणवीसांकडून केले जात आहे. येणाऱ्या काही दिवसांमध्ये मुख्यमंत्री याबाबत सुतोवाच करतील. विकास आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे याबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील, आमचे सरकार निर्णय घेईल. आपल्या सगळ्यांना अभिमान वाटेल अशा पद्धतीने विठुरायाच्या नगरीचे बदललं स्वरुप आपणाला लवकरच बघावयास मिळेल असा विश्वासदेखील पंढरपूर कॉरिडोर संदर्भात ते म्हणाले.



## सहकार महर्षी गणपतराव साठे विद्यालयाची वडाचीवाडी ऑक्सिजन पार्कला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २३ जानेवारी-**

सहकार महर्षी गणपतराव साठे विद्यालयाची बबनदादा शिंदे ऑक्सिजन पार्क वडाचीवाडी येथे क्षेत्रभेट व या ऑक्सिजन पार्कमध्ये वनभोजनाचा मनस्वी आनंद घेतला.

या क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींची माहिती जाणून घेतली. वडाचीवाडी (अ. ऊ) चे सरपंच रमेश भोईटे, पाणी फाउंडेशनचे प्रणेते मार्तंड जगताप यांनी या ऑक्सिजन पार्कमधील मीयावकी जंगल व यातील तब्बल ५४ प्रकारच्या औषधी वनस्पतीची माहिती दिली. वडाचीवाडी येथील आदर्श जिल्हा परिषद शाळेला विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भेट दिली. या शाळेने तालुका स्तरावर परसबाग यामध्ये प्रथम क्रमांक मिळवलेला असून या परसबागेची माहिती शाळेचे मुख्याध्यापक क्षीरसागर व भोईटे यांच्याकडून विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी जाणून घेतली. शाळांनी राबवलेल्या नवोपक्रमची माहिती शिक्षकांनी दिली व शाळेच्या प्रगतीत शिक्षकांचा, गावातील पालकांचा बहुमोल वाटा या ठिकाणी दिसून आला. सरपंच रमेश भोईटे, मुख्याध्यापक क्षीरसागर, भोईटे यांच्या हस्ते मुख्याध्यापक शैलेंद्र कांबळे यांच्यासह शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा केवड भेट दिली. शाळेचे व्यवस्थापक कालिदास चव्हाण व प्रकाश जाधव यांनी माहिती दिली. मुख्याध्यापक शैलेंद्र कांबळे व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.



### पालकमंत्र्यांनी घेतले शिखर शिंगणापूरच्या महादेवाचे दर्शन

सोलापूरच्या पालकमंत्रीपदाची धुरा हाती घेतल्यानंतर जिल्हा दौऱ्यावर येताना असताना शिंगणापूर येथे सहकुटुंब शंभू महादेवाचा अभिषेक करून देवदर्शन घेतले. गावामध्ये आगमन झाल्यानंतर गावकऱ्यांनी अत्यंत उत्साहाने स्वागत करून गावातील भगिनींनी औक्षण केले. शिंगणापूर ग्रामस्थांच्या वतीने पेढ्याची तुला करण्यात आली. शंभू महादेवाच्या कृपेने इथवर पोहोचलो आहे. इथून पुढं देखील जनतेसाठी चांगले कार्य करण्याची ऊर्जा दे, अशी प्रार्थना त्यांनी केली. यावेळी माजी आ. राम सातपुते, भारतीय जनता पार्टी, महायुतीचे पदाधिकारी, मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## माळशिरस येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २३ जानेवारी-**

जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी जयकुमार गोरे यांची निवड झाल्यानंतर माळशिरस तालुक्यात पहिल्यांदाच त्यांचे आगमन झाल्याने डॉ. आप्पासाहेब देशमुख व माळशिरस नगरपंचायतीच्या वतीने नगराध्यक्ष विजय देशमुख यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

सोलापूर येथे जाताना त्यांनी माळशिरस येथे भेट दिली. माळशिरस येथील अहिल्यादेवी चौकात माजी नगराध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख व नगराध्यक्ष विजय देशमुख यांनी स्वागत करण्यात आले. वीस फुटी पुष्पहार क्रेनच्या सहाय्याने घालण्यात आला. दोन जेसीबीच्या सहाय्याने फुलाची पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी फटाक्याची मोठी आतषबाजी करण्यात आली. हलगीच्या निनादाने संपूर्ण परिसर दनादून व दुमदुमून गेला होता. यावेळी माजी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, माजी आ. रामभाऊ सातपुते, डॉ. आप्पासाहेब देशमुख, नगराध्यक्ष विजय देशमुख, माजी नगराध्यक्ष शिवाजीराव देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, रावसाहेब देशमुख, नगरसेवक आबासाहेब धाईंजे, दादासाहेब शिंदे, वैभव जानकर, धनाजी देवकर, महादेव माने, अनिरुद्ध शिंगाडे, बबन देवकते, रणजीत ओहोळ, प्रीतम देवकाते, पिलीवचे सरपंच मोहिते, ॲड. सत्यजित गलांडे, नगराध्यक्ष अशोक चव्हाण, गट नेते राहुल रेडे-पाटील, सुरेश शेंडगे, गणेश पाटील उपस्थित होते.







## नातेपुते येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत

**नातेपुत, दि. २३ जानेवारी-**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे नातेपुते येथे भारतीय जनता पक्ष व नातेपुते ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. येथील शिंगणापूर पाटी तसेच दहिगाव रोडवरील अण्णाभाऊ साठे चौकात गर्दी जमली होती. पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते यांचे आगमन होताच भाजपा, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, आरपीआय आठवले गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते नातेपुते नगरपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने फटाक्याच्या आतिशबाजित, हलगीच्या कडकडाटात जेसीबीच्या सहाय्याने हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर ते माजी आ. सातपुते यांच्या मांडवे येथील श्रीराम निवासस्थानी रवाना झाले.

# २२ गावांचा पाणी प्रश्न दोन वर्षात मार्गी लागणार

### पालकमंत्री जयकुमार गोरे : माळशिरस तालुक्यात आगमन अन् स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २३ जानेवारी-**

शेतकऱ्यांच्या समस्या काय आहेत याची मला जाण आहे व त्या समस्या सोडविण्यासाठी पंढरपूरच्या विठुरायाचे आशीर्वाद घेण्यासाठी मी आज सोलापूर जिल्ह्यात आलो आहे. माळशिरस तालुक्यातील पाणी प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. तो येत्या दोन वर्षात भारतीय जनता पार्टीचे सरकार सोडवेल, अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली

मांडवे येथे माजी आ. राम सातपुते यांच्या निवासस्थानी पालकमंत्री गोरे हे गुरुवारी स्नेहभोजनासाठी आले असता ते बोलत होते. यावेळी माजी आ. राम सातपुते, माजी खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर, चेतनसिंह केदार, अप्पासाहेब देशमुख, शरद मोरे, सुजयसिंह माने-पाटील, बाजीराव काटकर, बी. वाय. राऊत, विजय देशमुख, ॲड. शरद मदने, शशिकांत चव्हाण, माऊली हळणवार, राहुल पद्मन, महादेव केसकर, संजय देशमुख, भैय्या चांगण आदी उपस्थित होते

गोरे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान मी माळशिरस तालुक्यातील गावोगावी भेटलो असता मला शेतीच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही सुटलेला दिसून आला नाही. त्यावेळी मी आमदार असतानाही लोकांनी मला भाऊ तुम्ही हा पाण्याचा प्रश्न सोडवू शकता अशी आग्रही मागणी केली होती. माण व खटाव तालुक्यातील पाण्याचा प्रश्न तुम्ही सोडवला, त्याचं पद्धतीने माळशिरस तालुक्यातील पाण्याचा प्रश्नदेखील आपणच सोडवा, अशी आग्रही मागणी माझ्याकडे येऊ लागली. त्यावेळी मला जाणीव झाली की पिढ्यान्‌पिढ्या या भागाचे ज्यांनी नेतृत्व केलं त्या लोकांनी हा प्रश्न का सोडविला नाही. याच्या वेदना मला झाल्या, अशी भावना व्यक्त केली.



### ठिकठिकाणी स्वागत

पालकमंत्री झाल्यानंतर जयकुमार गोरे हे प्रथमच माळशिरस तालुक्यात आले. यामुळे माळशिरस तालुक्याच्या सीमेवर त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. धर्मपुरी, नातेपुते, सदाशिवनगर, माळशिरस, वेळापूर आदी ठिकाणी जयकुमार गोरे यांचे फटाक्यांची आतिषबाजी करीत भाजपा व माजी आ. राम सातपुते समर्थकांकडून जंगी स्वागत करण्यात आले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पार्वती कन्या प्रशालेची शैक्षणिक सहल संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील पार्वती कन्या प्रशालेची शाळेची शैक्षणिक सहल दि.१९ ते दि.२२ जानेवारी या कालावधीत महाराष्ट्राच्या विविध भागात विद्यार्थ्यांची ऐतिहासिक, धार्मिक, प्रेक्षणीय स्थळाची पाहणी भेट घडवून आणण्यात आली.

महाबळेश्वर, त्रिवेणी संगम, प्रतापगड, किल्ले रायगड, चवदार तळे (महाड), अष्टविनायक पाली (बल्लाळेश्वर), उरण येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील गरम पाण्याचा कुंड, भारताचे प्रवेशद्वार (गेटवे ऑफ इंडिया), हॉटेल ताज (नवीन व जुने) गिरगाव चौपाटी, नरिमन पॉईंट, महालक्ष्मी मंदिर, हाजीअली दर्गा, नेहरू म्युझियम, नेहरू तारांगण, जुहू चौपाटी, अष्टविनायक वरदविनायक (महड), एकविरा देवी, घोसी डॅम, लोणावळा, खंडाळा, जगद्गुरु संत तुकाराम महाराज( देहू) या पर्यटन स्थळांना विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

सहलीच्या मार्गदर्शिका मुख्याध्यापिका लता सोमवंशी-कदम, सहलप्रमुख पंडित कदम, सहाय्यक मडोळे बसवराज आणि अभिमन्यू कदम यांनी सहल काळात विद्यार्थ्यांची काळजी घेतली.



# नळदुर्ग शहरातील नवीन पाणी पुरवठा योजनेचे काम बंद

### मुदतीच्या आत पूर्ण करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२३ जानेवारी -**

नळदुर्ग शहर नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या कांही दिवसांपासुन बंद पडले आहे. संबंधित ठेकेदाराने हे काम बंद का ठेवले आहे? याची चौकशी करुन संबंधित ठेकेदाराला हे काम मुदतीच्या आत पुर्ण करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्ग शहरवासियांना आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. नळदुर्ग शहराच्या जवळ असणाऱ्या बोरी धरणात मुबलक पाणी असतानाही केवळ नगरपालिकेची जुनी पाणीपुरवठा यंत्रणा शहरास पाणीपुरवठा करण्यास अपुरी पडत असल्यामुळे शहरात आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे त्यामुळे धरण उशाला, आणि कोरड घशालाअशी अवस्था गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्गकरांची झाली आहे. उन्हाळ्यात तर नळदुर्गकरांचे पाण्यावाचुन प्रचंड हाल होते. नळदुर्गकरांचा पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालल्याचे पाहुन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासनदरबारी प्रयत्न करून तब्बल ४८ कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजुर करून आणली. या पाणीपुरवठा योजनेचे काम पुर्ण झाल्यानंतर नळदुर्गकरांना नळाद्वारे दररोज पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे नळदुर्गकरांसाठी ही नवीन पाणीपुरवठा योजना अतिशय महत्वाची आहे. आ. पाटील यांचे शासनदरबारी झालेले प्रयत्न आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी अतिशय परीपुर्ण असा पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव




तयार केल्याने शासनाकडुन ही पाणीपुरवठा योजना मंजुर झाली आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम मंजुर झाल्यानंतर नळदुर्गकरांनी आनंदोत्सव साजरा करुन आ. पाटील यांचे आभार मानले होते. या योजनेचे काम मंजुर झाल्यानंतर याची टेंडर प्रक्रिया पुर्ण होऊन हे काम कृष्णाई इन्फ्रास्ट्रॅक्चर या कंपनीला हे काम देण्यात आले आहे. मागील कांही महिण्यापुर्वी सदरील कंपनीने या पाणीपुरवठा योजनेच्या कामास सुरुवात केली होती. काम अतिशय वेगात सुरु झाले होते. नळदुर्ग शहराच्या वरच्या भागात नवीन जलवाहिनी टाकण्याचे कामही सदरील कंपनीने केले आहे. शहरातील विविध भागात पाणीपुरवठा करण्यासाठी जलकुंभ बांधण्याचे कामही सुरु झाले होते. या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शहरात विविध ठिकाणी एकुन सात जलकुंभ बांधण्यात येणार आहेत. त्याचबरोबर नवीन जलशुद्धीकरण केंद्रही बांधन्यात येणार आहे. सुरुवातीला सुरु झालेल्या कामाचा वेग पाहता जुन २०२५ पर्यंत हे काम बऱ्यापैकी पुर्ण होईल अशी अपेक्षा होती मात्र सध्या हे काम बंद असल्यामुळे हे काम आता कधी पुर्ण होणार याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

नळदुर्गकरांसाठी या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम अतिशय महत्वाचे आहे त्यामुळे वेळेत हे काम पुर्ण होणे गरजेचे आहे. बोरी धरणात मुबलक पाणी असुनही नळदुर्गकरांनी पाण्यासाठी वनवास भोगला आहे. नळदुर्गकरांचा हा पाण्याचा वनवास दुर होण्यासाठी संबंधित कंपनीने पाणीपुरवठा योजनेचे काम लवकर पुर्ण करणे गरजेचे आहे. आ. पाटील, नगरपालिका प्रशासन तसेच संबंधित विभागाने बंद पडलेले पाणीपुरवठा योजनेचे काम तात्काळ सुरु करण्याचे आदेश संबंधित कंपनीला द्यावेत अशी मागणी होत आहे.



**धाराशिव :** प्राथमिक आरोग्य केंद्र ढोकी (ता. धाराशिव) येथे ३० खाटचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करून आणल्याबद्दल ढोकी गावाचे सुपुत्र महाराष्ट्र कुणबी समाज स्थापक अध्यक्ष ॲड. तुकाराम शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिलीप घुटे, बबन देशमुख, लहू शिंदे, गजानन समुद्रे, बन्नी थोडसरे, सुनील समुद्रे, गणेश उगले, कृष्णा इंगळे, सागर काळे, महेश देशमुख, रामेश्वर पवार, भाऊसाहेब गरड, सागर घाडगे, सोहम खोत, सहदेव शिंदे आदि उपस्थित होते.

## आजोळ असेलेल्या चोराखळी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा पुतळा उभारण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२३ जानेवारी -**

कळंब तालुक्यातील चोराखळी हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आजोळ असून येथील पापनाश मंदीर, परिसराचा विकास होण्यासाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष देशभरात साजरे केले जात असुन त्यांचे चोराखळी हे आजोळ आणि जन्मगाव असून इथे अहिल्यादेवींनी बांधलेले महादेवाचे पापनाश हे दगडी बांधकाम केलेले हेमाडपंथी, पुरातन मंदिर असून याला महाराष्ट्र शासनाचा 'क' दर्जा प्राप्त आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी स्वतःच्या खाजगी खर्चातून केलेल्या बांधकामात जवळपास २५०० चौ.फुट मुख्य मंदिर, सभामंडप, पाण्याचा दगडी तलावमधील जुने मंदिर हे जिर्ण झालेले असुन त्याच्या देखभालीची,दुरुस्तीची आवश्यकता आहे. शिवाय अहिल्यादेवींच्या आई सुशीलादेवी शिंदे यांची समाधी देखील जिर्ण स्वरूपात आहे. चोराखळी येथील श्री क्षेत्र पापनाश देवस्थानस्थळी अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा तसेच विविध पर्यटन विकासकामे, शोभा वाढविण्यासाठी स्मरणवस्तु, संग्रहालय, अहिल्यादेवींचा जिवनपरिचय दृष्य, देखावा अशी विकासकामे चौंडी या त्यांच्या गावाच्या धर्तीवर होणे आवश्यक आहे, असे निवेदनात म्हंटले आहे.

निवेदनावर सरपंच सिमा अक्रुर सोनटक्के, पापनाश मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिगांबर साहेबराव मैंदाड, सुभाष अशोक मैंदाड, अमोल जगन्नाथ मैंदाड, रविंद्र मैंदाड, लिंबराज डुकरे, ॲड. बबीता मैंदाड, ॲड. तेरकर आदींसह निवेदनावर शंभराच्यावर ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अमली पदार्थाची तस्करी करणारी टोळी जाळ्यात

**लाखो रुपयाचा गांजा जप्त... स्थानिक गुन्हे शाखा व वाशी पोलीस ठाण्याची संयुक्त कारवाई**



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ जानेवारी -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला धाराशिव अहमदनगर व बीड जिल्ह्यातील काही इसमांची एक टोळी गांजाची विक्री मध्ये कार्यरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने १६ लाख २९ हजार ७६० रूपयांचा हिरव्या रंगाचा गांजा जप्त करून दोन आरोपींना ताब्यात घेतले. तर चार आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले.

याबाबत माहिती अशी की, दि.२२ जानेवारी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. कासार व पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत खबर मिळाली की सदरची टोळी ही वाशी पोलीस ठाणे अंतर्गत मांडवा शिवार येथे राखाडी रंगाची स्विफ्ट डिझायर मोटरकार मधून गांजा विक्री करता येणार आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ सदर ठिकाणी सापळा रचून छापा टाकला असता संशयित मोटर कारमध्ये चार प्लास्टिकचे गोण्यामध्ये उग्र वास असणारा गांजा मिळून आला. तसेच सदर ठिकाणी उपस्थित असलेल्या सहा व्यक्ती पैकी दोन जणाला तात्काळ ताब्यात घेण्यात आले तर इतर चार व्यक्ती अंधाराचा फायदा घेऊन पळून गेल्या.

घटनास्थळावरून ८१.४८८ किलो हिरव्या रंगाचा उग्र वास येत असलेला गांजा एकूण १६ लाख २९ हजार ७६० हजार रूपयांचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले चार चाकी वाहन, तीन मोटरसायकल एकूण ११,००००० असा एकूण २७ लाख २९ हजार ७६ रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी प्रसाद उर्फ विकी भागवत पवार (वय २२, रा. साळेगाव ता. केज, जि. बीड), गंगाराम उर्फ शेषराव रावसाहेब पवार (वय ३६, रा. सदाफुले वस्ती जामखेड, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले. पोस्ट वाशीचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संग्राम थोरात व पथक यांच्या मदतीने पंचनामा करून मिळून आलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला. सपोनि. कासार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एकूण सहा व्यक्तींविरुध्द एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून इतर चार फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. सुदर्शन कासार, सपोफौ. वलीउल्ला काझी, पोलीस हवालदार शौकत पठाण, फहरान पठाण, पोलीस अंमलदार योगेश कोळी, चालक पोलीस अंमलदार रत्नदीप डोंगरे, नितीन भोसले तसेच पोलीस ठाणे वाशीचे पोलीस निरीक्षक थोरात सपोनि. सावंत व पथक यांच्या पथकाने केली आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस कल्याण स्वामीची प्रतिमा व दासबोध ग्रंथाची प्रत भेट

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ जानेवारी -**

महाराष्ट्र शासनाने परंडा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव कल्याणस्वामी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था परंडा असे केल्याबद्दल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यक्रम घेऊन कल्याण स्वामींची प्रतिमा व दासबोध ग्रंथाची प्रत भेट देण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेना स्थानिक महापुरुषांची नावे देऊन त्या महापुरुषांचा एकप्रकारे गौरवच केलेला आहे त्याच हेतूने त्यांनी समर्थ रामदास स्वामींचे शिष्य व ज्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या परंडा नगरीतील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस कल्याणस्वामी महाराज हे नाव देऊन महाराष्ट्र सरकारने एक प्रकारे गौरवच केला आहे.

त्या संदर्भात कल्याण स्वामी मठ डोमगाव येथील मठपती डॉ. संजयकुमार जहागीरदार, परंडा येथील मठपती पुरुषोत्तम वैद्य यांचे चिरंजीव नागेश वैद्य, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विकासराव कुलकर्णी, लक्ष्मण गोरे, सारंग खंडागळे, विशाल काशिद व शहाजी चौधरी यांनी औद्योगिक प्रशिक्षण येथे जाऊन एक छोटेखाणी कार्यक्रम घेतला व प्राचार्य कदम सरांना कल्याणस्वामींची प्रतिमा व दासबोध ग्रंथ भेट दिला.

या कार्यक्रमास औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील येथील सर्व स्टाफ व प्राशिक्षनार्थी उपस्थित होते. प्राचार्य कदम यांनी प्रास्ताविक केले व फाळके यांनी आभार प्रदर्शन केले.

# सायबर क्राईमचे धोके ओळखणे काळाची गरज : सोनाली मुळे



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ जानेवारी -**

येथील तुळजाभवानी महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजीटल लिटरसी हे विशेष श्रम संस्कार शिबिर तालुक्यातील कामठा येथे सुरू असुन शिबिराच्या ब्रिद वाक्यावर आधारित व्याख्यानात अष्टभूजा कॉम्प्युस्किल्सच्या संचालिका प्रा. सोनाली मुळे यांनी सायबर क्राईमचे धोके ओळखणे सध्या काळाची गरज झाली असून नागरिकांनी होणाऱ्या फसवणुकीपासून सावधानता बाळगणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले

पुढे त्या म्हणाल्या की,आज सर्वांना मोबाईल, कॉम्प्युटर, इंटरनेट जरी येत असले तरी,याचा अर्थ असा होत नाही की, आपणांस त्याबद्दल पूर्ण माहिती आहे, डिजीटल साक्षरता ही नविन संकल्पना आहे, याचा अर्थ ऑनलाईन अभ्यास, किंवा इतर माहिती घेत असताना तितकीच सतर्कता बाळगणे देखील आवश्यक आहे. ज्या प्रमाणे आपण पाहिजे ती माहिती किंवा करमणूक म्हणून जरी सोशल नेटवर्किंग करत असलो तरी एक तिसरा व्यक्ती आपल्याला पहात असतो. त्याला हॅकर म्हणतात, हे लोक अगदी सहजपणे कोणाचीही माहिती वेगवेगळ्या अकाउंट वरुन काढून त्याचा दुरुपयोग करु शकतात. प्रत्येक सॉफ्टवेअर हे एक डिजिट प्रमाणे असते त्याचे वेगवेगळे कोड असतात, सामान्य लोकांना याबाबत माहिती नसते. हा डिजीटल साक्षरतेचा भाग आहे, ज्याचे प्रशिक्षण घेण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. सदर प्रसंगी डॉ. आनंद मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. मंत्री आडे यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.बी. जे कुकडे यांनी मानले. अध्यक्षीय समापन डॉ. बापूराव पवार यांनी केले. कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. जीवन पवार यांच्या मार्गदर्शनानुसार संपन्न झाला.

## बोस व ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील मंगरूळ या गावात ज्येष्ठ क्रांतिकारक सुभाष चंद्र बोस व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंतीनिमित्त जिल्हा परिषद येथे २३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली.

यावेळेस खरेदी-विक्री संघाचे चेअरमन सुनील जाधव यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धिरज पाटील, शिवसेना जिल्हाउपप्रमुख श्याम पवार, अमोल कुतवळ, शहरप्रमुख सुधीर कदम यांच्या हस्ते करण्यात आले प्रस्ताविक मनोज डोंगरे यांनी केले तसेच सर्व नेत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळेस मुख्याध्यापक राठोड, उंबरकर, डोलारे, शिंदे, विजय डोंगरे, श्याम पाटील, गोविंद डोंगरे, सौदागर जाधव, मनोज डोंगरे, आण्णा लबडे, नशीब शेख, अनंत उपासे, सचिन वाले, किरण पारधे उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



## पालकमंत्री सरनाईक यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२३ जानेवारी**

धाराशिव जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील व भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांनी केला. याप्रसंगी पालकमंत्र्यांसोबत अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी सरवदे, सरपंच अनिल बिराजदार यांची उपस्थिती होती.



## नुतन चेअरमन पवार यांचा सत्कार

**कसबे तडवळे, दि.२३ जानेवारी**


धाराशिव तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे नूतन चेअरमन केशवराव पवार यांचा निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुगाव, रूई ढोकी, कोंबडवाडी येथे सत्कार करण्यात आला. कसबे तडवळे येथे शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक केशवराव पवार यांची २२ जानेवारी रोजी या पतसंस्थेच्या चेअरमनपदी निवड झाली. या निवडीबद्दल त्यांचा बंडू करंजकर, विशाल जमाले, धनाजी होगले, सदस्य हारूण शेख, अरूण पाटील, भारत लोंढे, विकास उबाळे, दीपक होगले, राहुल नाईकनवरे, मंगेश पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## लोहारा येथे तालुकास्तरीय जनसुनावणी

**लोहारा, दि.२३ जानेवारी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणची तालुका स्तरीय जणसुनावणी लोहारा येथील पंचायत समिती सभागृहात संपन्न झाली. दि.२३ डिसेंबर २०२४ ते २३ डिसेंबर २०२५ या कालावधीत सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबवण्यात आली. तर उपस्थित मुद्यावर आधारित जणसुनावणी घेण्यात आली. यावेळी जिल्हा तक्रार निवारण प्राधिकारी म्हणून कुंडलिक गवते तर सामाजिक संस्था प्रतिनिधी म्हणून शिल्पा वलदोडे, मजूर प्रतिनिधी मोहन भिसे, अब्बास शेख, सुमित झिंगाडे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण सोसायटी मुंबई चे जिल्हा साधन व्यक्ती सुशील थोरात यांनी मुद्याचे वाचन केले तर जणसुनावणीत एकूण १३४ मुद्दे उपस्थित करण्यात आले. याप्रसंगी अनेक प्रकरण निकाली काढण्यात आले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी वाग्गे, नायब तहसीदार नानासाहेब मोरे, थोरात श्रीकांत, राठोड, सर्व ग्रा.पं. अधिकारी, ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.




## रस्ता सुरक्षा सप्ताह अभियांतर्गत स्पर्धा

**येरमाळा, दि.२३ जानेवारी**

विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय येरमाळा यांच्या वतीने येरमाळा येथील विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय येरमाळा येथे निबंध, वक्तृत्व, रांगोळी, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि.१ जानेवारी ते ३१ जानेवारी अंतर्गत रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान धाराशिव जिल्यात विविध ठिकाणी कार्यक्रम घेऊन सुरू आहे. स्पर्धेत रस्ता सुरक्षा या विषयी च्या विषयवार वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत जवळपास २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला सचिन पाटील, आरटीओ इन्स्पेक्टर पौळ, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सागर काशीद, स्वाती पाटील, प्रियंका काकडे, उषा दिडवळ, प्रशांत लोंढे उपस्थित होते.

## हळदी-कुंकू लकी ड्रॉ समारंभास प्रतिसाद

**तुळजापूर, दि.२३ जानेवारी**

येथील सरोजा अमृतराव व अमृतराव परिवारातर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम व लकी ड्रॉ समारंभ दि.२२ जानेवारी रोजी घेण्यात आला. कार्यक्रमास अर्चना राणाजगजितसिंह पाटील व अर्चना गंगणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी शहरातील संपूर्ण वेताळ नगर, काळभैरव कडा, आराधवाडी, खडकाळ गल्ली भागातील हजारो महिलांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. आयोजकांच्या वतीने लकी ड्रॉ स्पर्धा तीन टप्प्यांमध्ये घेण्यात आली होती त्यामुळे प्रथम द्वितीय आणि तृतीय विजेते हे तीन-तीन होते. विजेत्यांना पैठणी नथ आणि करंडा या बक्षिसांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

## थोडक्यात



### १००८ श्री स्वामी चरित्र सारामृत सामुहिक पाठाची सेवा अक्कलकोट येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ जानेवारी**

चनई येथील श्री गुरु पादुका मठाच्या वतीने अक्कलकोट येथे सामुहिक श्री स्वामी चरित्र सारामृत १००८ पाठाची सेवा दि.१८ व १९ जानेवारी रोजी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ विश्रामधाम वळसंग येथे पार पडली.या सामुहिक सेवेसाठअंबाजोगाई, चनई, धानोरा, मोटेगांव, करमाळा, केज, होळ, बार्शी, कळंब, अकलूज, माळशिरस, सावदा, सोलापूर, बनसारोळा, या ठिकाणाहुन ६५० सेवेकरी आले होते.या ठिकाणी १०५८ पाठ पूर्ण झाले.रविवारी स्वामी चरित्र सारामृताचा याग संपन्न झाला. महाप्रसादाने यांची पारायणाची सांगता करण्यात आली.

या सेवेच्या यशस्वीतेसाठी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाशीर्वादाने परमपूज्य गुरूवर्य श्री.समीर(दादा) भास्करे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवीण बासटवार,डॉ.अभिजीत चव्हाण,विजय चव्हाण, बालाजी उमनवार, अनिकेत पवार, सौरभ कासवेकर, भगवान सवूळकर,रोहन गडदे, श्रध्दा भास्करे,संगिता सौदागर, सिता गडदे,पुष्पलता कराड,पुष्पा बोऱ्हाटे,पल्लवी धोकटे,मिना कदम, जान्हवी पतंगे,सागर महामुनी,अश्विनी महामुनी यांनी परिश्रम घेतले.

### मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे शेळ्या व मेंढ्यांचे पी पी आर लसीकरण संपन्न

तभा वृत्तसेवा



बीड दि.२२ जानेवारी

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर* महाविद्यालयाच्या राष्ट्रीय योजना विभाग व पशुवैद्यकीय दवाखाना नवगण राजुरी यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक व युवती निवासी शिबिरा दरम्यान दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी बकरी व मेंढी प्लेग प्रतिबंध लसीचे लहान रूमिनन्स चा रोग लसीकरण आयोजित करण्यात आले होते. या लसीकरणांमध्ये डॉक्टर प्रदीप आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय तज्ञ डॉक्टरांची टीम शिबिर स्थळी दाखल झाली होती या टीम मध्ये शेळ्या व मेंढ्यांना लसीकरणाचे काम श्रीमती मंगला ढगे, श्री वाघ श्री सोनार, श्री बनकर, डॉक्टर राऊत, श्री केतके परमेश्वर, महादेव सानप, नारायण सोनार, श्रीकांत बहिर, विशाल तांदळे विवेक दराडे, सुरेश पवार, या सर्वांनी शेळ्या मेंढ्यांच्या या प्लेग प्रतिबंध लसीकरणाचे काम केले.मौजे वंजारवाडी गावातील मेंढपाळ व शेळी पालन करणारे शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते एकाच दिवशी सुमारे १७२ शेळ्या मेंढ्यांच्या संसर्गजन्य आजारापासून मुक्त होण्याकरता सर्व डॉक्टर सर्वस्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.या गावातील श्री दगडू तांदळे, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक संजय काळे डॉक्टर सुहास जोशी, स्वयंसेवक पवन कपाळे अनंत चव्हाण, निखिल वाघमारे, अजय शिंदे,गोविंद फासे, अभिजीत वडमारे, इमरान कुरेशी उपस्थित होते.



### महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल विवाह थांबणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे बाल विवाह प्रतिबंध कायदे विषयक माहिती देणारा कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी अँड.अरविंद पाटील यांनी बाल प्रतिबंध कायदे विषयक माहिती दिली.

प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर चालू आहे. दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंध रॅली काढण्यात आली बालविवाह अपराध है, प्राधान्य द्या शिक्षणाला नकार द्या बालविवाहाला बालविवाहाचा करू निषेध यशस्वी भविष्याचा होऊ वेध, सर्वांनी आता ठरवूया बालविवाहाला हरवू या अशा अनेक घोषणांनी विद्यार्थ्यांनी घरी आली मध्ये घोषणा दिल्या. रॅली निघण्यापूर्वी बीड येथील प्रसिद्ध वकील श्री अरविंद पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यावर मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले प्रत्येक आई-वडिलांनी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्यास ते विवाह करण्यास पात्र ठरतील या वयाच्या आधी बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे बालविवाहास प्रत्येक नागरिकांनी विरोध केला पाहिजे बालविवाह करणे म्हणजे अपराध आहे प्रथम प्रत्येक नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षणास प्राधान्य द्यावे व बालविवाह पासून रोखणे ही काळाची गरज आहे. बालविवाहाच्या बाबतीत १०९८ ही हेल्पलाइन नंबर असून या नंबर वरती नागरिक फोन करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बी. डी. नागरगोजे होते. श्री नागरगोजे सर म्हणाले प्रत्येकाने प्रथम शिक्षणाला प्राधान्य देऊन प्रत्येक कुटुंबास प्रतिबंध करण्यास सतर्क करणे ही काळाची गरज आहे बालविवाहाचा गुन्हा करण्याआधीच बालविवाह प्रतिबंध साक्षरता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेने राबविले हा एक स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम आहे.या फेरीमध्ये श्रीमती एस बी नागरगोजे, श्री शिंदे सर व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथील सर्व शिक्षक मातोश्री विद्यालयातील सर्व विद्यार्थी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ सुहास जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अजय शिंदे, पवन कपाळे, अभिजीत वडमारे, निखिल वाघमारे, अनंता चव्हाण, इमरान कुरेशी, प्रसाद पांडे, गावातील नागरिक श्री दगडू तांदळे, श्री गायकवाड, आदी नागरिक उपस्थित होते.

# महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल विवाह थांबणे आवश्यक-अँड.पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे बाल विवाह प्रतिबंध कायदे विषयक माहिती देणारा कार्यक्रम आयोजित केला होता या वेळी अँड.अरविंद पाटील यांनी बाल प्रतिबंध कायदे विषयक माहिती दिली.




प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर चालू आहे. दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंध रॅली काढण्यात आली बालविवाह अपराध है, प्राधान्य द्या शिक्षणाला नकार द्या बालविवाहाला बालविवाहाचा करू निषेध यशस्वी भविष्याचा होऊ वेध, सर्वांनी आता ठरवूया बालविवाहाला हरवू या अशा अनेक घोषणांनी विद्यार्थ्यांनी घरी आली मध्ये घोषणा दिल्या. रॅली निघण्यापूर्वी बीड येथील प्रसिद्ध वकील श्री अरविंद पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यावर मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले प्रत्येक आई-वडिलांनी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्यास ते विवाह करण्यास पात्र ठरतील या वयाच्या आधी बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे बालविवाहास प्रत्येक नागरिकांनी विरोध केला पाहिजे बालविवाह करणे म्हणजे अपराध आहे प्रथम प्रत्येक नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षणास प्राधान्य द्यावे व बालविवाह पासून रोखणे ही काळाची गरज आहे. बालविवाहाच्या बाबतीत १०९८ ही हेल्पलाइन नंबर असून या नंबर वरती नागरिक फोन करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बी. डी. नागरगोजे होते. श्री नागरगोजे सर म्हणाले प्रत्येकाने प्रथम शिक्षणाला प्राधान्य देऊन प्रत्येक कुटुंबास प्रतिबंध करण्यास सतर्क करणे ही काळाची गरज आहे बालविवाहाचा गुन्हा करण्याआधीच बालविवाह प्रतिबंध साक्षरता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेने राबविले हा एक स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम आहे.या फेरीमध्ये श्रीमती एस बी नागरगोजे, श्री शिंदे सर व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथील सर्व शिक्षक मातोश्री विद्यालयातील सर्व विद्यार्थी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ सुहास जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अजय शिंदे, पवन कपाळे, अभिजीत वडमारे, निखिल वाघमारे, अनंता चव्हाण, इमरान कुरेशी, प्रसाद पांडे, गावातील नागरिक श्री दगडू तांदळे, श्री गायकवाड, आदी नागरिक उपस्थित होते.

# जन शिक्षण संस्थान बीड द्वारा तृतीय पंथीयांना व्यवसायिक प्रशिक्षण नियोजन बैठक



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान,जन शिक्षण संस्थान बीड आणि सेवा भारती देवगिरी प्रांत यांच्या सहयोगाने तृतीयपंथी समाजासाठी व्यावसायिक कौशल्य विषयक प्रशिक्षण नियोजन बैठक दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आली. बैठकीमध्ये कौशल्य प्रशिक्षण याबाबत चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रोहित दोशी यांनी केले.यावेळी जन शिक्षण संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी जन शिक्षण संस्थानची माहिती सांगून प्रशिक्षणानंतर तुमचे उत्पन्न वाढवून सन्मानाने समाजामध्ये वावरता येईल असे सांगितले. अर्पिता भिसे (तृतीयपंथी)यांनी तृतीय पंथीयांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष द्यावे, असे मत मांडताना शिक्षण सगळ्यांनाच आवडते असे नाही काहीजण व्यवसाय करू इच्छितात ज्यांना व्यवसाय करायचा आहे त्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे असे मत मांडले.

वडवणी तालुक्यात सिताफळाचे उत्पन्न भरपूर आहे तर तेथील लोकांसाठी सिताफळ प्रक्रिया उद्योग सुरू करता येईल का

तसेच असिस्टंट ड्रेस मेकर हे प्रशिक्षण दिले तर शालेय युनिफॉर्म,इतर विभागाचे युनिफॉर्म, साडी पेटीकोट, महाराष्ट्रीयन गोधडी (रजई) हे त्यांना शिकवता येईल. असे संचालक श्री गंगाधर जी देशमुख म्हणाले. हा विषय सर्वांनाच आवडल्याने यावर विचार करून नियोजन करावे असे उपस्थित मान्यवरांनी सुचवले.या बैठकीसाठी नांदेड येथील फरीदा गुरू व त्यांचे सहकारी, अमरदीप गोधने संभाजीनगर येथील अर्पिता भिसे, जन शिक्षण संस्थान बीडच्या उपाध्यक्ष डॉ. सत्यभामा चोले , सेवा भारतीचे श्री रावसाहेब जी कुलकर्णी, गिरीश जी जोशी, डॉ. सुभाष जोशी,महेश कुलकर्णी,तारकेश्वर गिते , रोहित दुशी,धान फाउंडेशनचे श्री मुकुंद भुसारे व जन शिक्षण संस्थान बीडचे अधिकारी उपस्थित होते.

# बीडची लेक वैभवी टाकणखार प्रजासत्ताक दिनी राजपथावर सामुहिक नृत्य

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ जानेवारी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी लाल किल्ला दिल्ली येथे राजपथावर महाराष्ट्राची लोककला सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे वैभवी कैलास टाकणखारची निवड करण्यात आली आहे. भारतातून २९ राज्यातील ५००० विद्यार्थी आपल्या राज्यातील लोकनृत्य सादर करणार आहेत.महाराष्ट्रातील ४० कलाकारांचा संच महाराष्ट्राची लोकधारा कोकणातील कोळी नृत्य सादर करणार आहेत.

अथर्व वेद परंपरा कला मंच रत्नागिरी महाराष्ट्रचे संस्थापक पडवळ तसेच लोकनृत्य दिग्दर्शक अभ्यासक शेख.जावेद यांच्या मार्फत निवड करण्यात आली.यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे होणाऱ्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात आपल्या कौशल्याचा ठसा उमठवणार आहे.वैभवी कैलास टाकणखार ही माजलगांव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिक्षण घेत आहे वैभवीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये नृत्याचे धडे घेतले आहेत.महाराष्ट्रातील विविध स्पर्धेत पारितोषिक पटकावले आहेत. भरतनाटयम, फोक, बालीवुड, हिपहाप अशा विविध नृत्यामध्ये धडे घेतले आहेत वैभवीने आतापर्यंत ३६४ पारितोषिक पटकावले असून त्या राज्यस्तरिय, देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडली आहे.तसेच टिव्ही शो वरील कार्यक्रमात इ. टिव्ही मराठी, झी मराठी, डान्स महाराष्ट्र डान्स, सह्याद्री वाहिनी, स्ट्रार प्रवाह, दुरदर्शन अशा विविध रियालटी शो मध्ये सहभाग घेतला आहे.



# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास साध्य होतो-तहसीलदार रुईकर

## सुंदराराव सोळंके महाविद्यालयाच्या रासेयोच्या शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ जानेवारी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिशा मिळते.शिबिराचया माध्यमातून विविध कृतिशील उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साध्य होतो असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन करताना तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लऊळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय विशेष वार्षिक निवासी शिबिर दि.२३ ते २९ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. शिबाराचे उद्घाटन तहसीलदार संतोष रुईकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर , प्राचार्य डॉ.जी. के. सानप,सरपंच लक्ष्मण सरवदे,उपसरपंच गणेश शिंदे, मनोज सदावर्ते,मुख्याध्यापक बाजीराव राठोड,कार्यक्रमाधिकारी प्रा.उमेश राठोड,डॉ.बीलास काळे, प्रा. ओ. एच. सारगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना तहसीलदार संतोष रुईकर म्हणाले की, पर्यावरण, स्वच्छता, डिजिटल साक्षरता आदी बाबतीत जनजागरण करण्याची उत्तम संधी आहे. विद्यार्थ्यांनी सात दिवसांमध्ये उपक्रमशील कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासावी. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के.सानप म्हणाले की, महाविद्यालय सतत ज्ञानदानाबरोबरच सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ करत आहे.अध्यक्षीय समारोप बाळासाहेब शिंदे यांनी केला, याकार्यक्रमाचे प्रास्तावित कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी केले. सूत्रसंचालन कु.नंदनी गर्गे हिने केले तर आभार प्रा. बिलास काळे यांनी मानले.यावेळी स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

# कौशल्याधिष्ठीत शिक्षण काळाची गरज-प्रो.डॉ.सुधाकर शेंडगे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ जानेवारी**

सद्यस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून नौकरी मिळत नाही ही गंभीर बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत व्यावसायिक कौशल्यावर आधारीत शिक्षण घेणे काळजी गरज आहे असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले.



सुंदराराव सोळंके महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.एम. ए. कव्हळे होते तर कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. सुधाकर शेंडगे म्हणाले की, शिक्षण हे वर्गात नसते तर खरे शिक्षण वर्गाच्या बाहेर विविध राबवल्या जाणाऱ्या उपक्रमात आहे. अनुभवातून शिक्षण मिळत असते. शिक्षणातून सदाचारी माणूस घडला पाहिजे.आपला सदाचारिपणाच ही आपली ओळख असते.विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तसेच त्यांच्यामध्ये असणाऱ्या विविध कौशल्यांचा विकास करण्याचे काम आजीवन व शिक्षण विस्तार विभाग करत असल्याचे ते म्हणाले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ एम.ए. कव्हळे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.प्रास्ताविक प्रा.बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरुण पेंटावार यांनी केले तर आभार प्रा.सुदर्शन स्वामी यांनी मानले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्या माजलगावच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्यास तांत्रिक कार्यक्षमता पुरस्काराने गौरव

### शरदचंद्रजी पवार,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ जानेवारी**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी पुणे मार्फत दिला जाणारा २०२३-२४ यावर्षीचा तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार (उत्तर पूर्व विभाग )द्वितीय पारितोषिक छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड यांना मा.शरदचंद्रजी पवार व मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मा.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

हा पुरस्कार कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप व कार्यकारी संचालक, शेतकी अधिकारी, सचिव, चीफ इंजिनिअर, चीफ अकाऊंटंट यांनी स्वीकारला.काल पुणे येथे वसंतदादा शुगर इन्स्टिटच्यूट यांच्यावतीने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. मागील २०२३-२४ या वर्षाच्या तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार छत्रपती कारखान्याच्या कार्यक्षमता मधील उसाचा तंतुमय निर्देशांक ८४.१०%, रिड्यूस्ड मिल एक्सट्रॅक्शन ९५.६५ , प्रायमरी एक्स्ट्रक्शन ७३.३०%, बगॅस बचत ११.५१%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा वापर ४०.६०%, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या विजेचा वापर २६.४० किलो वॅट प्रति टन ऊस, गाळप क्षमतेचा वापर ११२.४७%, देखभाल दुरुस्तीसाठी एकूण खर्च रुपये ११५ प्रति टन ऊस, गाळपाचे बंद कालावधीचे प्रमाण १.०७% बगॅस मधून व्येय होणाऱ्या साखरेचे प्रमाण ०.५६% मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या मध्ये घट ०.४८१% असे कार्यक्षमता वैशिष्ट्य कारखान्याने केलेली असून यामुळे छत्रपती कारखान्यास मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन कारखान्यास गौरविण्यात आले या पुरस्कारासाठी सर्व स्तरातून चेअरमन बाजीराव जगताप,व्हा.चेअरमन मोहनराव जगताप तसेच कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# सोळंके साखर कारखान्याकडून ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात वर्ग-चेअरमन विरेंद्र सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**तेलगाव दि.२२ जानेवारी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या चार जानेवारी अखेर ऊस बीलाची रक्कम बॅक खात्यात जमा केली असल्याची माहिती चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी दिली.



यासंदर्भात चेअरमन विरेंद्र दादा सोळंके म्हणाले की,लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४२५ दि.१३ड़१२ड़२०२४ ते दि.४ड़०१ड़२०२५ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाचे पहिल्या हप्त्याची रक्कम तुर्त प्रति टन २४०० रू.प्रमाणे संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बॅक खात्यात दि.२२ड़०१ड़२०२५ रोजी वर्ग केली.कारखान्याचा सन २०२४२५ चा ऊस गाळप हंगाम सध्या यशस्वीपणे चालु असुन, दि.२२ड़०१ड़२०२५ अखेर एकुण ६० गाळप दिवसांमध्ये २७७००० मे टन ऊसाचे गाळप करुन सरासरी ९६६% साखर उताऱ्याने १२४००० क्विंटल साखरचे उत्पादन घेतले.याबरोबरच ६६७१३१० लिटर इथेनॉलचे उत्पादन घेवुन १२९६२६०० युनिट विजेची निर्मिती केली.असे सांगून यापुर्वी चालु गळीत हंगामातील दि.२४ड़११ड़२०२४ ते दि.१२ड़१२ड़२०२४ या कालावधीत गाळप झालेल्या ऊस बीलासाठी डव्हान्स हप्त्याची रक्कम २७०० रू.प्रति टन प्रमाणे ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग केली असुन, यापुढील कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई यांनी ऊस बीलासाठी रक्कम उपलब्ध करून दिल्याप्रमाणे दि.१३ड़१२ड़२०२४ ते दि.०४ड़०१ड़२०५२५ या कालावधीत गाळप झालेल्या ११९१९६ मे.टन ऊसाचे पहिल्या हप्त्याची रक्कम तुर्त प्रति टन २४०० रू.प्रमाणे ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग केली असुन, उर्वरित राहिलेली रक्कम ही निधी उपलब्धतेनुसार लवकरच संबंधित ऊस उत्पादकांच्या बॅक खात्यात वर्ग करण्याचे कारखाना व्यवस्थानाचे नियोजित असल्याचे कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी नमूद करून कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके आणि सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने सातत्याने जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यामुळे ऊस उत्पादकांनी कोणतीही शंका न बाळगता उद्दीष्ट पुर्तीसाठी आपला ऊस याच कारखान्यास गाळपास देऊन सहकार्य करावे.असे आवाहन ही चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माऊली महिला भजनी मंडळाचा दुसरा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** गोपाळनगर येथील माऊली महिला भजनी मंडळाचा दुसरा वर्धापन दिन विविध अध्यात्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती वनमाला इंजे यांनी मंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या भजन, प्रवचन, किर्तनासह विविध उपक्रमांची माहिती दिली. वारकरी साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य अंतर्गत कार्यरत असलेले हे मंडळ लातूर परिसरात भजन, कीर्तन आणि प्रवचन यासारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित करून समाजातील महिलांना एकत्र आणण्याचे काम करते.

या मंडळाचा उद्देश भजन, कीर्तन आणि प्रवचनाद्वारे धार्मिक जागृती करणे, महिलांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक विकासासाठी प्रयत्न करणे, समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करणे असा आहे. या कार्यक्रमास जेएसपीएम शिक्षण संस्थेचे कार्यवाह अजित पाटील कव्हेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. सोनाली थोरमोटे पाटील, वारकरी साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्षा लक्ष्मीबाई भडके, माजी नगरसेविका शोभा पाटील, तालुका अध्यक्ष भागवत गोरे, तालुका कोषाध्यक्ष सुखाचारी महाराज यांच्यासह मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती वनमाला इंजे, उपाध्यक्षा भाग्यश्री यादव, सचिव भाग्यश्री जाधव, कोषाध्यक्षा शकुंतला कदम, संपर्क प्रमुख सुमन मारडकर, सहसंपर्क प्रमुख सोजरबाई शिंदे, सदस्या सुजाता मारडकर, शालुताई पौळ, संगीता कांबळे, अंजना काळे, संगीता शिनगारे, प्रज्ञा भालेराव, शारदा भांदर्गे, दैवशाला सोमवंशी, वर्षा खुणे, सुशिला गिरी यांच्यासह भाविक भक्त व महिला उपस्थित होत्या. महिलांना एकत्र आणून त्यांच्यातील कला आणि कौशल्य विकसित करण्यासाठी हे मंडळ कार्य करत आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## मनपाच्या गाळेधारकांना व्याजामध्ये १०० टक्के सूट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** शहर महानगरपालिका मालकीच्या व बी. ओ. टी तत्त्वावरील व्यापारी संकुलामध्ये १ हजार ७०७ गाळे आहे. व्यापारी संकुलातील गाळे धारकांची थकबाकी मोठ्या प्रमाणात असून प्रजाकसत्ताक दिनाचे औचित्य साधून २३ जानेवारी ते २० फेब्रुवारीपर्यंत एक रकमी गाळेभाडे अदा करणाऱ्या गाळेधारकांस व्याजामध्ये १०० टक्के सूट दिली जाणार आहे.

गतवर्षी महानगरपालिकेच्या कार्यवाहीमध्ये मनपा मालकीचे २१ गाळे व बी. ओ. टी तत्वावरील ३५ गाळे असे एकूण ५६ गाळे सिल करुन ताब्यात घेतले होते. त्याची लिलाव प्रक्रिया सुरु आहे. तथापि मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी आहे. गाळेधारकांच्या मागणीनुसार प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन २३ जानेवारी ते २० फेब्रुवारी पर्यंत एक रक्कमी गाळे भाडयाचा भरणा करणाऱ्या गाळेधारकांस व्याजमध्ये १०० टक्के सुट लागू करण्याचा निर्णय मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. या गाळेधारकांनी सदर कालावधीमध्ये गाळे भाडे भरणा करुन सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन मालमत्ता विभागाचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे. त्यामुळे गाळेधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सुभाष चंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण् इंग्लिश स्कुल मध्ये आज नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी केली.

सर्व प्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी,शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोनेयांच्या हस्ते करण्यात आली. विद्यार्थांना भारतातील क्रांतीकारकांची ओळख व्हावी तसेच त्यांचे स्वातंत्र्य लढयातले योगदान काय आहे हे आजच्या तरुण पिढीस कळावे या हेतूने नेताजी सुभाष चंद्र बोस जयंतीचे आयोजन शाळेच्या वतीने केले. शाळेचे शिक्षिका नम्रता डांगे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याची माहिती देत असताना त्यांनी स्थापन केलेली आझाद हिंद फौज व तुम मुझे खून दो,मै तुम्हे आझादी दूंगा या घोषणेची व उल्लेखनीय कार्याची माहिती दिली. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थीसुजय मोहिते, राजवीर तळणे, स्मयन कुलकर्णी, जयेश वाघमारे, स्वराज भोसले, वेदांत मुळे, विघ्नेश वाघमारे, प्रथमेश रकटे, अर्णव शिंदे, क्षितीज काटे, शौर्य जाधव यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

## शिरूर येथे दारूबंदीसाठी महिला आत्मदहनाच्या पवित्र्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** तालुक्यातील शिऊर येथे मोठ्या प्रमाणार अवैध दारु विक्री सुरु असून, ती बंद करावी या प्रमुख मागणीसाठी गावच्या सरपंचासह महिला आत्मदहनाच्या पावित्र्यात आहेत. २६ जानेवारी रोजी सरपंचासह महिला आत्मदहन करणार आहेत, असा इशारा दिला आहे.

गत २५ वर्षांपासून शिऊर येथे अवैध दारुची विक्री होत असून, गावातील कायदा व सुव्यवस्था, शांतता धोक्यात आली आहे. दारुच्या आहारी गेल्याने गावातील युवक मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन बनत चाललेले आहेत. गावातील दारु बंद व्हावी यासाठी गत दोन वर्षापासून प्रयत्न केले जात आहेत.

मात्र, याची दखल प्रशासन घेत नाही. या अवैध दारुविक्रीमुळे गावातील जवळपास २५ टक्क्यांवर युतक, पुरुषांनी दारुच्या नशेत आत्महत्या केल्याचे सरपंच प्रा. सचिन सूर्यवंशी यांनी पत्रकात म्हटले आहे. गावातील दारु बंद करावी, या प्रमुख मागणीसाठी रविवार, २६ जानेवारी रोजी सरपंचासह महिला सामुहिकपणे आत्मदहन करणार आहेत, असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आला आहे. सरपंच प्रा. सचिन विष्णू सूर्यवंशी यांची स्वाक्षरी आहे.

# एमआयडीसी परिसरात साकारणार अद्ययावत बाजार समिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** लातूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यातील एक प्रमुख बाजार समिती आहे. मात्र, सध्याच्या बाजार समितीची क्षमता अपुरी पडत असल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नवीन आधुनिक मार्केट यार्ड उभारण्याची गरज आहे. यासाठी लातूरच्या एमआयडीसी परिसरातील मंजूर असलेल्या भूखंडावर नवीन अद्ययावत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्केट यार्ड असावे, या ठिकाणी फळे, फुले, भाजीपाला व शेतकऱ्यांच्या इतर कृषी माल निर्यातीच्या सुविधा उभारणीसाठी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी पणनमंत्री जयकुमार रावल यांची मुंबई येथे मंत्रालयात भेट घेतली.

यावेळी आमदार देशमुख यांनी पणनमंत्री रावल यांच्याकडे मागण्यांचे निवेदन सादर केले. एमआयडीसी परिसरात मंजूर भूखंडावर नवीन मार्केट यार्ड उभारणीबाबत, बाजार समितीची नवीन नियमावली, कृषीमाल निर्यातीसाठी उपलब्ध असलेल्या संधी, अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाचा वापर आदी विषयांवर चर्चा केली. दरम्यान, लातुरातील नवीन मार्केट यार्डची उभारणी व तेथे शेतकऱ्यांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन पणनमंत्री रावल यांनी यावेळी दिले.

लातूर येथे राज्यातील नामवंत अशी कृषी मालाची बाजारपेठ आहे. येथील बाजार समितीकडे कोणत्याही प्रकारचे थकीत कर्ज नाही. बाजार समितीतर्फे शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी व उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व कृषिविषयक सोयी सुविधा पुरवण्यास बाजार समितीला परवानगी द्यावी, शेतकऱ्यांच्या गुणवंत मुलांना अद्ययावत शैक्षणिक साहित्य म्हणून टॅब, शेतीमालाची जपणूक करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदानावर ताडपत्री वाटप करण्यास परवानगी मिळावी, आदी मागण्या आमदार देशमुख यांनी केल्या.



यावेळी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे व पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांना पुरस्कार : उद्या पुण्यात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** लातूरच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे यांना महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी-२०२५ हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. असा पुरस्कार राज्यातील चार जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांना जाहीर झाला आहे.

दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस देशभरात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी हा १५ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येत आहे. राज्यातील लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या राज्यातील चार जिल्हाधिकाऱ्यांना उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी या पुरस्काराने २५ जानेवारी रोजी पुणे येथील एमआयटी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे.

हा पुरस्कार जाहीर झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांमध्ये लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नंदूरबारच्या जिल्हाधिकारी मनीषा खत्री, अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभार व गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय दैने यांचा समावेश आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हाधिकारी ठाकूर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शाळा तिथे ग्रंथालय हवे; शिक्षक सेनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** शाळा तिथे ग्रंथालय हवे, सेवा समाप्ती दिनीच सेवा उपदान, ग्रॅच्युईटीचा प्रत्यक्ष लाभ, भविष्य निर्वाह निधीचा लाभ व पेन्शन आदेश प्रत त्याच दिवशी मिळावी म्हणून शिक्षक सेना अधिवेशनात मुद्दा गाजविणार असल्याची माहिती शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे यांनी दिली.

शिक्षक सेनेची विभागीय बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी अशा मागण्या करण्यात आल्या आहे.

## परिवहन कार्यालयातील रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत प्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात आयोजित शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ४१ जणांनी रक्तदान केले.

रस्ता सुरक्षा अभियाननिमित्त प्रादेशिक परिवहन विभागातर्फे जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. वाहनचालकांची नेत्र तपासणी, हेल्मेट वापराचे फायदे, वाहतूक नियमांचे उल्लंघन, नो हॉर्न आदी प्रकारचे कार्यक्रम घेण्यात आले. प्रादेशिक परिवहन कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना वाहतूक नियमांची माहिती व्हावी, यासाठी फलक लावण्यात आले आहेत. शिवाय, अपघात रोखण्यासाठी वेग मर्यादा पाळावी, मद्यप्राशन करून वाहन चालवू नका, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी यावेळी केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या सूचनेनुसार अधिकारी आणि कर्मचारी वाहनधारकांना रस्ता सुरक्षा अभियानासंदर्भात माहिती देत आहेत. प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी घेण्यात आलेल्या शिबिरात अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला. या शिबिरात ४१ जणांनी रक्तदान केले.

या शिबिरात मोटार वाहन निरीक्षकांसह कर्मचारी, वाहन चालक, दक्ष पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक राजकुमार अंबुलगे यांच्यासह विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.




## जयक्रांती टॅलेंट हंटमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला : खा. काळगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** काळाच्या ओघात शिक्षण प्रणालीमध्ये होत असलेल्या बदलांचा अवलंब करीत जयक्रांती टॅलेंट हंटचा प्रवास सुरु आहे. येथील पद्धती आणि विद्यार्थ्यांना मिळत असलेले ज्ञानार्जनाचे धडे यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केले. जयक्रांती महाविद्यालयाने आयोजित केलेली जयक्रांती टॅलेंट हंट परीक्षा २०२५ च्या एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक वितरण खा.डॉ. काळगे यांच्या उपस्थितीत पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, प्राचार्य प्रशांत घार, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य डॉ. प्रमोद तांदळे, प्राचार्य विक्रम जाधव, पर्यवेक्षक तानाजी घाटके, प्रा. विजयकुमार मोरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य प्रशांत घार, सूत्रसंचालन डॉ. केशव आलगुले तर आभार प्रा. रवी नाबदे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. संगमेश्वर करंजे, प्रा. विजयकुमार मोरे, प्रा. सुनिता कुरे, अमर येळमकर, अमित भालके, राजू रायबोले, इंगळे व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## गुन्ह्यात वापरलेली ५०५ वाहने धूळखात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** पोलीस ठाणे कोणतेही असो त्याच्या समोर किंवा मागच्या बाजूस लोखंडी साखळीने अगदी भंगारातही कोणी घेणार नाही अशा दुचाकींची पार्किंग पाहवयास मिळते. वर्षानुवर्षे ही वाहने ठाण्यासमोरच असतात. वेगवेगळ्या गुन्ह्यातील ही वाहने असून यावर कायदेशीररित्या कारवाई झाल्याशिवाय पोलीस प्रशासनालाही काही करता येत नाही.

लातूर शहरातील पाच पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडे या वाहनांची संख्या ही ५०५ आहे. पुढच्या आठवड्यात पोलीस महानिरीक्षक हे लातुरात येत आहेत. त्यामुळे या वाहनांचाही अहवाल तयार करण्यात आला असून यावर काय निर्णय होणार का हे पहावे लागणार आहे.

पोलीस ठाण्यासमोर आरोपीने गुन्ह्यात वापरलेले, चोरी केलेले किंवा गुन्ह्याच्या पैशामधून खरेदी केलेले वाहन हे पार्किंग केलेले असते. गुन्ह्यातील वाहनावर कारवाई तर पोलीस करतात पण पुढे त्याचे काय करायचे याबाबत पोलिसांना कोणतीच भूमिका घेता येत नाही.

शिवाय लिलाव करायचा असेल तर आरटीओ कार्यालयाकडून मुल्यमापन, उपविभागीय अधिकारी यांची परवानगी आणि त्यानंतर लिलाव. शिवाय आरोपीचे स्वतःचे वाहन किंवा त्याने चोरी केलेले वाहन व गुन्ह्याच्या पैशातून वाहन खरेदी केले असेल तर ते संबंधितांना देण्याबाबत वेगवेगळी प्रक्रिया आहे. आता या वाहनांचा अहवाल जिल्हाधिकारी, पोलीस महानिरीक्षक यांच्यासमोर मांडला जाणार असल्याने या वाहनांबाबत काय निर्णय घेतला जाणार का हे पहावे लागणार आहे.

ठाणेनिहाय वाहनांची संख्या

गांधी चौक पोलीस ठाणे- १५९, विवेकानंद पोलीस ठाणे- १३०, लातूर ग्रामीण ११०, एमआयडीसी पोलीस ठाणे- ४७ तर शिवाजी नगर पोलीस ठाण्याकडे ५९ वाहने आहेत.

वाहनांचे पुढे होते काय ?

आरोपीच्या नातेवाईकास बोलावले जाते- वाहन मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज करणे अर्जावर न्यायालयाचे काय म्हणणे हे लेखी घेणे- अटी शर्थीवर वाहन देण्याबाबत न्यायालयाचे नाहरकत देणे- न्यायालयाचे आदेश प्राप्त करणे- वाहनाचा पंचनामा करुन न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आरोपींच्या ताब्यात दिले जाते. अशी माहिती पोलीस ठाण्यात देण्यात आली.

## प्राचार्य डॉ.गवई यांना पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** भारतीय दलित पँथरच्यावतीने दिला जाणारा पहिला राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार २०२४ लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय दुर्वासराव गवई यांना दिला जात असल्याचे भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे व छ.शिवरायांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह राजे भोसले यांनी जाहीर केले आहे.

सदर पुरस्कार प्रजासत्ताक दिनी अर्थात रविवार,दि.२६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता श्रावस्ती बुध्द विहार विक्रम नगर,लातूर येथे वितरीत केला जाणार आहे. देशातील पिडीतांवरील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी महाराष्ट्रातील बहुजन समाजातील सुमारे ६०० पेक्षा अधिक ज्येष्ठ पँथर्सनी ३ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय दलित पँथरचे पुनरुज्जीवन केले असून, सध्या महाराष्ट्रात तिचे कार्य चालू आहे.

त्यातच समाजातील चारित्र्यवान, नितीमान आणि विशेषतः शीलसंपन्न व्यक्तींना समाजासमोर आदर्शरुपाने उभे करण्यासाठी त्यांना शिलरत्न राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा विचार पुढे आला असून,सदरील पहिलाच राज्यस्तरीय शिलरत्न पुरस्कार २०२४ साठी छ.शिवराय-फुले -शाहू- आंबेडकर - माहत्मा बसवेश्वर यांच्या विचारांशी एकनिष्ठ राहून, बौध्द धम्म जीवनास सर्वश्रेष्ठ मानून शील सदाचाराचे आचरण करणारे,लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय गवई यांच्या नावाची निवड पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष भारतीय दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस.नरसिंगे, बीड जिल्हाध्यक्ष वैजनाथ गायकवाड आदिंनी घोषीत केले आहे.

## लातुरात एकदिवशीय कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टी आणि समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ आणि सुधारित अधिनियम २०१६ याविषयी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आज पार पडली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे झालेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना या कायद्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



बार्टीचे प्रशिक्षण विभाग प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी सागर खर्डे, विशेष सहाय्यक सरकारी वकील ड. लक्ष्मण शिंदे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक नितिन सहारे, सचिन नांदेडकर, प्रमुख व्याख्याते सुभाष केकान, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त तेजस माळवदकर, अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, पोलीस उपाधीक्षक एस. एन. राऊत, लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, निलंगाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्यासह तहसीलदार व इतर जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिकारी कार्यशाळेला उपस्थित होते.

बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक नितीन सहारे यांनी प्रास्ताविकात कार्यशाळा आयोजनाचा हेतू विशद केला. प्रमुख व्याख्याते सुभाष केकान यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ आणि सुधारित अधिनियम २०१६ यामधील विविध तरतुदींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ड. लक्ष्मण शिंदे यांनी या कायद्याअंतर्गत गुन्हे नोंद करताना पोलीस विभागाने कोणती काळजी घ्यावी. तसेच इतर न्यायालयीन प्रक्रियेबाबत माहिती दिली.

बार्टीचे सचिन गिरमे व सामाजिक न्याय विभागामार्फत पुरस्कार प्राप्त झालेले पुरस्कारार्थी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, समाज कल्याण कार्यालयातील अधिकार, कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी सर्व तालुका समन्वयक व समतादुत यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. अरुण धायगुडे यांनी केले.

## साहित्य व्यवहार निखळ आनंदी व प्रामाणिक असावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ जानेवारी -** मराठी साहित्याला प्रामाणिक लेखनाची, निखळ मनोरंजनातून आनंदाची आणि तितकीच पुरोगामी विचारांची परंपरा आहे. साहित्य लेखन भाषण,समीक्षण आणि साहित्य कलाकृतीला मिळणारे पुरस्कार हे त्या कलाकृतीच्या गुणवत्तेवर मिळाले पाहिजेत, यामुळेच साहित्य व्यवहार हा खरा प्रामाणिक आणि निखळ आनंददायी ठरतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ कथा कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते यांनी केले.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूर व जयक्रांती महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्तपणे छत्रपती संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणीवर निवडून आलेल्या सदस्यांचा सत्कार समारंभ काल जयक्रांती महाविद्यालय लातूर येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमापूजनाने झाली. यानंतर प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्तींचा येथोचीत सत्कार करण्यात आला.

यावेळीविचारपीठावरकार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.शेषराव मोहिते, प्रमुख पाहुणे लातूर सार्वजनिक बांधकाम महामंडळाचे अधीक्षक अभियंता व शून्यातून शंभराकडे या गाजलेल्या आत्मकथेचे लेखक डॉ. सलीम शेख होते.

प्रमुख पाहुणे जयक्रांती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रशांत घार, मसाप केंद्रीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, मसाप केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. जयद्रथ जाधव, मसाप स्वीकृत सदस्य मोहीब कादरी, डॉ.केशव अलगुले व मसापचे सचिव डॉ. दुष्यंत कटारे उपस्थित होते. यावेळी ग्रामीण शब्दकोश समिती सदस्यपदी माजी प्राचार्य द.मा.माने, विवेक सौताडेकर, ॲड.हाशम पटेल, डॉ. ज्ञानदेव राऊत, श्रीमती सुरेखा उस्तुर्गे व अनिता येलमटे आदिंची निवड करण्यात आली.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## हत्यार बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील बोरोळ येथे बेकायदेशीर रित्या घातक हत्यार तलवार बाळगल्या प्रकरणी एका विरूद्ध देवणी पोलीसात गून्हा दाखल.

पोलीस प्रशासनाच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, मोजे बोरोळ येथे आरोपीने स्वतःहाच्या घरी ताब्यामध्ये धाराधार हत्यार तलवार बाळगल्या प्रकरणी गूप्त माहीती पोलीसांना मिळाली पोलीस प्रशासणाने त्वरीत घराची झडती घेतली मिळून आलेली लोखंडी धारधार तलवार किंमत ५०० रू. जप्त करण्यात आली.

पोशि. अभिजीत डोईजोडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी राहुल शिवाजी कांबळे (रा. बोरोळ ता. देवणी) यांच्या विरोधात गूरनं २२/२०२५ कलम ४२५ शस्त्र अधिनियम १९५९ नूसार गून्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा अधिक तपास तपास उस्तूर्गे हे करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### डिगोळ येथे सप्ताहानिमीत्त गोल रिंगण सोहळा उत्साहात

**शिरूर अनंतपाळ, दि.२३ जानेवारी -**

डिगोळ (ता. शिरुर अनंतपाळ) येथे शनिवारी हरिनाम सप्ताहानिमीत्त हभप. तात्यासाहेब वासकर व विठ्ठल महाराज वासकर यांच्या पुढाकारातुन व प्रेरणेतुन आळंदी ते पंढरपुर पायी यात्रेत होणारे गोल रिंगण सोहळा मान्यवर, भाविक भक्त यांच्या उपस्थीतीत उत्साहात संपन्न झाला. यावेळी ॲड. संगिता पाटील-निलंगेकर, खा.डॉ. शिवाजीराव काळगे, दगडु साळुंके, गोविंद केंद्रे, महिला काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षा. डॉ. राखी शेळके, राम तिरुके, गोविंदराव चिलकुरे, मंगेश पाटील, सुधीर लखनगावे, अनिल शिंदे, संतोष शेटे, भगवंत चांभरगेकर महाराज, गोरोबाकाका शिवणे महाराज यांच्यासह हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**उदगीर, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील तोंडचिर येथील जिजामाता विद्यालयाच्या सन १९९० च्या१० वीच्या बॅचचा स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. तब्बल ३४ वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मोहनराव खिंडीवाले तर प्रमुख पाहुणे म्हणून किशनराव बागवाले आणि भिमराव गोटमुकले होते. या मेळाव्यास रामदास जाधव, इंदू जाधव, सदानंद जाधव, वर्षा शिंदे, नरसिंग चिखले, विश्वांभर मोरे, राम पुरी, नागनाथ चिट्टे, सविता गिरी, मिना जाधव, हेमंत गिरी, पांडुरंग राजे, शिवाजी चिवटे, शोभा मुळे, दिलीप चिखले, महानंदा जाधव, विजयकुमार कमलापुरे, शशिकांत बिरादार, उमाकांत बापटले, देविदास चाकुरे, शोभा भद्रे, कमलाकर बिरादार, शिवाजी यचवाड, बेबी घेवारे, दयाराम कोंबडे, हारीदास बिरादार, बबन जाधव, पंढरीनाथ चिखले, गोविंद येळगे, चंद्रकांत वाडीकर, कुमार जाधव, उमाकांत बालुरे, संपत गायकवाड, परमेश्वर द्याडे, गिरीश जाधव, बालाजी सोनवणे, मारोती शिंदे,वर्गमित्र सहपरिवार उपस्थित होते.



### पतंजली समितीतर्फे पुरस्कार प्राप्त योगाचार्यांचा सत्कार

**अहमदपूर, दि.२३ जानेवारी -**

नंन येथील पतंजली योग समितीच्या वतीने योग विभूषण कलावती शिवमूर्ती भाताम्ब्रे, सुवर्णपदक विजेते प्रमोद कुलकर्णी वालेवाडीकर, क्रीडा रत्न केशव राजाराम मुण्डकर व पर्यावरणमित्र अनिल त्र्यंबकराव चवळे या योगाचार्यांचा त्यांनी नुकत्याच मिळवलेल्या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. हरिद्वार येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय योग संमेलनात कलावती भातांब्रे यांना स्वामी रामदेव महाराज यांचे हस्ते योगविभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. अंबड येथील राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत वयाच्या ६९ व्या वर्षी १८० सूर्यनमस्कार घालून प्रमोद कुलकर्णी यांनी सुवर्णपदक मिळवले. केशव राजाराम मुंडकर यांना क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल नुकताच उदगीर येथे जिल्हास्तरीय क्रीडा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच अनिल चवळे यांचा नुकताच मुंबई येथे रोटरी प्रांत परिषदेत पर्यावरण क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी डॉ. पांडुरंग टोपे, डॉ. नरहरी सुरनर, डॉ. स्वाती व सुहास जोशी, प्रा. गुरुनाथ चवळे, सोमनाथ रोडगे, बापूराव शिरुरकर, मनीषा मुंडकर, कुसुम दिवाण, सुरेखा उगीले, अंजली कुलकर्णी, छाया विळेगांवे, दयावती हिंगरुपे, कृष्णा कुलकर्णी, लक्ष्मण गलाले, पुष्पा ठाकूर, वृषाली चवळे, बाळासाहेब जाधव, शरद जोशी हे उपस्थित होते.



### महाराष्ट्र महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**निलंगा, दि.२३ जानेवारी -**

महाराष्ट्र पॉलि. डी. फार्मसी इन्स्टिटयूट, निलंगा येथे २० जानेवारी रोजी २००८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सुमारे २५ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन. कोलपुके, उपप्राचार्य प्रशांत गायकवाड, महाराष्ट्र फार्मसीचे प्राचार्य डॉ.एस.एस. पाटील, महाराष्ट्र डि.फार्मसी इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ.बी.एन. पौळ उपस्थित होते. संस्था अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांनी माजी विद्यार्थ्यांनी संस्थेस भेट दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी डॉ.एस.एस. दुधमल, प्रा. विलास करभारी, डॉ.सी.व्ही. ठाकरे, डॉ.ए.एम. मुळदकर, डॉ. अमोल घोडके, रामकांत मांदळे, मनीषा आवळे यांनी विशेष मेहनत घेतली.

### ४५ व्या मराठवाडास्तरीय आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे उद्‌घाटन सत्र संपन्न...

## संस्कार व संस्कृतीची जोपासना करणारी शाळा : आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२३ जानेवारी -**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात ४५ व्या मराठवाडास्तरीय स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री आंतरशालेय वाद विवाद स्पर्धेचे उद्घाटन आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य तसेच गोविंदराव केंद्रे, सुंदर बोंदर, चंद्रकांत मुळे, शंकरराव लासुने, मधुकरराव वट्टमवार, सतनाप्पा हुरदळे, अंजली नळगिरकर, शिवाजी बिराजदार, अंकुश मिरगुडे, बालासाहेब केंद्रे, अरुण पत्की व्यंकटराव गुरमे, षणमुखानंद मठपती, श्रीपाद सीमंतकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटक संजय बनसोडे यांनी लालबहादूर शास्त्री विद्यालयात संस्कार व संस्कृतीची जोपासना केली जाते, असे सांगून वक्तृत्व ही एक कलाआहे. प्रभावी वक्तृत्व व दांडगा व्यासंग समाजामध्ये उठून दिसतो त्यासाठी अशा स्पर्धेचे आयोजन केले जाते, असे व्यक्त केले.

गोविंदराव केंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्पर्धक विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात हेमंत वैद्य यांनी अशा प्रकारच्या वादविवाद स्पर्धेतून समाजमन निर्माण करण्याचे व घडविण्याचे कार्य केले जाते असे मत व्यक्त केले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. राजा कदम व प्रा.डॉ. उषा धसवाडीकर काम पाहत आहेत.

प्रातिनिधिक स्वरूपात निलेश फिरंगवाड व ज्ञानेश्वर बिरादार यांनी समान नागरी कायदा देश हितास साधक की बाधक या विषयाला अनुसरून अनुकूल व प्रतिकूल मत मांडले.

उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक शंकरराव लासुणे, स्वागत व परिचय बालाजी पडलवार, वैयक्तिक गीत प्रीती शेंडे, सूत्रसंचालन लक्ष्मी चव्हाण व आभार बालासाहेब केंद्रे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता किरण नेमट यांच्या कल्याणमंत्र्याने झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, स्पर्धा प्रमुख एकनाथ राऊत, स्पर्धा सहप्रमुख अनिता मुळखेडे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## वलांडी येथे कडकडीत बंद



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२३ जानेवारी -**

भालकी तालुक्यातील दाडगी येथील घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी देवणी तालुक्यातील वलांडी येथे सकल वीरशैव समाज व विविध समाजबांधवांतर्फे वलांडी बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. घटनेतील दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली.

बंदपूर्वी वलांडी गावातून रॅली काढण्यात आली. नंतर उदगीर निलंगा राज्य मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नागरिकांनी घटनेचा निषेध करीत कार्यवाहीची मागणी मनोगताद्वारे व्यक्त केली. यावेळी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते हभप. शिवानंद हैबतपुरे, हभप. प्रशांत पाटील दवण हिप्परगेकर, पृथ्वीराज जीवने, हभप. संगमेश्वर महाराज, विजयकुमार मुके, माधव बेंजर्गे, महेश जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कठोर कारवाईच्या मागणीचे लेखी निवेदन मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांना देण्यात आले.

नागेश बदनाळे, अरुण पाटील, सुरेंद्र अंबुलगे, मधुकर पाटील, उमाकांत नागलगावे, गणेश चवाळे, शिवदास उमाटे, दत्ता बिरादार, रवी स्वामी, विद्यासागर बिरादार, उमाकांत बनाळे, भागवत बदनाळे, सुमित चिल्लरगे, महेश बिरादार, शैलेश बिरादार, संगमेश्वर स्वामी, काशिनाथ स्वामी, बबन बिरादार नागरिकांची उपस्थिती होती.

## जिल्हा अपत्ती व्यवस्थापांतर्गत नदी काठच्या २९ गावांना रेस्क्यू किट वाटप



### सोबत शोध व बचाव साहित्यह वाटप...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२३ जानेवारी -**

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२४-२५ च्या लातूर जिल्ह्याची आपत्ती प्रवण क्षेत्र परिस्थिती लक्षात घेऊन जिल्ह्यामध्ये व जिल्ह्यातील दहा तालुक्यातील नदी काठच्या गावाना गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजने अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर आपत्ती व्यवस्थापनेकरीता आवश्यक साहित्य व यंत्रे नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत निलंगा तालुक्यातील नदी काठावरील २९ गावाना रेस्क्यू किट बरोबर इतर साहित्य पंचायत समितीने वाटप वाटप केले असून पुरग्रस्त भागातील नागरिकांना बचावकार्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

निलंगा तालुक्यात मांजरा व तेरणा या दोन नदी काठावर अनेक गावे वसले असून या भागात अतिवृष्टी झाल्यानंतर नदीला पुर आल्याने शेतकरी, शेतमजूर यांच्या जीवीताला धोका निर्माण होत असतो तसेच काही शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत.

अशा दुर्दैवी घटना भविष्यात घडू नये म्हणून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत जिल्हाधिकारी वर्षा घुगे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या आदेशानुसार निलंगा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सोपान अकेले व भांडार प्रमुख गणेश शानिमे यांनी दि.२२ रोजी औराद शा. माने जवळगा, सावरी, लिंबाळा धानोरा, येलमवाडी, कोकळगाव, नदी हत्तरगा, पिंपळगाव जेवरी, बामनी, रामतिर्थ, सांगवी, बसपूर, शिऊर, शिरोळ वां, गिरकचाळ, शेंद, मुगाव, गौर मसलगा, चिचोंडी, हंचनाळ, हालसी, आनंदवाडी गौर या २९ गावाना रेस्क्यू किट देण्यात आले आहे.

या शोध व बचाव साहित्यात रेस्क्यू किट, मल्टीस्ट्रेचर, डेडबाडी किट कव्हर बग आदि साहित्य या किटमध्ये असून दोरखंड, कटर, जखमी अवस्थेतील नागरिकांना प्रथम उपचार पेटी पाण्यावर तरंगणारी जहाज आदि साहित्य आहे.

## वाशिष्ठ चतुरात्र महासोमयागाला सेलुत ध्वजरोहणाने प्रारंभ

### संत, महंताची प्रमुख उपस्थिती... आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण...





**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील सेलू येथे ९ दिवस चालणार्या वाशिष्ट चतुरात्र महासोमयाग यज्ञाहुतीला बुधवार दि.२२ रोजी विविध धार्मिक उपक्रमासह ध्वजारोहणाने प्रारंभ झाला. यावेळी टाळ मृदंगाच्या साथीत हरिनामाचा गजर करीत शोभायात्रा काढण्यात आली.

लातूर जिल्ह्यामध्ये प्रथमच परमपूज्य गवामयन सत्र सोमयाजी दीक्षित रंगनाथ कृष्ण सेलूकर महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने बहु सोमयाजी दीक्षित, यज्ञेश्वर रंगनाथ सेलुकर महाराज, आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते, राज्यातील सर्व संत महंतांच्या उपस्थितीमध्ये वाशिष्ठ चतुरात्र महा सोमयाग यज्ञाला सुरुवात झाली.

सर्वप्रथम सोमयाग सेवा समिती, सेलू ग्रामस्थांच्या वतीने गावातील ग्रामदैवत मारूती मंदिर ते नागोबावाडी यज्ञभूमी पर्यंत टाळ, मृदंग, भजन, हरिनामाचा गजर, करत शोभायात्रा काढण्यात आली.

यज्ञ ध्वजारोहण परमपूज्य श्री सच्चिदानंद अभिनव विद्या नरसिंह भारती, स्वामीजी शंकराचार्य संकेश्वर पीठ कोल्हापूर, स्वामी श्री रामानंद भारती छत्रपती संभाजी नगर, स्वामी श्री हरिहर आनंद भारती धारूर, श्री माधवानंद सरस्वती स्वामी परमहंस परिव्राजकाचार्य, श्री सरस्वती पीठ रंगमपेठ कर्नाटक, पंडितप्रवर श्री गणेशवार शास्त्री द्राविड, श्रीक्षेत्र वाराणसी, प्रमुख मठाधिपती, यज्ञेश्वर रंगनाथ सेलुकर महाराज, श्रीकांत महाराज सेलुकर, राजेंद्र गिरी महाराज देवताळकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते यज्ञ भूमीमध्ये ध्वजारोहण करण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार यज्ञ भूमीमध्ये उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचा यज्ञेश्वर महाराज सेलुकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तर आ. पवार यांनीही औसा विधानसभा मतदार संघामध्ये १२५ वर्षाची परंपरा असलेल्या वाशिष्ठ चतुरात्र महासोमयाग पार पडत असल्याने यज्ञासाठी राज्यभरातून आलेले संत महंत, या यज्ञासाठी पुढाकार घेतलेले यज्ञेश्वर रंगनाथ सेलुकर महाराज यांचा सत्कार केला.

या यज्ञासाठी यज्ञ भूमीमध्ये राज्यभरातील संत महंतासह सोमयाग सेवा समितीचे पदाधिकारी ॲड. अरविंद कुलकर्णी, संजय कुलकर्णी, जनार्धन माने, प्रकाश पंडगे, भाजपाचे जिल्हा पदाधिकारी संतोष मुक्ता, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, भाजपाचे शहराध्यक्ष सुनील उटगे, गणेश जाधव, बालाजी कुलकर्णी यांच्यासह लातूर व औसा तालुका परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## व्यसनापासून दूर राहा : हभप. बाळु महाराज गिरगावकर

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील हिप्पळगाव येथे लक्ष्मण शक्तीच्या निमित्ताने ठेवण्यात आलेल्या किर्तनाच्या समाज प्रबोधन किर्तनकार हभप. बाळु महाराज गिरगावकर यांचें वारकरी सांप्रदायातील जमलेल्या टाळकरी भजनी तसेच नवतरुण वर्गातील जनसमुदायाला उद्देशून म्हणाले आजचा टाळकरी गळ्यात टाळ घेऊन तंबाखू मळताना आढळून येतोय तर बसलेल्यापैकी अनेकजण गुटखा, तंबाखू खाऊन पिचकाऱ्या मारताना दिसतात. तर नवऱ्याला व्यसनांपासून दूर ठेवावे म्हणून बायको अंधश्रद्धेच्या जोखडात गुंतुन नको त्या देवाला नवस करते, आणि नको ते खडतर उपवास करून आपल्या शरीरातील आजार वाढवून रोगराईस आमंत्रण देत आजारी पडतेअसे हभप. बाळु महाराज गिरगावकर यांनी हिप्पळगाव येथील लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमात बोलताना म्हणाले. त्यांना मृदंगाचार्य हभप. सोमेश्वर महाराज जगताप यांनी उत्तुंग अशी साथ दिली.

## पानगाव ते खरोळा फाटा महामार्गाचे काम पुन्हा रखडले

### रस्त्याने वाहन चालवताना वाहनधारकांना करावी लागतेय कसरत... ३० गावच्या वाहन धारकांची होतेय गैरसोय...



> सदरील कामावरील यंत्रना दुसरीकडे गेली असल्याने सद्या काम बंद आहे. येत्या चार दिवसात काम सुरळीत रित्या सुरु होईल. मी गुत्तेदार यांच्याशी बोललो असता त्यांनी रस्त्यावरील टाकलेली खडी पांगवण्यासाठी काम सुरु करण्यासाठी मशीन मी पाठवत आहे. हे मला सांगितले आहे. येत्या चार दिवसात रस्त्याचे काम सुखात होईल.
>
> **- प्रविण सुमंत, कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग लातूर विभाग**

> **पानगावची बाजारपेठ बंद पडण्याच्या मार्गावर...**
>
> पानगाव ते खरोळाफाटा रखडलेल्या आणि दुरावस्था झालेल्या रस्त्यामुळे पानगाव बाजारपेठेत शुकशुकाट दिसत असून पुर्वी दररोज लाखो रुपयांची होणारी बाजारपेठेतील उलाढाल पुर्णतः ठप्प झाली असून केवळ रस्त्या अभावी पानगावची बाजारपेठ बंद पडण्याच्या मार्गावर आहे. लवकरात लवकर हा रस्ता पुर्ण व्हावा.
>
> **- जसपाल चव्हाण, व्यापारी पानगाव**

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२३ जानेवारी -**

तालुक्यातील पानगाव ते खरोळा फाटा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सन २०१८ ला मंजुरी मिळाली होती. खरोळा फाटा ते पानगांव हा केवळ १४ कि.मी. अंतराचा महामार्ग मागील ६ वर्षापासुन रखडलेला होता.

अनेक अंदोलने झाली परंतु रस्ता होऊ शकला नव्हता. परंतु दि.११ डिसेंबर २०२४ रोजी पानगाव ते खरोळा फाटा रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला पानगाव पासून सुरुवात करण्यात आली असल्यामुळे व्यापारी व गांवकऱ्यात आनंदाचे वातावरण तयार झाले होते. पानगाव रेल्वे गेट पासून पन्नगेश्वर कारखान्या पर्यत काम पुर्ण झाले. आणि पुढे पाथरवाडी ते मुरढव रस्त्याचे काम सुरु आसताना पुन्हा आनंदाचे वातावरण नागरीक व्यापारी व वाहन धारकांची निर्माण झाले होते.

परंतू गेल्या विस दिवसापासून हे देखील काम बंद असल्याने वाहनदारकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. जवळपास ३० गावच्या लोकांची रस्ता बंद केल्याने व्यापारी व नागरीकांच्या आनंदावर विरजण पडले आहे.

उमरगा ते खामगाव जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एच या राष्ट्रीय मार्गाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली होती आणि त्याच्या कामाला सुरुवात झाली होती. उमरगा ते खरोळा फाटा आणि परळी ते पानगांव रेल्वेगेट इथपर्यंत दोन वर्षापुर्वी तयार ही झाला आहे. पानगांव रेल्वेगेट ते खरोळा फाटा हा केवळ १४ कि.मी. इतकाच कधी शेतकऱ्यांच्या मावेजा करीता तर कधी महामार्ग अधिकाऱ्यांच्या नाकर्ते पणामुळे आणि लोक प्रतिनिधीच्या दुर्लक्षा मुळे होऊ शकला नाही.

अनेक वेळा पानगांवकरांनी निवेदने दिली, अंदोलने केली, पानगाव ते रेणापूर रास्ता रोको केला. अनेक वेळा गांव बंद केले.

परंतु काहीच फायदा न झाल्यामुळे दि.२६ डिसेंबर रोजी गांवकऱ्यांनी, शेवटचा पर्याय म्हणुन स्वयंस्फुर्तीने पानगांवच्या व्यापाऱ्यांनी आणि पानगावसह परिसरातील वाडी खेड्याच्या ग्रामपंचायतीने ठराव घेवुन व्यापार पेठेसह गाव बंद ठेवुन रेणापूर पिपंळफाट्यावर होत असलेल्या रास्ता रोकोला पाठींबा दिला होता. याची दखल घेऊन शासनाने १०मीटर रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला आणि ११ डिसेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. व्यापारी, गावकरी आनंदी झाले होते.

एक वर्षात काम पूर्ण करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात यंत्रणा वाढवून कामाची गती वाढवली होती. परंतु पानगावकराच्या आनंदावर काही दिवसातच विर्जन पडले व पन्नगेश्वर कारखान्याजवळ काही जणांनी काम अडवले.

होते ते काम पुन्हा चालू करावे म्हणून पानगाव व परिसरातील वाडी खेड्यातील नागरिकांनी आपल्या गावातील बाजारपेठा बंद ठेवून दोनचाकी व चारचाकी वाहनाची रॅली काढून जिल्हाधिकारी लातूर यांना निवेदन दिले होते त्यावेळी काम सुरु झाले.

पुन्हा उपोषण करण्यात आले पुन्हा काम सुरु झाले आणि सद्या पाथरवाडी ते मुरढवपर्यत सुरु असलेले काम पुन्हा एकदा रखडल्याने पानगावसह परीसरातील जवळपास ३० गावच्या लोकांची व वाहन धारकांची धुळे मिश्रीत रस्त्याने वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे.

हा रस्ता पुर्ण होईल कि नाही याच्या आशा मात्र धुसर झाल्या आहेत.